
# माणूस

जुलै १९६२ — — — — — — एक रुपया



माणूस
मराठी मासिकपत्र

संपादक
श्री. ग. माजगांवकर

• • •

पत्रव्यवहाराचा पत्ता
' माणूस, ' मराठी मासिक
४१९ नारायण पेठ, पुणें २.

* * *

वार्षिक वर्गणी : आठ रुपये
किरकोळ अंक : एक रुपया

• • •


## — सूचना —

१. प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

२. पुरेसें पोस्टेज सोबत नसल्यास नापसंत साहित्य लगेच निकालांत काढलें जातें.

३. या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें ' माणूस ' मासिकाच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं.

अभिराष्ट्रेण वधताम्





वर्ष दुसरें : जुलै १९६२ : अंक दुसरा


## स्वरूप–दर्शन


— सामाजिक अंतरंग —

सव्वीस दिवसांचें स्वप्न ... ... श्रीकृष्ण साखळकर

पर्वती दर्शन–एक नवें रसायन ... ... श्रीकृष्ण पोंक्षे

— साहित्य विभाग —

उतरंड ... ... अरविंद गोखले

उदंड जाहलें पाणी ... ... दा. सी. देसाई

पडछाया ... ... एस्. ए. कुलकर्णी

कविता ... ... मधुकर केचे
नरेंद्र पराडकर
शांताराम भास्कर
रमेश सुळे, ' श्री '

— रंगभूमि, चित्रपट, क्रीडा —

ते कलावंत, त्या आठवणी ... ... प्रतिनिधी

' तुझे आहे तुझपाशी '
हिंदी रूपांतर परिचय ... ... सुधीर दामले

' आरती '–परीक्षण ... ... रंगा मराठे

भारत विंडीज सामने ... ... रा. म. शास्त्री

पुस्तक परीक्षण, विनोद इत्यादि स्फुट साहित्य.

मुखपृष्ठ— मा. द. शिंदे

# सव्वीस दिवसांचें स्वप्न

श्रीकृष्ण साखळकर

मी दुशांबेला गेलों, बुद्धिबळें खेळायला, आंतरराष्ट्रीय आशियायी सामन्यामध्यें भारताचें प्रतिनिधित्व करायला. तेव्हां माझी अपेक्षा होती की, सव्वीस दिवसाच्या माझ्या वास्तव्यांत मी बुद्धिबळें खेळेन आणि गेलों तसा परत येईन. मी गेलों तसाच आलों. पण केवळ बुद्धिबळें खेळून नाही तर त्या सव्वीस दिवसाचें एक स्वप्न बनवून.

मी त्या सव्वीस दिवसांच्या वास्तव्याला स्वप्न म्हणतों, तें स्वप्नाळूपणें नव्हें. थोडीफार चांगली बडदास्त ठेवली म्हणून गहिवरून जाणें मला जमत नाहीं. वस्तुस्थितीच्या नगरीत कल्पनेचे रंग भरून एखादें सुखद स्वप्न उठविण्याची कुवत पण माझ्यांत नाही. आणि तरीसुद्धा मी माझ्या वास्तव्याला स्वप्न म्हणतो. याचें कारण एवढेंच की, भारतामध्यें एका विशिष्ट प्रकारच्या जीवनाशी मी समरस झालेला असतों आणि त्या जीवनात ते सव्वीस दिवस कुठेंच बसत नाहीत. मला ते स्वप्नासारखें वाटतात.

दुशांबे ही रशियातल्या पंधरा संघराज्यांतील ताजिकिस्तान या राज्याची राजधानी. मोठें ऐसपैस शहर आहे. शहराचें वय आहे तीस वर्षांचें. त्यामुळें आधुनिक शहर-रचनेच्या शास्त्राचा पुरेपूर उपयोग करून ते वसवण्यांत आलें आहे. त्याचा 'मेन' रोड कित्येक किलोमिटर सरळच्यासरळ धावत गेलेला आहे. रस्ता धांवतो असें वाटतें, कारण त्यावरून जाणारीं वाहनें भरधांव ये–जा करीत असतात. मुंबईच्या जीवनांत 'ट्रॅफिक जॅम' बघायची सवय झालेल्या मला त्या रस्त्याचें फार अकर्षण वाटले. अर्थात् मुबईएवढी तेथें वाहनांची रहदारी पण नाहीं. आणि घोडागाडी, बैलगाडी, हातगाडी, अशा वहातुकीला अडथळा करणाऱ्या गाडया पण नाहीत. मुख्य वाहनें म्हणजे भरवेगात चालणारी. 'ट्रॉली' बस, तेलावर चालणारी बस व टॅक्सी. रस्त्याच्या दुतर्फा व मधून भरगच्च झाडी आहे. 'एक झाड नष्ट करण्यापूर्वी दोन झाडें लाव' अशा आशयाची आपल्याकडील वनमहोत्सवाला साजेशी एक म्हण उझबेक भाषेमध्यें आहे. तिचें प्रत्यंतर सगळीकडे येतें.

ताजिकिस्तानचा प्रदेश डोंगराळ आहे. मी राहात होतों त्या 'वेशख' हॉटेलच्या माझ्या खिडकींतून सकाळच्या प्रहरी एक बर्फाच्छादित उत्तुंग शिखर फार मनोहर दिसत असे. अशा या निसर्गसमृद्ध प्रदेशांत मी मे महिन्याच्या पांच तारखेला सायंकाळीं पोहोंचलों. प्रवासाला एकंदर वेळ लागला सात तास. प्रवास केला हवाई जहाजामधून.

## पडूं आजारी, मौज हीच वाटे भारी


सात तारखेच्या सकाळी मी बिछान्यांतून उठलोंच नाही. कारण मी आजारी पडलों होतों व श्वासोच्छ्वास करणेंहि मला मुश्किल होत होतें. या अनपेक्षित आजारामुळें माझा सोव्हिएट डॉक्टरांशीं संबंध आला. केवळ बुद्धिबळें खेळायचीं "आणि" परत जायचें या कल्पनेला बसलेला हा पहिला धक्का. किंबहुना मला खेळायला मिळतेंच की नाही हा प्रश्न उपस्थित झाला. कारण डॉक्टरांच्या मतें माझा आजार गंभीर स्वरूपाचा होता व मला विश्रांतीची फार जरूर होती. या पुढील सहा दिवस म्हणजे सात बायकाची धांवपळ, दर तीन तासांनी एक वेगळ्या चेहऱ्याची बाई येऊन माझी दखल घेऊन जायची. दिवसातून तीन इंजेक्शनें दिली जायचीं, स्पंजिंग व्हायचें, टॅंपरेचर घेतलें जायचें, गुळण्या तर आठ वेळा करायला लागायच्या. या वेगवेगळ्या बायकांची धांवपळ बघून मला शंका आली कीं, या येत तरी कुठून असतील व मला अगोदर कोणतें औषध दिलें आहे याची मागाहून येणाऱ्या बाईला कल्पना तरी असेल कां ? याचा उलगडा मला सहाव्या दिवशीं हॉस्पिटलमध्यें 'क्ष' किरणाचें फोटो काढण्यासाठी नेले तेव्हां झाला. मला त्या सातहि बायका तेथें भेटल्या व त्यांनी मला बरा झाल्याची ग्वाही दिली. माझ्या या आजाराचा मला किंवा कोणालाच कसला खर्च आला नाहीं. कारण रशियामध्यें औषधोपचार मोफत केले जातात. सर्व डॉक्टराना सरकार पगार देते व त्यामुळें डॉक्टरकीचा 'धंदा' तेथें चालत नाही. रोग्याला बरा करण्याची दिरंगाई होत नाहीं. हॉस्पिटलमध्यें स्त्री–पुरुष डॉक्टर बरोबरीनें काम करताना आढळतात. काही ठिकाणीं मला स्त्रियाच जास्त असल्याचें आढळून आलें.

पुरुष आणि स्त्री हा भेद तेथे व्यवहारात फारसा आढळला नाहीं. आपण किती वाजले म्हणून ज्या सहजतेनें एकाद्या पुरुषाला रस्त्यावर विचारतों त्याच सहजतेनें तेथे पुरुष एकाद्या बाईला विचारतो आणि बाईपण 'काय मेला लोचट' चा विचारसुद्धा मनात न आणतां वेळ सागून आपल्या मार्गानें निघून जाते.

## शिक्षणोत्सुक रशियन स्थान

माझ्या आजारीपणातच ज्या व्यक्तीशी मी माझ्या दुशांबेमधल्या संपूर्ण वास्तव्यांत बोलणार होतों त्या व्यक्तीची व माझी ओळख झाली. ती म्हणजे माझी दुभाषी नाझा. ही तेवीस वर्षांची पोर फार हुषार होती. ती इंग्रजी बऱ्यापैकी बोलत असे. तिला जर्मन भाषापण अवगत होती. आपल्या कामांत ती फार तत्पर असायची.

" **मा**णूस " चे " बुद्धिबळाच्या पटावर " या सदराचे लेखक श्री. श्रीकृष्ण साखळकर दि. ३ मे रोजी " रशियन चेस फेडरेशन " चे निमंत्रणावरून बुद्धिबळाच्या सामन्यांत भाग घेण्यासाठीं रशियास गेले होते. रशियन संघ-राज्यांतील ताझिकिस्तान राज्यांत दुशांबे या राजधानीच्या शहरीं हे सामने खेळले गेल्यामुळें श्री. साखळकर यांचा मुक्कम अधिकांश तेथेंच पडला. या मुक्कामांत श्री. साखळकर यांच्या मनश्चक्षूंसमोरून सरकलेलीं हीं रशियन क्षणचित्रें "माणूस" च्या वाचकांना येथें सादर केलीं आहेत.



विशेष म्हणजे तिला कामाचा कंटाळा नसायचा. नवीन नवीन वाक्प्रचार शिकायची तिला फार हौस. माझ्याजवळ इंग्रजी बोलायला मिळतें यांतच तिला आनंद होता. रशियामध्यें इंग्रजी जाणणारे फार थोडे लोक मला आढळले.

नाझाला एक लोला नांवाची एक मुलगी आहे आणि तिचा नवरा केफमध्यें डॉक्टरकीचा अभ्यास करीत आहे. दुशांबेमध्यें ती आपल्या आईबरोबर राहते. रशियाच्या ' इन्टूरिस्ट ' संस्थेमध्यें ती दुभाषाचें काम करते. व शिवाय रात्रीच्या शाळेंत जर्मन शिकवते. तिची वर्तणूक अतिशय सलगीची पण सभ्य असायची. समाजांतल्या लांडग्यांना कसें दूर ठेवायचें ही कला तिला अवगत होती. चोवीस दिवस आमचा बऱ्याच व्यक्तींशी संबंध आला तेव्हां, या तिच्या कलेचें बरेंच दर्शन मला घडलें.

नाझामध्येंच मला रशियन स्त्री पहायला मिळाली, पण एका स्त्री-वरून सगळ्यांच्याविषयीं मत बनविणें कठीण आहे. इतर बायकांशी जो संबंध यायचा तो मत बनविण्याच्या दृष्टीनें अपुरा होता. नाही म्हणायला माझ्या खाण्यापिण्याची व्यवस्था बघणाऱ्या दोन परिचरिका होत्या. एक ' आला ' आणि दुसरी ' तान्या ' त्या माझ्या जेवणाची कसोशीनें काळजी घ्यायच्या. मात्र माझा शाकाहार फार त्रासदायक होता. बटाट्याच्या काचऱ्या, पाव, लोणी, चहा किंवा कॉफी व स्ट्रॉबेरीज् यांखेरीज मला खायला कांहीच मिळूं शकलें नाही. तान्या माझें रात्रीचें जेवण वाढायची व तें झाल्यावर रशियन भाषेंत ' सुखानें झोप व सकाळी ताजातवाना ऊठ ' म्हणून शुभेच्छा दर्शवायची. मला पहिले काहीं दिवस वाटायचें ती मला ' आणखी कांहीं हवें का ? म्हणून विचारत आहे. व मी तिला खुणेनें कांही नको म्हणून सांगत असे. एक दिवस नाझा माझ्याबरोबर जेवायला होती. तिने नेहमीच्या सरावानें तान्याची शुभेच्छा माझ्यासाठीं इंग्रजींत सांगितली व मग आमची हंसतां हंसतां पुरेवाट झाली.

रशियांत हॉटेलमधून ' टिप् ' पद्धत नाहीं. म्हणून आलाला व तान्याला शेवटच्या दिवशी भेट म्हणून कांहींतरीं देण्याची माझी इच्छा होती, पण त्यांनीं भेट घ्यायला स्पष्ट नकार दिला. नाझानेही कांही घेण्यास नकार दिला. शेवटीं मी तिला माझ्याजवळ असलेलें इंग्रजी लिहिणारांना अतिशय उपयुक्त पुस्तक " Royet's pocket tresures " देऊं केलें. तें मात्र तिनें फार आनंदानें घेतलें. त्याचें कारण तसल्या प्रकारचीं पुस्तकें तेथें उपलब्ध नसतात व आपल्या भारतांत ती सर्रास मिळूं शकतात याचें तिला आश्चर्य वाटलें.

### बुद्धिबळ-रशियाचा राष्ट्रीय खेळ

आमचे खेळ संध्याकाळीं चालायचे. खेळ बघायला बरीच गर्दी असायची, पण तेथील शांतता मात्र वाखाणण्यासारखी होती बुद्धि-बळें हा रशियाचा राष्ट्रीय खेळ आहे व तो जवळ जवळ सगळ्यांना समजतो. मी परत येतांना ताश्कंदला ' कस्टमच्या ' ऑफिसरला वेळ मिळतांच माझ्याबरोबर खेळावयाची हुक्की आली. अर्थात त्याच्या खेळाचा दर्जा बराच कमी होता.

आमच्या सामन्यांतील खेळाडूंचा दर्जा ' मास्टर ' चा होता. त्याच्यावरती ' इंटर नॅशनल मास्टर ' व ' ग्रँड मास्टर ' असे दर्जे आहेत. ग्रँड मास्टर हे जगांतील सर्वांत उत्कृष्ट खेळणारे. जगांमध्यें त्यांची संख्या जवळ जवळ चाळीसच्या घरांत आहे. त्यांत रशियाचे पंचवीसच्यावर आहेत. आजारीपणापायीं मी सर्व डाव खेळूं शकलों नाहीं, पण जे खेळलों त्यांत ५०% गुण मिळाले. आजारी न पडतों तर यापेक्षा जरूर चांगला खेळूं शकलों असतों, पण सामने जिंकणें मात्र शक्य झालें नसतें. कारण ज्या खेळाडूने ते सामने जिंकले, तो शामकोविच ' इन्टरनॅशनल मास्टर ' ! म्हणून त्याचा डाव आमच्या इतरांपेक्षा भारी होता.

दर चार दिवसांआड एक दिवस खेळ बंद असत. त्या दिवशीं आम्हाला दुशांबे पाहायला मिळत असे. त्यांचा म्युझियम आपल्या

इंकडील म्युझियमच्या तोडीचा आढळला नाही. मात्र त्याचा बराच भाग दुरुस्तीत होता व तो मला पाहातां आला नाही. सर्कस पाहिली. तीपण आपल्या सर्कशीच्या मानानें बरीच कमी वाटली. खेळांचा स्टेडियम मात्र उत्कृष्ट आहे. आणि मला सर्वांत आवडलें तें दुशांबेंतलें जलाशय. त्यांनी मला हैद्राबादच्या हुसेन सागराची आठवण करून दिली. ही जलाशयें सागराची उणीव बऱ्याच अंशीं भरून काढतात. त्या अफाट जलाशयांत कित्येक स्त्री-पुरुष पोहतांना व बोटी फिरवतांना आढळले. त्यातले बरेच जण शर्यतीची तयारी करीत होते. काठावरच्या वाळूवर जवळ जवळ उघडे स्त्री-पुरुष एकत्र हॉली-बॉल खेळतांना दिसले. त्याना जग विसरायलाच झालें होतें. तेव्हां माझ्यासारख्या तिऱ्हाईत माणसाची कोठे जाणीव व्हायला ? पण एकूण रशियांत ' अग बाई ' ही वृत्ति मला जाणवलीच नाही.

दुशांबेमधील पार्क फार सुंदर आहे. तेथें लहानापासून मोठ्यापर्यंत सगळ्यांच्या करमणुकीचीं साधनें आहेत. विजेचे पाळणे, गोल धावणारे घोडे वगैरे आपल्याकडे जत्रेंत आढळतात, तसले करमणुकीचे खेळ तेथें होतेच; पण मी एक विमान पाहिले, तें मात्र इकडे कधीं पाहिलेलें नाही, त्यात तुम्हांला पट्टे बांधून बसवतात व मग ते वर उंच जाऊन पुन: खाली येते. विजच्या पाळण्यांत आणि त्यांत फरक एवढाच की, पाळण्यांत तुम्ही नीट बसून असतां तर हें आकाशाच्या बाजूला गेल्यावर तुमची स्थिति शीर्षासन घातलेल्या माणसासारखी असते. मला या विमानांत बसण्याचें धाडस झालें नाहीं, कारण खऱ्या विमानांत बसण्यापेक्षा मला तें किती तरी कठीण वाटलें.

मोठ्या माणसांच्या करमणुकीसाठीं दोन पटांगणांत नाचण्याची सोय आहे. एका पटांगणांत फक्त पुरुष ताजीक पध्दतीचा नाच करतात तर दुसऱ्या पटांगणांत स्त्री-पुरुष पाश्चात्य पध्दतीनें नाचतात. मात्र पाश्चात्य पध्दतीच्या नाचात नाचण्यापेक्षा एकत्र उभें राहाण्याचीच उत्कंठा मला बऱ्याच ठिकाणीं दिसली. हॉटेलमधूनसुध्दा रात्रीं गाण्याच्या तालावर तेथील लोक नाचतात, ते पाय हलवले तर हलवले याच पध्दतीनें. जास्त प्यालेलीं माणसें नाचतांना थोडा फार गोंधळ पण करतात.

रशियन लोकांना भारतसरकारचें दारूसंबंधीचें धोरण समजावून सांगणें कठिण आहे. आपण वाढदिवस व इतर आनंदाचे दिवस दारूशिवाय कसे साजरे करतों याचें त्यांना आश्चर्य वाटलें. कित्येक लोकानी तर तेथें आलेल्या हिन्दी सिनेमांत बायका दारू पीत असल्याचें सांगितले व मी जेव्हां त्या वाईट चालीच्या बायका असाव्यात अशी शंका प्रदर्शित केली, तेव्हां त्याना अचबा वाटला. कारण ते त्याच बायका चांगल्या असाव्यात असें धरून चालले होते.

एका रात्री हॉटेलांत दारू पिऊन तर्र झालेला एक फिरतीवरचा ब्रिटिश नागरीक मला भेटला. मी भारतीय आहे हें त्याला समजतांच त्यानें मला प्रश्न केला कीं, ' तुमचे नेहरु कसे काय आहेत ? ' दारूच्या नशेंतहि भारत आणि नेहरु त्याच्या मनात एकत्र असावेत याचा मला आनंद वाटला.

खायचें, प्यायचें, काम करायचें, आणि मजा करायची हेंच ब्रीद मला तेथल्या लोकाचें दिसलें. राजकारण फारसें ऐकू येत नसे. कोठें संपाच्या आरोळ्या नव्हत्या. मोर्चे नव्हते. लोकांचा सरकारवर विश्वास दिसला. मात्र माझ्या राजकारणावरच्या प्रश्नाना कोणीच समाधानकारक उत्तरें देऊं शकलेला नाही. त्यात बोलायचा चोरटेपणा होता असें नव्हें, तर त्यांत त्यांना फारसें ज्ञानच दिसून आलें नाही. मात्र क्रुश्चेव हा त्यांचा आवडता पुढारी वाटला.

दुशांबेमध्यें देवळें आहेत, पण तरुण पिढी देव मानीत नाहीं. मात्र देव न मानण्यांत तरुणांनी फारसा विचार केला आहे असें मला जाणवलें नाही. आपल्याइकडेहि एक फॅशन म्हणून देव न मानणाऱ्यांचा वर्ग आहे. त्यांतच ते मोडतात. आणि आधिभौतिक तत्त्वावर


अमृतम् ज्ञानम् अभयस्य।

वाचून विकत घ्यावें किंवा विकत घेऊन वाचावें असें ' अभय ' साहित्य

अंतर सजावट शक्तिकेतु

' बलराम नांगरे ' ※ मुळीक ※ गं. रा. पाठक

पृष्ठें : १२८ ★ मूल्य : तीन रुपये
काळ आणि मानवता यांचे आव्हान असलेल्या आजच्या सामाजिक समस्यांचा तळ गाठणारा विचार-प्रवर्तक सरस कथासग्रह वाचा आणि विचार करा.

पृष्ठें : ४८ ★ मूल्य : एक रुपया.
काव्य न आवडणे हें आजच्या उच्च संस्कृतीचें एक भूषण आहे! ठीक आहे! तरीहि ' शक्तिकेतु ' वाचा आणि श्रीकृष्णाच्या इतिहासानें सत्य केलेल्या भविष्यवाणीचा विचार करा.

शालान्त परीक्षेंत मराठी विषयांतील उत्कृष्ट यशासाठी

पृष्ठें : ४०८ ★ मराठी गाईड ★ मूल्य : तीन रुपये

लेखक – गं. रा. पाठक, अध्यापक मॉडर्न हायस्कूल, पुणें ५.

उत्कृष्ट म्हणून नांवाजलेलें ' परंतु यापरि हें ! '

अभ्यासपुस्तक अवश्य घ्या.

निबंध आणि कल्पना-विस्तार

पृष्ठें : २०० ★ लेखक – गं. रा. पाठक ★ मूल्य : तीन रुपये

हें उपयुक्त आणि मनोरंजक अभ्यासपुस्तक जुलैअखेर प्रसिद्ध होईल.

आपल्या ग्रंथालयासाठी अवश्य घ्या. लिहा : गं रा पाठक, तीन (जुना) सदाशिव, पुणे २.

उभारलेल्या मार्क्सवाङ्मयाच्या तालमींत तयार झालेल्या माणसांनी या गोष्टीचा विचार तरी कशाला करावा !

### भारत आणि रशिया

आणि नेमकें हेंच मला दुशाबेंतील " औद्योगिक शाळा " बघायला गेलों तेव्हां खटकलें. अफाट विस्ताराच्या एका डोंगरपायथ्यावर ही शाळा आहे. तेथें शेतकीपासून तो 'क्ष' किरणाच्या यंत्रापर्यंत सर्व गोष्टीचें शिक्षण दिले जातें. त्या शाळेंत शिकवल्या जाणाऱ्या निरनिराळ्या विषयांची माहिती घेता घेता मला पांच तास लागले. पण तेथल्या निसर्गाचा उपयोग टागोरानीं आपल्या शांतिनिकेतनमध्यें केला तसा केलेला आढळला नाहीं आणि सर्व शाळा पाहिल्यावर जरी तेथले विद्यार्थी तज्ञ होतील याची मला खात्री वाटली तरी त्यांना जीवनाचा अर्थ शोधण्याची कितपत तळमळ असेल याची शंका आली.

आणि मला वाटतें, याच प्रश्नाचें उत्तर उद्याच्या रशियाला द्यायचें आहे. आजचा रशिया आधिभौतिक सुखांकडे झपाट्यानें प्रगति करीत आहे. तेथें भिकारी नाहींत. कामगार पाचशें रुपयें मिळवतो व पांचशें रुपये खर्च करतो. घरभाडीं स्वस्त आहेत. पुरेसें अन्नधान्य स्वस्त दरानें मिळतें. औषधोपचार मोफत आहे. शिक्षण बऱ्याच अंशीं विनामूल्य मिळतें. आळशी श्रीमंतांना समाजरचनेत स्थान नाही. यामुळें कोणीही पैसे साठवून आपल्या मुलाला श्रीमत करण्याच्या धडपडीत नाहीं. पैसा मिळवायचा आणि खर्च करायचा, आनंद लुटायचा, हेंच आज त्यांचें ध्येय होऊं पाहात आहे. पण पुढें काय ? या आधिभौतिक सुखापलीकडे कांही आहे कां ? याचा विचार उद्याचा रशिया करील का ? तेथें एखादा रामकृष्ण जन्माला होईल काय ?

ज्या मनाला आध्यात्माचा विचार करण्याचे संस्कार झालेले नाहीत तें मन केव्हाहि आधिभौतिकापलीकडे जाणार नाहीं पण ज्यांनीं वाल्या कोळ्याची गोष्ट समजून वाचली आहे ते असें कधीच निराश होणार नाहीत. वाल्या कोळी आधिभौतिक शिखराच्या कळसावर पोहोचला आणि मग एक क्षुल्लक कारण घडून त्याला उपरती झाली. त्याचा वाल्मिकी ऋषी झाला. अर्थात हें सगळें कळीच्या नारदामुळे झाले पण जगाचा इतिहास काळजीपूर्वक अभ्यास करणाऱ्याच्या हें लक्षांत यईल कीं, कळीच्या नारदानें आजतागायत आपले कार्य चालू ठेवलें आहे.

● ● ●

## ऑगस्टच्या अंकांत–

१३ ऑगस्ट १९४७ रोजीं लखनौ येथील ब्रिटिश रेसिडेन्सीवर गेलीं शंभराहून अधिक वर्षें अव्याहतपणें फडफडणारें युनियन जॅक खालीं उतरविण्यांत आलें. निशाणाची घडी करून ती ब्रिटिश सेनापतीनें लंडनच्या म्युझियमकडे रवाना केली. दोनच दिवसांनीं भारताची फाळणी होऊन भारत आणि पाकिस्तान स्वतंत्र झालीं.

हें कां झालें ? कसें झालें ? वेव्हलची अचानक उचलबांगडी कोणीं केली ? भारताची फाळणी गांधीजी जिवंत असूनहि कशी झाली ? फाळणीनंतर हजारों-लाखों निरपराध जनतेची कत्तल कां झाली ?

### 'रणावीण स्वातंत्र्य 'जेव्हां' मिळालें !'

'माणूस'च्या ऑगस्ट अंकांतील या लेखांत यासंबंधींची नवीन व आजवर कुठेंहि न आलेली माहिती वाचकांना सादर केली जाईल.

● ● ●

" मी पाहिलेले लेखक " या 'माणूस 'मधून प्रसिद्ध झालेल्या लेखमालेंतील पहिल्या भागापैकी श्री. य. गो. जोशी याचे संबधीचा शेवटचा लेख जागेअभावी या अकांत देतां आला नाहीं. तो ऑगस्ट अंकांत देण्यात येईल व त्याचबरोबर या लेखमालेच्या लेखकाचें नांव प्रसिद्ध होईल. ● ● ●

आजच खरेदी करा

**महाराष्ट्र सिल्व्हर ग्लास मॅन्यु. कंपनी**

आजच आरसे खरेदी करा

— कारण —

ते उत्तम, टिकाऊ व स्वस्त असतात.

डाळमंडई, अहमदनगर.


**माणूस** ऑगस्ट ६२ | साहित्य विभाग.

दि. बा. मोकाशी

प्रा. भिमराव कुलकर्णी

प्रा. प्रल्हाद वडेर

प. त्रिं. सहस्रबुद्धे



अरविंद गोखले

कमरेला कळसा व गांवाला वळसा असाच अखेर प्रकार घडला. सुजाताच्या विवाहासाठीं इतकी पायपीट केली, याद्या जमवल्या, कुंडल्या वांटल्या, हुंड्याचा आंकडा वाढवला, प्रवास केला–अन् अखेर ओळखींतलं, अगदी वाड्यांतलंच स्थळ मिळालं. हवा तसा नवरामुलगा घरांत चालून आला. घरमालकाचा भाचा सुट्टीसाठी आला अन् त्याच दिवशीं पाहण्याचा प्रोग्राम झाला. मुलगी पाहणं नुसतं नांवापुरतं. लगेच मुहूर्त ठरला, याद्या झाल्या......

लिहितां लिहितां गुरुनाथ नकळत थबकले. हातांत धरलेलं पेन पाहत राहिले. पेनऐवजी कुणा वाद्यकाराने तोंडांत धरलेली सनई त्यांना दिसूं लागली. सनईवादन सुरूं झालं, केळीचीं पानं मांडलीं गेलीं, रांगोळ्या घातल्या गेल्या, उदबत्त्यांचा वास आला. कोऱ्या शालू-शेल्यांची सळसळ ऐकूं येऊं लागली. बोहलं, अंतरपाट, मुंडावळ्या ... लग्नसमारंभाचं वातावरण भोंवताली दिसूं लागलं अन् हातांतलं पेन समोरच्या कागदावर टाकून गुरुनाथ खुर्चींत रेलले. ह्या आभासांत जरा गुंगून पडावं आणि मग संध्याकाळ होईपर्यंत विश्रांति न घेतां कादंबरीचीं दोन प्रकरणं लिहून काढावींत ह्या विचारानं ते डोळे मिटून पडून राहिले.

कादंबरीचं नवं प्रकरण तर झकास, मनाजोगतं सुरू झालं होतं. गेल्या प्रकरणांत सुजाताचा प्रेमभंग झाला व जन्मभर अविवाहित राहण्याचा तिनें निर्धार केला. इतका कथाभाग आला होता. आता मधले दुवे गाळून एकदम तिच्या विवाहसमारंभाचं वर्णन सुरू केलं होतं. वाचक चांगलेच चमकणार होते. सुजाता लग्नाला कशी तयार झाली, बाळासाहेबांना तिच्यासाठीं स्थळ मिळवायला इतके प्रयास कां पडले, घरमालकाचा हा भाचा कोण–नवं प्रकरण अनेक प्रश्नचिन्हं उभीं करणारं होतं. कादंबरीला कलाटणी मिळणार होती...गुरुनाथ संतोषाने डोलूं लागले. कादंबरीची प्रसिद्ध झालेली, जाडजूड वजनाची व पंचरंगी वेष्टणांत वेढलेली प्रत आत्ताच कुरवाळूं लागले.

कांहीतरी फुटल्याचा आवाज आला व गुरुनाथांची तंद्री भंगली. ते भानावर आले व दचकून त्यांनी पेन उचललं. दुपारची सुट्टी अंगावर येत होती. भिंतीवरचं घड्याळ न थांबतां आवाज करीत होतं. आळस करून चालणार नव्हतं व आज मिळालेली निवांत दुपार वाया घालवणं मूर्खपणाचं होतं. पंधरा दिवसांत कादंबरीचं हस्तलिखित हातीं द्यायचं प्रकाशकाला वचन दिलं होतं. लेखन पुरं झालं नाही तर पुढे इतका मोकळा वेळ मिळणार नव्हता. कदाचित् छापखानाहि मोकळा मिळाला नसता. प्रकाशकाकडून आगाऊ रक्कमहि घेतलेली होती. कादंबरी पुरी करायलाच हवी होती. आज सुरुवातहि छान झाली होती हे धागे एकत्र गुंफून...

उघड्या पेनवरची शाई वाळली होती, म्हणून गुरुनाथांनी एक-दोनदा पेन झटकलं व लिहायला सुरुवात केली. एक-दोन शब्द लिहिले व ते अचानक थबकले. अक्षर एकदम मोठं आलं होतं. ऱ्हस्व-दीर्घाचा घोटाळा झाल्यानें मागचा एक शब्द खोडावा लागणार होता. लग्नाच्या तयारीचे वर्णन करीत बसण्यापेक्षा सुजाताच्या मनःस्थितीचं...त्यापेक्षा मुलगी पाहण्याचा समारंभ रंगवून मग त्यांतून...प्रकरणाची सुरुवात निवेदनपद्धतीनें न करतां संवादानें...असच पुढें रेटावं कीं पुन्हा पहिल्यापासून सुरुवात करावी...

कुठें काहीतरी फुटल्याचा पुनः आवाज आला. गवाक्षाच्या काचेवर एक भुंगा येऊन चिकटून बसला. खिडकीतून दिसणाऱ्या अंगणात गरम धुराळा रिंगण धरून फिरूं लागला. पेन मिटवून व कागद दूर सारून गुरुनाथ बावरे झाल्यासारखे सगळीकडे बघूं लागले. मगाचचा कॅफ केव्हाच विरून गेला व हातांतलं बळ गळून गेल्यासारखं झालं. अगदी चुकीच्या मार्गानें कादंबरीचा ओघ सुरू केल्याच त्याना जाणवलं होत व नव कांही सुचावं म्हणून त्यांचं मन चुळबुळत होत. काय लिहावं, कशी सुरुवात करावी, लग्न तर दाखवायच पण...

कितीतरी वेळ गेला अन् पुन्हा कांहीतरी फुटल्याचा आवाज आला. वाकुल्या दाखविणाऱ्या घड्याळाच्या लंबकाकडे खिन्नपणे पाहणारे गुरुनाथ दचकले व कोपऱ्यात बघूं लागले. टेबलामागच्या कोपऱ्यात भातुकली खेळत गुट्टी बसली आहे हें ते इतका वेळ विसरूनच गेले होते. तीसुद्धां किती मुकाटयाने एकटीच खेळत होती. वडील कादंबरी लिहीत होते. आई आंतघरांत घोरत होती. आणि गुट्टी चूल-बोळकीं व बाहुला-बाहुली गोळा करून खोलीच्या एका कोपऱ्यांत भातुकली खेळत होती.

लेखनांतली समस्या विसरून गुरुनाथ गुट्टीचा खेळ पाहत राहिले. बोळक्यांच्या नि बाहुल्यांच्या विश्वांत ती सगळं विसरली होती. डोळ्यांवर येणाऱ्या झिपऱ्या, खोलीत फिरणारा भुंगा, खुर्चीवर बसलेले वडील. छोटया लाल पाटावर तिने बाहुलीला बसवलं होतं. छोटया कपडयांच्या घडया शेजारी करून ठेवल्या होत्या. आणि जुन्या बागडयांचे बारीक तुकडे करून ती ते एका लाकडी बोळक्यांत भरत होती.

कौतुकाने बराच वेळ बघत बसलेले गुरुनाथ एकदम दचकले. "गुट्टी, तूं काचा कसल्या भरतेस? हात कापेल ना!" ते जरा ओरडून म्हणाले.

गुट्टी चमकली. भातुकलीच्या खेळांतून ओरबाडलं गेल्याने जरा फुरंगटली. घसरलेल्या बाहुलीला नीट टेकून ठेवीत पुन्हा काचा जमवूं लागली,

"गुट्टी--"

"बाबा, ह्या काचा त्या बाहुल्याला खायला घालणार आहे. हा बाहुला नाही का इथे- त्याला! म्हंजे तो मरेल. परवा नाही का तुम्ही आईला वाचून दाखवत होतांत— कोण तो काचा खाऊन मेला म्हणून—"

कुठली बातमी कधी वाचून दाखविली तें गुरुनाथना आठवेना. गुट्टीने तेवढयांत काचा दूर ठेवल्या व ती बाहुलीला छोटे कपडे चढवूं लागली. तिच्या डोक्यात आता कांही दुसरंच आलं असावं. बाहुलीला वेगवेगळे कपडे घालून ती पाहात होती. गुट्टीचा हात कापेल ही काळजी मिटली व गुरुनाथानी परत खिडकीकडे नजर वळवली.

बाहेर उन्हाचे उलगडलेले कागद फडफडत होते, कोरे, भकास. दूरून जाणाऱ्या ट्रकचा छापखान्याच्या यंत्रासारखा घडघडाट होत होता, समोरच्या घरात कुणी इसम वाचीत बसला होता. पुढयांतल्या कागदावरच्या पाचसहा ओळी पुसटल्या होत्या. सुजाताच्या गळयांत लग्नाची माळ पडत नव्हती, गुरुनाथांना अजून मार्ग सापडत नव्हता. ते चुळबुळत होते. बोटं मोडीत होते. मनाची एकाग्रता व्हावी म्हणून सुजाताची आकृति आठवीत होते. सुजाता, बाबासाहेब, कथानायक ...कुणीं काचा खाऊन जीव दिला? कुठली बातमी?... सुजाताचा प्रेमभंग, सुजाताचा विवाह... कादंबरीचं नव प्रकरण, प्रकाशकाकडचा चेक... ऑफिसांतल्या नव्या क्लार्कनें प्रेमभंग झाल्यावर जीव देण्याचा केलेला यत्न, सुजाताच्या प्रियकराने वीष खाऊन... होय तसच!

गुरुनाथाचे डोळे किलकिले झाले व मोठे होऊन चमकले. प्रचंड झेप घेतल्यासारखं त्याना झाल व उत्साहाने अनावर होऊन त्यांनी कागद पुढे ओढले व पेन उचललं. एकवार गुट्टीकडं कौतुकान पाहून ते मान मोडून लिहूं लागले. सुजाताचा विवाहसमारंभ सुरू होताच तिच्या प्रियकराच्या मृत्यूची बातमी द्यायची! अन् तिथेच प्रकरण संपवायचं! गुरुनाथ न अडखळता एकसारख लिहूं लागले......

— पण गुट्टीचा खेळ रेंगाळला. बाहुल्याला काचा खायला लावायची कल्पना तिला कशीशीच वाटू लागली. काचा फोडून तिची छोटी बोटंहि करकचली होती, बाहुलीला कपडे घालीत ती विचार करू लागली. बाहुलीला छोटया बाबागाडीत घालायचं व पार्कवर फिरायला न्यायच! तिच्या मामांनीच तिला ती खेळांतली लाकडी बाबागाडी दिली होती. मामा मामी छोटीला गाडीत निजवून असच फिरायला जात... क्षणभरच समोर मांडलेला खेळ विसरून गुट्टीच्या डोळयांपुढे मामामामी उभीं राहिलीं. गुट्टीला पाहिल्यावर उचलून घेणारा, खूप लाड करणारा मामा नि गोरी गोरी, लांब केसाची व माना वेळावणारी मामी मामीच बाळ, त्याच्या इवल्याशा मुठी व लाळ गळणारं तोंड. मामीचं बाळंतपण, डोहाळेजेवण, लग्न...... गुट्टीला वाटलं, आत्ता मामीच्या घरीं जावं नि.. ...

पण मामा लांब, पुलापलीकडे राहत होता. गुट्टीला आता, उन्हाचं कोण नेणार? आई झोपली होती. बाबा लिहीत बसले होते. शेजारची मिनीहि गावाला गेली होती. गुट्टी बिचारी एकटी होती. बाहेर उन्ह तापलं होतं नि दुपार काहीं सपत नव्हती.

गुट्टी पाय पसरून जरा वेळ बसून राहिली. आईनी दिलेले पोहे, दाणे, गूळ अजून सपवायच होत. हॉटेल माडल तर? बाहुलाबाहुली हॉटेलांत खात बसायची, मग पार्कवर

जायची. छे, नेमकं काय खेळावं ते गुट्टीला कळेना! का साधा स्वैपाकच करावा...नाहीतर आगगाडीने सगळयांनी प्रवासाला जायचं ...त्यापेक्षा शाळा शाळा खेळायची नि ...

खाऊच्या ताटलीकडे, भिंतीशी माडून ठेवलेल्या बोळक्यांच्याकडे, बाहुला बाहुलीकडे गुट्टी भिरभिर पाहत होती. काय खेळावं तें ठरत नव्हतं. नवं, निराळं कांही सुचत नव्हतं. कंटाळून गुट्टीने एकदम बाबांच्याकडे पाहिलं.

" बाबा बाबा, इकडे पाहा नं ! "

" गुट्टे, मला लिहूं दे. त्रास नको देऊं..."

" पण बाबा— "

एकामागून एक पानं लिहिणारे गुरुनाथ थबकले. गुट्टीला काय हवंय् हें पाहण्यासाठी पेन ठेवून त्यांनी तिच्याकडे तोंड वळवलं.

" बाबा मी काय खेळू ? "

" भातुकली खेळत्येस ना– " गुरुनाथ म्हणाले. सुजाताच्या बाळंतपणापर्यंत ते आले होते. सुजाताला हॉस्पिटलमध्ये पोचवायची वेळ झाली होती. एक फार महत्त्वाचा पेचप्रसंग निर्माण होणार होता. तिचा प्रियकर मेल्याची बातमी खोटी असल्याचं तिला कळणार होतं. तिच्या नवऱ्याला संशयानें... छे, छे, कादंबरी कशी इंद्रधनुष्यासारखी चढत जात होती.

" पण त्यात काय खेळू ? लग्न, नि स्वैपाक, नि गावाला जाणं –सारखं तेंच तेंच ! – "

" अग, मग दुसरं काय सांगू मी ? –हं, बाहुलीला बाळ झालेलं खेळ नं ! मामीसारखं. मामीच्या छोटीचं बारसं कसं केलं–पाहिलंयस नं तू ? – बाहुलीचं बारसं कर ना ! "

आपण नकळत हें बोललों, गुट्टीला बारसं खेळायचं सुचवलं ह्याचा गुरुनाथना विस्मय वाटला. त्यानी पाहिलं तों गुट्टीला ती कल्पना रुचली होती. टाळी वाजवून तिनें बाहुली उचलली. काड्याच्या पेटीचा पाळणा केला ...

पाहतां पाहतां गुट्टी नव्या खेळांत दंग झाली. बाबानी तिला किल्ली दिली व पुन्हां कंटाळा येईपर्यंत गुगवत ठेवली. गुरुनाथ स्वतःशीच हसले. हसतच त्यांनी टेबलावरचं पॅड उचललं व खुर्चीच्या पाठीवर रेलून ते संथपणें, सुखासमाधानाने लिहूं लागले. कथानकाचा ओघ कितीतरी पुढें गेला होता. सुजाताच्या जीवनांत नवं पर्व घडत होतं नवीन प्रकरण संपत होतं. असंच आणीक एक प्रकरण झाल्यावर आजचं लेखन थांबवायला हरकत नव्हती.

गुरुनाथांनी रमत गमत दोन ताव लिहिले अन् मग ते पुन्हा एकवार थबकले. कथानकाचा ओघ अडखळत नव्हता, पण त्यांच्या मनाने अचानक माघार घेतली होती. दोन प्रकरणांतच इतक्या घडामोडी संपल्यावर उरलेल्या भागासाठी काय उरणार ? कादंबरी चारशे पानांची तरी व्हायला हवी. अन् ही पंधरावीस लिहिलेली पानं फार भडक नाही ना वाटायची ? लग्न, आत्महत्या, संशय–सारं एकामागून एक ! गुरुनाथनी पेन मिटवून ठेवून दिलं व दोन्ही हात वर करून आळस दिला. छे, घाई करून भागायचं नाही नि आळस करूनहि चालायचं नाही...

गवाक्षाच्या काचेवर भुंगा मेल्यासारखा बसला होता. अंगणांतून दिसणारं उन्ह डोकें तापवीत होतं. सगळीकडे कसलासा दबलेला आवाज येत होता. मरगळल्यासारखं वाटत होतं, पण–पण लिहायला हवं होतं ! काय लिहायचं ? गुरुनाथांनी एकदम वळून गुट्टीच्या भातुकलीकडे पाहिलं. इथे कांही तरी दिसेल, कांहीतरी सुचेल...

पण गुट्टी नुसती पाय पसरून बसली होती. पोहे नि गूळ फस्त झाला होता. बोळक्यांची उतरंड घसरली होती. बाहुली कोपऱ्यांत पडली होती. गुट्टी कटाळली होती. तिला तशी बघून गुरुनाथ चमकले. उगाचच खिन्न झाले.

" काय गुट्टी खेळ थाबवलास ? "

" मग आणीक काय खेळू ? तें बारसंबिरसं नको...बाबा, दुसरं काहींतरी सागा नं ? काय खेळूं मी ?"

बोलताना गुट्टी उभी राहिली. बाबा नक्कीच कांहींतरी सुचवतील ! ते नेहमीच कांहीतरी नवं, छानसं सांगतात ! गुट्टीला झोपायचं नव्हतं. आणिक थोडा वेळ तरी खेळायच होतं. बावांनी कांही सुचवलं की... तिने गुरुनाथांच्या अंगावर झेप घेऊन म्हटलं, "सांगा ना मी काय खेळू ? "


गुरुनाथांचा चेहेरा अधिकच उतरला. तशांतहि ते म्हणाले, " मी काय सांगू तुझ्या भातुकलीतलं ? तूं एक एक सांग-काय खेळतां तुम्ही मैत्रिणी तें ! नाही तर मगासारखं कुठल्या बातमीचं कुणी काही बोललं असलं तर ! मग मी सांगेन काय खेळायचं–"

गुट्टी किलकिले डोळे करून आठवू लागली. आईकडे बसायला आलेल्या बायकाच्या गप्पा, मैत्रिणींच्या कुजबुजी, समोरच्या चाळीतलं कांहीं...गालावर मुठी टेकून विचारांत गर्क झालेल्या गुट्टीकडे गुरुनाथ मोठ्या आशेने, अधीरतेने पाहत होते. सुजाताच्या प्रेमभंगापासून तिच्या प्रसूतीपर्यंतचा कथाभाग भडक, घावरा न वाटावा म्हणून कांहीं निराळं सुचणं फार जरुरीचं होतं. लगेच आत्ताच सुचायला हवं होतं. अन् त्यांचं डोकं तर आता जड झालं होतं. कल्पना पंख उभारीत नव्हती. कुठून तरी कथानक गुफायला धागा हवा होता आणि गुट्टीचं वेडंबगडं बोलणं ऐकायला ते आतुर झाले होते.

गुट्टी जरा वेळ वडिलांच्या मांडीवर कोपरं रोवून उभी राहिली. मग तिने एकदम मांडीवर डोकं टेकल. " मला नाही माहीत— " ती गाल फुगवून, जड स्वरांत म्हणाली, " मला कंटाळा आलाय्. मी झोपतें— " तिनें डोळे मिटले. बाबांनी आपल्याला कांही सांगितलं नाही, आपला विसर केला असं तिला वाटलं. बाबांचा, आईचा, मिनीचा, मामींचा, बाहुलीचा—सगळयांचाच तिला राग आला. अन् मग एक मोठी जांभई आली. जांभई संपतांच ती थकून झोंपीहि गेली.

गुट्टीनी जांभई दिली नि गुरुनाथांची लेखनाची उरली सुरली ओढ सरली. तिच्या डोक्यावर ते नकळत थोपटूं लागले व गवाक्षावरचं भुंग्याचं कलेवर व खिडकीबाहेरचा धुराळयाचा मोवरा बघत राहिले. सुजाताच्या आयुष्याचं कोडं अर्धवटच राहिलं. तिच्या प्रसूतिवेदना त्यांना ऐकवेनात, पण मग सुजाताचं अस्तित्वच ते विसरूं लागले. टेबलावरचे कागद, पेपरवेट, पेन सारं निरीच्छेने दूर सारलेल्या जेवणाच्या पदार्थांसारखं वाटू लागलं. खेळातलं, खोटं. सारं अगच एकदम जड झालं व सुस्तीच्या आवरणानें त्याच्या डोळयांपुढे काळोख भरू लागला.






# उघडें जाहलें पाणी!

: लेखक :

दा. सी. देसाई

आंतरविद्यापीठ नभोनाटय-स्पर्धेत या नाटयाला मराठी विभागांत पहिलें पारितोषिक मिळालेलें आहे. श्री. देसाई यांच्या 'सहा साहसें' ( राजहंस प्रकाशन ) या पुस्तकास यापूर्वीच महाराष्ट्र सरकारने पारितोषिक देऊन गौरविलें आहे. त्यांना मिळालेल्या या नव्या यशाबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करतों. हें नभोनाटय मार्च १९६२ च्या नभोवाणी सप्ताहांत पुणे केंद्रानें ध्वनिक्षेपित केलें होतें. नभोवाणीने 'माणूस'ला तें प्रकाशित करण्याची अनुमति दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.



( दरवाजा धाडकन उघडला जातो–बाहेरच्या जोरदार वाऱ्याचा आवाज कानीं येतो. माधव लंगडत आंत येतो. )

**सुधा**–जरा हळू, केवढ्यानं दार उघडायचं तें ?

**माधव**–मुद्दाम का करतोंय् ? तोल गेला माझा—

**सुधा**–मुद्दाम नसेल केलं, पण आवाज व्हायचा का राहतो ? मन्याचा आत्ता तर डोळ्याला डोळा लागलाय ! आणि मी म्हणतें एवढं बाहेर जायचं नडलंय् तरी काय ? पुरानं पाय मोडून ठेवला, पण भ्रमन्ति चुकतीय का त्या पायांची ?

**माधव**–त्या पायांवर वसलेलं पोट त्यांना स्वस्थ वसूं देईल तेव्हा ना—

**सुधा**–इतकं रात्रीपर्यंत भटकावं लागतं वाटतं त्यासाठी ? चार दिवस स्वस्थ पडून राहिलांत तर लगेच कांही उपाशी मरावं लागायचं नाही तेवढ्यामुळे ! उलट जरा विश्रांती मिळाल्यामुळे पाय थोडेसे सुधारतीलच !

**माधव**–भ्रम आहे तुमचा बाईसाहेब ! बारा जुलैपूर्वी असं कांही बोललां असतात, तर ऐकून घेतलं असतं एकवेळ ! पण त्या जलप्रलयानं तें सुख केव्हाच धुवून टाकलं ! ईश्वर-कृपेनं ही खोली तात्पुरती का होईना मिळाली म्हणून डोक्यावर छप्पर तरी आहे आज–नाही तर ऊन-वारा, पाऊस-पाणी अंगावर झेलत ' एक पैसा द्या गरिबाला, मायबाप ! तुम्ही तांब्याचं द्याल, तुम्हाला सोन्याचं मिळेल ' असं करीत दारोदार फिरायचीच पाळी आली असती.

**सुधा**– असलं कसलं अभद्र बोलणं ?

**माधव**–अभद्र काय ? सत्य आहे तें–पुरानं आपले तीघांचे जीव आणि केवळ चाळीस रुपयेच आपल्या हातीं टिकवून आपल्याला घराबाहेर काढलं, याची जाणीव आहे ना आपल्याला ?

**सुधा**–हो. अन् त्यांतले दहा रुपयेसुद्धा आता शिल्लक नाहीत, हेंहि ठाऊक आहे बरं मला.

**माधव**-अन् तरीहि तुला उद्यांबद्दल कांही वाटत नाही ? त्या चार वर्षांच्या मन्याइतकीच निश्चिंत आहेस तूं उद्याविषयीं ?

**सुधा**-खूप काळजी केली म्हणून आकाशांतनं पाऊस का पडणार आहे पैशाचा ? की जमिनींतून झरे फुटणारहेत ? असेल ईश्वराच्या मनांत तें होईल–ज्यानं त्या महाप्रलयांतनं जीव वांचवले तोच ते जगविण्याचीहि चिंता करील !

**माधव**–तत्त्वज्ञान ठीक झालं-पण व्यवहार इतका सरळ नाही. किंबहुना उलटा आहे रक्ताचं पाणी झालं अन् तोंडाला फेस फुटला तरी दोन वेळच्या चिंता मिटत नाहीत या जगांत ! असेल हरी तर देईल खाटल्यावरी म्हणणाऱ्याचं खाटलं चितेवरच मांडलेलं असतं बरं !

**सुधा**–मग करणाराहांत काय तुम्ही ? जीव गेला तरी कोणाची मदत घ्यायची नाही, ही तुमची शपथ ! जवळ दमडी नाही अन् हात पुढे करायचा नाही, जुळावं कसं हें गणित ? रात्री अपरात्रीपर्यंत भटकून का सुटणाराय् तें कोडं ?

**माधव**–मला रात्री यायला उशीर कां होतो, ठाऊक आहे तुला ?

**सुधा**–जाऊन बसत असाल त्या स्मशानांत–शून्य दृष्टीनं त्या जमीनदोस्त घराकडे बघत–लंगडत, लंगडत उकरून बघत असाल अजून कांही हातीं लागतं का ?

**माधव**–बिलकूल नाही ! गेलं तें सारं गंगेला मिळालं असंच समजून चाललोंय् मी ! चार भांडीं, कुंकवाची पेटी, देव्हारा अशा चार-दोन वस्तु मिळाल्या त्या त्या देवतेचा प्रसाद समजूनच घरीं आणल्या अन् पुन्हा चूल मांडली–

**सुधा**–मग कुठे हो भटकत असतां इतका वेळ ? पोर बिचारा इतका वेळ तुमची वाट पाहात बसला होता. शेवटीं तसाच उपाशी पोटी निजला बिचारा–

**माधव**–( हसून ) त्याच सावकाराचं तोंड चुकवायला मी उशीरा येतों !

**सुधा**–मन्या सावकार ? अहो, बोलतां काय ?

**माधव**–नाहीतर काय ? रोज त्याची नवी मागणी––नुसता होकार देऊनहि भागत नाही. वायदा पुरा करण्यासाठी सावकारासारखा दारांत तिष्ठत असतो. ' नाही ' म्हणून किती वेळां सांगणार ?–कसं सांगणार ?

**सुधा**–त्याला का कांही कळतं ?

**माधव**–मागायचं कसं नेमकं कळतं ? आमचंच चुकलं–पहिल्यापासून सवय लावून ठेवली; आता नकार देतांना जिवावर येतं––

**सुधा**–तुम्ही नकार देत नाही––नुसत्या आशेवर झुलवत ठेवतां त्याला––

**माधव**–Hope is poor man's bread ! दिवस तर कटतो नुसत्या आशेवर–

**सुधा**–पण त्याला तें सारं खरंच वाटतं. ' आज आमचे बाबा आम्हाला काय आणणारेत ? ' असं म्हणत तुम्हीं दिलेल्या आश्वासनाची जाहिरात करत दिवसभर हिंडत असतं लेकरूं ! अन् दुसऱ्या दिवशीं लोकांनी विचारलं, म्हणजे हिरमुसला होतो बिचारा––

**माधव**–पण मी काय करणार त्याला ? होतं तेव्हा देत नव्हतों ? नाही तर म्हणतां येत नाही, आणून हातावर ठेवतां येत नाही, अशा कात्रींत बापाचा जीव कातरायला, त्याला बरं वाटतं होय !



**नभोनाट्यांत भाग घेणारे कलाकार**

- हरिभाऊ आठवले
- शरयू सहस्रबुद्धे ( **सुधा** )
- विजया काळे
- दा. सी. देसाई ( **माधव** )

( अनुक्रमे डावीकडून )

**सुधा**–त्याला काय बरं वाटायचं ? वैरी का आहे तो आपला ?

**माधव**–वैरीच आहे ! त्याच्या नव्या मागण्या ऐकायला नकोत म्हणूनच तोंड घेऊन घराबाहेर पळतों मी. चालवत नाही तरीसुद्धा ! अन् तो झोपल्यानंतर घरांत पाय ठेवतों ! वाटतं, दाखवूं नये त्याला हें काळं तोंड–पोराची साधी मागणी पुरी करतां येईना, त्यानं बाप कशाला व्हावं ? बाप ! म्हणे बाप ! ! हं !

**सुधा**–उगीच कशाला डोक्यांत राख घालायची ती ? ... राहूं द्या बरं तें... दोन घास खाऊन–

**माधव**–नकोय् मला जेवायला ! जेवण तरी गोड लागतं का आताशा? घास घशाखाली उतरत नाही... गळ्याशीच घुटमळतो... जेवतांना, उठतांना, बसतांना, झोपतांना तें महापुराचं भयाण पाणी अंगावर चाल करून येतंय् असं वाटतं ... अक्राळविक्राळ आक्रस्ताळे ... पिसाळलेले लक्षावधि हत्ती, क्षितिज फोडून, त्या लाल लोंढयाच्या रूपानं आपल्याला तुडवायला, आपल्या सर्वस्वाच्या चिंध्या चिंध्या करायला धावून येताहेत असा भास होतो. बघतां बघतां आपल्या डोळ्यांदेखत आपलं दुमजली घर त्या पाण्यांत विरून जातं–नांव-निशाणीहि पुसली जाते... चार दिवसांपूर्वी घडलं हें सारं–पण आताच घडतंय् असं वाटून छाती जोरजोरानं धडधडायला लागते–त्यांत आज पिसाट वारा पिंगा घालतोय बाहेर...

**सुधा**–जाऊं द्या बरं तें–आज भात कसा छान झालाय बघा तर खरं–अन् तुम्हाला खरपोडी आवडते ना–?

**माधव**–जाऊं द्या कसं ? क्षणाक्षणाला त्याची जाणीव होतच असते ना ! साधा भात चांगला झालाय म्हणून कौतुक करून घ्यायची पाळी आली आहे तुझ्यावर, तरी हें विसरूं ? त्या वश्या ढेऱ्यानं पत्रांचा ढीग दिलाय––

सुधा–वशा ढेरे ?

माधव–होय वसंत ढेरे–माझा खूप बालपणाचा मित्र ! पोस्टांत आहे नोकरीला. पत्ता मिळत नाही म्हणून डेड लेटरच्या कसाईखान्यांत चाललेलीं आपलीं पत्रं त्यानं स्वतःजवळ ठेवून घेतलीं अन् आज माझ्या-स्वाधीन केलीं.

सुधा–पत्रं ? कुठेत तीं ?

**माधव**–तीं बघ त्या पिशवींत आहेत. पूर आल्यापासून पत्रं मिळत नाहीत म्हणून विवंचनेंत पडली होतीस ना ? तो घे पत्रांचा पूर––आपल्या अस्तित्वांत नसलेल्या घराच्या पत्त्यावर धडक देऊन आलेल्या पत्रांचा हा लडा ! ( पत्रें जमिनीवर ओततो. ) पोटभर पत्रं! पत्रंच पत्रं !

**सुधा**–कोणाकोणाचीं आहेत ?

**माधव**–कोणाकोणाचीं नाहीत तें विचार ! कोणकोणत्या दूरदूरच्या आप्तेष्टांनाहि आपली आठवण झालीय–आपुलकीचा पान्हा फुटलाय! त्यांच्या सहानुभूतीचं धरण ढासळलंय् अन् परवाच्या पुराच्या पाण्या-पेक्षा जबरदस्त सहानुभूतीचा लोट आपल्याकडे वळलाय–या नव्या पुराखाली आपला उरलामुरला जीव गारद करून टाकायला–वाच ना एकेक पत्र–

**सुधा**–तुम्हीं वाचलींत सगळीं ?

**माधव**–दोनच वाचलीं अन् तेवढ्या शितावरून साऱ्या भाताची परीक्षा केली.

सुधा–काय आहे पत्रातून ?

माधव–दुसरं काय असायचं ? आपण पूरग्रस्त ना ? तेव्हा या पत्रांच्या पुरांतून हातच हात वाहात येत आहेत आपल्याकडे–आपल्याला वाचवायला–आसरा द्यायला–या चिखलांतून वर खेचायला ! जो उठतो तो लिहितो– 'पुण्याच्या जलप्रलयाची बातमी वर्तमानपत्रांतून वाचायला मिळाली. फारच भीषण ! आपण नदीकांठी राहत होतां...आपल्या सुरक्षिततेविषयी काळजी वाटते. तरी हें पत्र तार समजून उलट टपाली क्षेमकुशल कळवावं. वाट बघत आहोंत कांही मदत हवी असल्यास, मनांत कांहीहि न आणतां कळवावें. अनमान करूं नये. वाटल्यास सध्या इकडेच राहायला याव— '

सुधा–मग वाईट काय झाल त्यांत ? साधी माणुसकी आहे ही !

माधव–माणुसकी ? सुधे, बोकाळली आहे ही माणुसकी नव्हे, ही मानवता नव्हे–मला हिणवताहेत सारे जण ! सूड घेताहेत सगळे ! आजवर कधी सुतळीचा तोडा घेतला नव्हता मीं कुणाचा ! आजतागायत हात पुढे केला तो देण्यासाठी, घेण्यासाठी कधीच नव्हे ! त्याचा बदला घ्यायला पुढे सरसावतोय् एकेक ! मला कळत नाही होय ?

सुधा–बघावं तें उलटच दिसतं तुम्हाला. कसला सूड घेताहेत लोक अन् कसलं काय ? दुसऱ्या कुणावर अशी आपत्ति कोसळली असती, तर तुम्ही काय स्वस्थ बसला असतात ? कुणाला मदतीचा हात पुढे केला नसतात ? उगाच कां नावं ठेवायचीं

माधव–तूहि त्याना सामील हो. तुझ्याच दादाची धाकटी बहीण ना तू–

सुधा–यात कशाला दादाला आणता मध्ये ?

माधव–वा ! ते तर महाप्रतापी–सर्वांच्या वरचढ ! दोनशे रुपयाची मनिऑर्डर पाठविली त्यानी आपल्या मेहुण्यांना–म्हणजे अस्मादिकांना ! पुरांत बुडालेल्या मला पामराला तारण्यासाठी ! 'आणखी हवे असले तर जरूर कळवा' म्हणून लिहायलाहि विसरले नव्हते राजश्री !

सुधा– मग ?

माधव–मग काय ? तुझ्या भावाला काय वाटलं मी झोळी पसरून बसलोय् ? आल्या वाटेन परत धाडून दिल्या मीं त्या दोनशे रुपडचा.

सुधा–छान केलत बरं, छान केलत ! तरी बर पुरांतन वांचलेल्या चाळीस रुपयाचा खुळखुळाटहि आता फारसा आवाज देत नाही खिशांत ! कोणी सदभावनेन काही केल तरी झिडकारा–अन् शेवटीं या आम्हाला एखाद्या विहिरीत लोटून !

माधव–सद्भावनेन असली तरी ती मदतच होती ना ? या तरण्याताठ्या वयांत दुसऱ्याचा आधार घ्यायची लाज वाटते मला, मग तो कोणीं सदभावनेन दिलेला असो नाहीतर मतलबान.

सुधा:–तरी बरं त्या प्रलयान तुमच्या हातीं निव्वळ शून्य ठेवलय शून्य !

माधव– त्या शून्यामागे अक टाकायची हिंमत आहे माझ्यांत ! मग तर त्या शून्यांत हवा तेवढा अर्थ मावू शकेल ना ? पण मदतीची चटक लागली, लाचार बनून त्या शून्याला मदतीच्या केवढ्याहि मोठ्या आकड्यानं गुणल तरी उत्तर शेवटीं शून्यच येईल, एवढं मात्र ध्यानांत धर !

सुधा–कशाच्या जोरावर बरळतां या गोष्टी ? घर नाही–दार नाही; वाडवडिलार्जित दमडी नाही–होत थोडंस सोनं तें सासूबाईंच्या गबाळेपणामुळे चोरीला गेलं. चांगली नोकरी होती, पण एम्. ए. चा अभ्यास करायचा म्हणून सोडून दिलीत–तेवढ्या वर्षासाठी करून ठेवलीत बेगमी–तीहि त्या पुराला बघवली नाही–जवळ असलेल्या चार रुपयावर फार तर चार दिवस रेटाल–पुढे काय ?–सदा आपला एकच हेका–मोडेन पण वाकणार नाही ! पुढच्या बऱ्यासाठी आज थोडेसे वाकलांत, तर काय बिघडेल तेवढ्यानं ? महापुरें झाडें जाती–तिथं लव्हाळी वांचतीं–

माधव –लव्हाळ्याचच जिणं जगायची हौस असलेल्यानी खुशाल वाकावं अन् जगाव–मला तें जमायचं नाही–कदापि नाही ! (बाहेर गडबड–सुधा काय आहे तें बघायला जाते.)

सुधा–काय झाल बाहेर–बघा तरी–

( बाहेरून आवाज- "माधवराव पुरोहित इथच राहतात का ? " )

सुधा–( बाहेर येत ) अय्या बाबा ? तुम्ही आलांत ? पत्ता कसा मिळाला ? अहो, पाहिलत का बाबा आलेत माझे–

माधव–येऊ देत–पाय जास्त दुखतोय् माझा !

बाबा–असू दे–सगळे ठीक आहांत ना ?... आं ? याच्या पायाला काय झाल ?

सुधा–पुरांत वाहून आलेला पत्रा लागला—खूप रक्त गेलं !

बाबा–मग काय तें इंजिक्शन बिंजिक्शन दिलत की नाही ?

माधव–घेतलं–सगळ काही झालं.

बाबा–अन् लेक कुठाय तुमचा ?

सुधा–त्याचा पाय का स्थिर राहणाराहे घरांत ? सकाळ होते कधी अन् हुंदडायला जातो कधी–शाळेबिळेचा त्रास नाहीच आहे अजून पाठीशी–

बाबा–अग पोरवयच त्याचं! खेळायचाच–तो नाही खेळायचा तर मी म्हातारा का नाचणार बागडणार आता ?

सुधा–तुम्हाला पत्ता कसा मिळाला हा ? आलांत कधी पुण्यात ?

बाबा–आलो पहाटेसच जनतेनं! आलों तो थेट तुमच्या घराकडे गेलों. तिथ कुठं काय होतं ? भोळे पाणावले, पाय थरथरायला लागले. वर्तमानपत्रातनं वाचलेल–पार गोखले हॉलला पाणी लागलं ! मनात पाल चुकचुकत होती तेव्हापासूनच... डोळ्यांसमोर हें दिसलं अन् जीव काही मुठीत उरला नाही ! तुमच्याकडून पत्र नाही, तार, फोन काही होईना ! त्यात मला ताप भरलेला, दमा वाढलेला ! पण तुझ्या आईनं तर त्या दिवसापासून अन्नच वर्ज्य केलय, काहीच पत्ता लागेना, इथ आलों तरी तेंच. पोलीस चौकीवर विचारल, पूरकेंद्रावर विचारलं, ससूनमध्ये जाऊन आलों–कुठे कुठे पत्ता लागेना, शेवटी पोस्टांत गेलों. तिथं एक वसंत ढेरे नावाचा माधवरावाच्या ओळखीतला इसम भेटला.

माधव–वसानं पत्ता दिला तुम्हाला ?

बाबा–हो भारी चांगला दिसला माणूस ! अगदी नकाशा काढून वाट समजावून सांगितली.

सुधा–बाबा, हातपाय तर धुवा ! चहा टाकत्यें, मग बोलूं निवांतपणीं–

बाबा–हातपाय धुऊं ? पाणी तरी आहे का तुमच्या पुण्यांत ? मीं बाटल्या भरून आणल्या आहेत–खायला आणल आहे–तें खा–मग बघूं पुढचं पुढ–

माधव–तुम्हाला काय वाटलं. गेले दोन-तीन दिवस आम्ही अन्न-पाण्यावाचून तडफडून मरतों आहोंत ?

बाबा–तसं नव्हे, पण एकेक नाही नाही तें ऐकलेलं–म्हटलं आपल्याकडून होईल तेवढी काळजी घ्यावी.

माधव–की म्हटलं, उपकार करायला आलांत मरणाऱ्या जावयावर ?

सुधा–असं काय बोलतां कांही तरी ?

बाबा–उपकार कसले माधवराव ? आपल्याच माणसासाठी कांही केलं तर उपकार कसले त्यांत ?

माधव–नाहीतर सांगून ठेवतों आधी–मला कुणाची कवडीहि नकोय ! या जगांत मी जन्माला आलों तो स्वतःचं नशीब बरोबर घेऊन–तें बलवत्तर करायला इतर कोणाचा हातभार नकोय् मला !

बाबा–जावईबुवा, अभिमान वाटतो तुमच्या या बाण्याचा ! कौतुकानं सागतों मी सगळ्यांना तुमच्याबद्दल–

माधव–कोणाच्या कौतुकासाठी मी कांही करीत नाही.

बाबा–नसेल, पण आम्हाला आपलं कौतुक वाटतं. तुमचा हा स्वाभिमान असाच चिरंजीव राहो–पण जरा वेळवखत बघून थोडीशी मुरड घातली त्याला तर–

माधव–तुम्ही मला कांही शिकवायला आलांत ?

बाबा–नाही हो–पटत नसलं तर राह्यलं माझं बोलणं, पण तुमच्या त्या शिवाजी-राजानंच म्हटलं ना हो–" नेहमीच घोडा पुढे फेकतां येत नाही; पाठीशी ढाल बांधून कधी मागेहि पळ काढावा लागतो." अदिलशहाच्या दरबारीं न वाकलेला, आग्ऱ्याच्या दरबारांत–

माधव–इतिहास नकोय मला !

सुधा–काही बोलूं नका बाबा त्यांच्याशी ! तो पूर येऊन गेल्यापासून असंच करतात. सदा तिरसटलेले. थंड डोक्यानं मुळी नाहीच कांही–सदा डोक्यात राख घातलेली. कांही सांगायची सोय नाही––

माधवः–माझं डोकं फिरलय–वेड लागलंय् मला–मग तर झालं ? आणखी डोकं उठवू नका–नाहीतर चालते व्हा कुठे ते, आत्ता–या क्षणाला–

बाबा–माधवराव, माधवराव–असं काय करतां ? जरा स्वस्थ पडाना–मी अगदी एक अक्षर बोलत नाही–मग तर झालं ? पाय फार दुखतो का ?–रागावणार नसाल तर सुचवतों. तुमची युनिव्हर्सिटी महिनाभर बंदच राह्यची आहे ना ? मग महिनाभर तुम्ही तिथे आमच्याकडेच कां येत नाही ?

माधव–मी येणार नाही–तुमच्या लेकीची जशी इच्छा असेल तशी वागायला ती मोकळी आहे–माझी आडकाठी नाही.

बाबा–पण तुमच्या सासूबाई " घेऊन या " म्हणाल्यात ! डोळे लावून वाट बघताहेत साऱ्यांची! तुम्हाला डोळ्यांनी पाहिल्याशिवाय जिवात जीव नाही यायचा तिच्या–माझ्यासाठी नव्हे–त्या माउलीसाठी तरी–तुमच्या आईची आठवण करून–त्या आईसाठी तरी चला–मी शब्द देऊन आलोय तिला–घेऊन येतों तुम्हाला म्हणून !

माधवः–क्षमा करा मला–पण आपली निराशा करावी लागेल मला–

सुधा–कां ? एवढी साधी गोष्टहि तुम्हाला करतां येत नाही ?

माधव–मी तुला कुठं अडवलंय् ?

सुधा–पण तुम्ही कां येणार नाही ?

माधव–तुझ्या कपाळीचं ढळढळीत कुंकू तुझ्या मातोश्रींना दिसलं की मीं निराळं येण्याची कांही गरज नाही ?

सुधा–पण तुमचा पाय दुखावलेला... इथं असं ओल–

माधव–फुटूं देत मला कोंब. तुला नको काळजी. तू खुशाल जाऊं शकतेस.

सुधा–पण तुम्हाला अशा अवस्थेत टाकून मी कशी जाणार ?

माधव–तो तुझा विचार आहे. मी कशाला त्यांत डोकं घालू ?

सुधा–म्हणजे पर्यायानं मीहि जाऊं नये, असंच म्हणा की ?

माधव–मी काहीच म्हणत नाही. माझ्या म्हणण्याचा आणि वागण्याचा तुम्हाला जो कोणता अर्थ लावायचा असेल तो खुशाल लावा. माझा निश्चय पक्का आहे.

बाबा–मी तरी काय बोलणार आतां ? पण माधवराव, हा हट्ट बरा नव्हे–एवढंच वाटतं मला. उद्या तुम्ही माझ्या स्थितीत सापडाल तेव्हा तुम्ही काय कराल, तुम्हाला काय वाटेल याचाहि जरा विचार करा.

माधव–बाबा, भले दिवस असतील तर जावयान सासुरवाडी गाठण्यात गंमत आहे–या पडत्या काळांत तुमच्या छायेखाली येणं–निदान मला तरी जुळायचं नाही !

बाबा–तुमच्यासारख्या विलक्षण माणसापुढे माझी म्हाताऱ्याची मति कुंठित होते ! तुम्ही टाकलेले पेंच सामान्यांना सुटणारे नाहीत–असामान्यांनाहि कसोटीला लावणारे आहेत, पण कसलाहि गैरसमज करून न घेतां तुम्हीं यावं, एवढ मला अजूनहि विनवावंस वाटतं !

सुधा–कशाला बाबा हव्यात एवढ्या विनंत्या-विनवण्या ?

बाबा–पोरीचा बाप आहे मी सुधे ! मला हें असच वागल पाहिजे.

सुधा–बाबा, झोपलेल्याला जागं करतां येईल–झोपल्याच सोंग घेतलेल्याला कसे उठवणार तुम्ही ? तुम्हीं आलांत, आमची भेट झाली, एवढ्यातच समाधान माना आणि घडलं तें सारं आईला सांगा. तिची समजूत घाला, तिला सांगा तुमची लेक, नातु अगदी आनंदात आहेत. लेकीचं सौभाग्यहि पूर्वीसारखच उजळतं आहे !

भागीरथीबाई–( बाहेरून ) केशव हरि पुरोहित इथंच राहतात का ?

माधव–नाही. ते कोकणात असतात. म्हणजे हा पूर आल्यानंतर कोकणांत गेलेत; तोंपर्यंत इथंच–म्हणजे नारायण पेठेंत आमचं घर होतं, तिथं असत !

भागी०–त्यांचा कोणी माधव नावाचा मुलगा आहे म्हणे–

माधव–म्हणे कशाला ? तो साक्षात् तुमच्यासमोर उभाच आहे की !

भागी०–म्हणजे माधवराव पुरोहित म्हणायचे ते आपणच !

माधव–मघाशीच सांगितलं ते कळलं नाही वाटतं आपल्याला ? जरा निराळ्या भाषेंत–अर्थात मराठींतच–पण मीं हेच सांगितलं होत.

भागी०–आपण ७४ नारायण पेठ इथं राहात होतात ना ?

माधव–हो. भूतकाळात जमा झालेली गोष्ट आहे ती. परवा पानशेतच्या पाण्यानंच आमच जुनपुराण घर आणि क्षणापूर्वी तुम्हीं उच्चारलांत तो आमचा कैक वर्षांचा पत्ता साफ इतिहासजमा केलाय् !

भागी०–तरीच ! मी गेलें होतें तिथं–पण मुळी काही ओळखूच येईना !

माधव–पूर्वी कधी आलां होतांत ?

भागी०–नाही बाई! कधी कशाला कारण पडतंय् ?

माधव–मग आज तरी असं काय विशेष घडलंय् ? लग्नाच्या मुलाचा तपास करायला आलां असलांत तर स्वच्छच सांगतों–चार वर्षांपूर्वीच मी चतुर्भुज झालों–ओळखायची निशाणी सौभाग्यवतीच्या गळ्यांतलं मंगळसूत्र बघा आणि शिवाय आमचे ते उपद्व्यापी चिरंजीव—

भागी०–तुमचा गैरसमज झालाय्; सध्याचे हे पुराचे दिवस–लग्नाच्या स्थळांचा का यावेळी विचार करायचाय ?

माधव–म्हणजे आमच्या कोणी आप्तेष्टापैकी एखाद्यानं आमची खुशाली कळवायची वगैरे जबाबदारी तुमच्यावर टाकलीय का ? मग त्याना कळवून द्या–आम्ही सगळे सुखरूप आहोत ! घर वगैरे साफ पाण्याला मिळाल; पण आमच्या सगळ्यांच्या जिवावर त्या पाण्यानं उपकार करायचं ठरविल–म्हणून आम्ही वाचलों, जिवंत राह्यलों–पुढचे त्रास सोसायला !

भागी०–मला जरा बोलू द्याल का ? माझं जरा दुसरच काम होतं—

माधव–तें कोणतं ?

भागी०–माझ्या हातून पाप घडलय् एक !

माधव–मग आमच घर काशी-पढरपूरसारखं क्षेत्र वाटलं की काय तुम्हाला ? अन् पापच फेडायचं तर परवांच्या पुरात कां सोडून दिलं नाहीत ?

भागी०–तसल नाही हो पाप–जरा वेगळच–

माधव–वेगळं ? पाप ? तरीसुद्धा आपण माझ्याकडे कां वळलांत, हें समजलं नाही मला !

भागी०–तुमच्याच हातीं आहे माझं पाप नाहीस करणं !

माधव–बाई, माफ करा ह, पण तुम्हाला कांही वेडबिड लागलेलं नाही ना? कारण असं की, आजतागायतच्या आयुष्यांत मी कधी तुमचा चेहरा स्वप्नातदेखील बघितलेला नाही. एवढंच काय या क्षणापर्यंत तुमचं नांवसुद्धा मला ठाऊक नाही आणि तरीहि तुमचं पाप मी कसा काय बुवा नष्ट करणार ?

भागी०–तेवढाच मार्ग होता म्हणून ना आल्यें तुमच्या दाराशी ? पाप म्हणजे असं की, दुसऱ्याची वस्तु त्याच्या नकळत आपल्याजवळ ठवणं, वाळगणं–हें पापच नाही का ?

माधव–हें पाप कसलं ? हा चक्क चोरीचा एक प्रकार आहे ?

भागी०–तुम्हीं चोरी म्हणा, मी पाप म्हणतें !

माधव–मग त्या चोरीच्या अपराधांतून सुटायला एकच ठिकाण आहे, पोलिस चौकी ! तिथ जा अन् तुमच पाप फेडा. पाहिजे तर एखाद्या वकिलाला घ्या मदतीला !

भागी०–तिथं जायला नको म्हणून तर जिवाचा एवढा आटापिटा केला ना ? तुमचं घर ठिकाणावर नव्हतं, म्हणून पूरकेंद्रांत जाऊन तुमची चौकशी केली ! तिथं पत्ता लागेना तेव्हा पोस्टात गेलें. तिथहि काही दाद मिळेना. पण एवढ्यांत तो पोस्टांतलाच एक जण–कोणी मित्रच आहे म्हणे तुमचा–काय बरं नाव त्याच ?

माधव–वसंत ढेरे असेल !

भागी०–हो हो तेच ते ! त्यांनीच तुमचा पत्ता दिला तेव्हा इथं आलें.

माधव–पण माझा पत्ता अन् तुमचं पाप यांत काय संबंध ?

भागी०–फार मोठा संबध आहे माधवराव !...पण तुम्ही नक्की माधवरावच ना ?

माधव०–संशय असला तर बायकोला बोलावून आणून नांव घ्यायला लावतों. मग तर झालं ?

भागी०–तसं नव्हे, बरं पण जाऊं द्या तें ! तर माझं पाप असं की, मी शनवारांत राहात होतें.

माधव–तुम्ही शनवारांत राहत होतां, हें तें पाप होय ?

भागी०–तसं नव्हे हो, तर माझं घरहि उध्वस्त झाल त्या प्रलयांत.

माधव–मग पूरग्रस्तेला कांही मदत का हवीय ?

भागी०–एकादशीच्या घरीं शिवरात्रीला काय लाभ व्हायचा ?

माधव–मग ?

भागी०–घरांतलं काहीं किडुक-मिडुक मिळतं का हें बघायला मी तिथं गेलें होतें. माझ्या जागी मी उकरत होतें–पलीकडे एक भिकारीण काही-तरी उकरत होती, तिला कांहीतरी सापडलं, तेव्हा ती आनंदानं ओरडली–तिच्या साथीदारणीला तिन हाक मारली–माझं तिकडं लक्ष गेल–तिच्या हातीं एक पेटी होती–ती तिची नव्हती–खात्रीनं नव्हती, पण ती माझीहि नव्हती. चागली वाटली म्हणून मी ओरडलें, “ए भिकारडे, कोणाची पेटी उचलतेस ती ? चल, आण इकडे. का देऊं पोलिसांच्या ताब्यात तुला ? ” त्या बिचारीला वाटलं ती माझीच पेटी–तिनं ती मला देऊन टाकली. चंदनाची कोरीव काम केलेली ती छोटीशी, सुरेख, पण जड पेटी बघून माझ्या तोंडाला पाणी सुटलं. तडक घरी जाऊन मी ती उघडली–आत सोन्याचे दागिने, हिऱ्याची आंगठी–पाप आल माझ्या मनांत–तें परक्याचं धन आपलसं करावं वाटलं.

माधव–तुमची सगळी कहाणी मी ऐकली. तुमच्या सोज्वळ मनांतलं पापहि मला कळलं–पण मी तें कसं नष्ट करूं ? तो चोरीचा माल मला दान करायचा विचार आहे की काय तुमचा ? स्पष्टच सांगतो, त्याच्या वाऱ्यालासुद्धा मी शिवायचा नाही !

भागी०–माझं पुढचं तर ऐकून घ्या. त्या पेटीत एक पत्र होतं–तळाशी ! हें बघा तें–ओळखीचं अक्षर आहे तुमच्या ?

माधव–हो ! हें तर अण्णांचं–माझ्या वडिलांच अक्षर ! अण्णांचं मोडी अक्षर वळणदार, सुरेख आहे. तेंच हे अक्षर–

भागी०–काय लिहिलय् त्यात वाचा बर–

माधव–‘ चि० माधव–माझ्या आयुष्यात तुझ्यापासून लपवून ठेवलेली अशी ही एकच गोष्ट. तू अगदी अडचणीत असशील तेव्हाच ही वस्तु तुझ्या हाती पडावी, अशी अगदी तुझ्या नजरेंत कधीच न येईल अशा रीतीनं मी ही लपवून ठेवली आहे, पण ती तुझीच आहे. तुझ्या आईचे हे दागिने–चोरीला गेले असं सागून मीच लपवून ठेवले होते अन् ही माझी आगठी–हे धन ऐनवेळीच तुझ्या हातीं पडावं ही इच्छा–तुझा अण्णा. ’

भागी०–पुरानं ही पेटी माझ्या हाती आणून टाकली. घ्यावी असं एक मन सागे, पण मनात येई–तुझं कुकू पुसल–सर्वस्व हिरावल गेलं तरी तू जगलीस–नीटपणानं–धडपणानं ! देवानं हातपाय नीट राखलेत. ते वापरलेस तर दोन वेळची पचाईत खास नाही पडायची. खुळ्या लोभानं पाप करायला का प्रवृत्त होतेस ? जें आपल नाही–ते विष–तू ज्याच त्याच्या स्वाधीन कर. पत्रावरून पत्ता कळून घेतला अन् आज हें तुमच्या हाती देतें–माझ्या डोक्यावरचं आकाशाएवढं जड ओझं आतां उतरलं! सांभाळा तुमचं तुम्ही. जातें मी–(जाऊं लागतात)

माधव–बाई, अहो बाई...गेल्याच त्या–अग सुधा, त्या बाईंना

( पान १६ वर पाहा )

# कविता

## आस

श्री

कुबेराचें राज्य
बुडविलें डोहीं
मन तुझ्या ठायीं, अर्पियलें.
होऊनिया असा
शून्याचा मालक
घाली तुला हाक, जीव माझा.
तुझ्यासाठी सारा
लौकिक व्यापार
तुझ्याविण भार, सर्वस्वाचा
पांखरूं मी माझे–
पंख तूं आकाश
तुझें नाम श्वास, झाले माझे
वैशाखीचें ऊन,
तापलेली माती
तुझिया संगती, चांदणें तें
शिंपूनिया रक्त
फुलविली बाग
झालास महाग, तूंच परि
गुंफिल्या माळांचा
करुनिया फांस
लावीन गळ्यास, तुझ्या नामें
तुझ्यासाठी आता,
जगणें मरणें
तुझ्यांत विरणें, आस माझी

## मुक्ता

मधुकर केचे

१

ओळखीचे देठ
असे अचानक जुळले;
सगळें भवताल हिरवळलें
हें झालें अचानक
अचानकच भले!
उण्यापुऱ्या दहा तरी
जन्मांचा हा विरह–
उसळण्याआधीहि असताच तो दुस्सह
तो भडकलाच नाही—
त्या आधीच हें घडलें!

२

खरंच, खरंच
मध्यंतरीच्या विस्मरणाला कोटी–
अब्ज प्रणाम.
तुझं रूप आहे माझ्या ओळखीचं
तुझ्या पहिल्या, अंऽहं–त्या तेव्हाच्या
पहिल्या भेटीइतकं
माझ्या अगदी पहिल्या ओठाइतकं.
दोघांच्या जुळ्या वेदनेस
हवा कशाला आणखी परिचय?
लपूनच दिसणाऱ्या आतूर पोरी
हवाच का हा नवा अनुनय?

( पृष्ठ १४ वरून चालू )

आण...त्या वघ त्या गेल्या त्या–त्यांनी एवढी मोठी ठेव आपल्या हातीं दिली-आपण मात्र—गेली होतीस कुठं तूं ?

**सुधा**–मी अन् बाबा तुम्हाला आलेलीं पत्रं बघत होतों–मामंजींचं –अण्णांचंहि पत्रं आलंयू–कोकणांत जातां जातां कऱ्हाड स्टेशन-वरूनच टाकलेलं दिसतंय्—

**माधव**–वघूं दे–आण इकडे.

**माधव**-( पत्र वाचतो ) "चि. माधव-पुरांत काय झालं तें सगळं चक्षुर्वैसत्यं मीं बघितलंच आहे, पण एक गोष्ट आजवर तुजपासून लपवून ठेवली होती–माझी चंदनाची पेटी–त्यांत हिचे सोन्याचे दागिने, माझी हिऱ्याची अंगठी होती–घराचा सारा चिखल उकरीपर्यंत नीट लक्ष ठेव–तुलाच उपयोग व्हावा ही इच्छा. त्यांत चिट्ठीहि आहे तशी लागते का हातीं बघ. घर सोडतांनाच मीं ती पेटी घ्यायला हवी होती. पण त्या अचानक पुरामुळं मी गोंधळलों–जिथलं तिथंच राहिलं–असलं नशीव तर लागेल हातीं–" (आनंदाने) सुधा, सुधा, ती पेटी सापडली–अण्णांनी पत्रांत सांगितलेली पेटी मिळाली–ही बघ–ही बघ–पुरांत वाहून गेलेली, पण परत मिळाली–त्या बाईमुळें त्या अज्ञात बाईमुळे–एवढं करून ती बाई गेलीच...

**सुधा**–तिचे उपकार चालतील ? अण्णांचे हे उपकार चालतील ?


**बाबा**–माधवराव, जगांत हा चांगुलपणा शिल्लक आहे म्हणूनच माणूस जिवंत आहे ! तुम्हाला उपकार नकोत, पण ईश्वराला ते घडायला हवेत. तुमची इच्छा असो–नसो ते येऊन पडायचेच–आईच्या उदरांतनं मूल रडत बाहेर येतं तें ऋणांचा भारा डोक्यावर असतो म्हणूनच ना ? अहो, समाजांत वावरायचं म्हणजे कुणाला तरी सोसाव लागतं, झिजावं लागतं. देवाण–घेवाण चालू असते म्हणून तर या जगांत व्यवहाराचीं चाकं फिरतीं राहतात. त्यांत उपकाराची भाषा कसली काढतां ? कोण कुणावर उपकार करणार अन् कोण कुणाचे उपकार घेणार ? आम्ही काय कुणाचें खातों रे। तो राम अम्हाला देतो रे......

**माधव**–खरं आहे–बाबा, खरं आहे तें ! "कोणी कुणाचं नसतं तर हें जग चाललंच नसतं" असं कुणींसं म्हटलं आहे तें खोटं नव्हे–मन्या कुठं आहे ? सुधा, चला तयारीला लागा–आपण तुझ्या बाबांच्या बरोबर सातारला जायचं ! आता पुन्हा आपले चांगले दिवस सुरू झालेत– अण्णांचं हें धन–माझ्यासाठी ठेवलेलं...माझं... हो माझंच !...असंच मला कांही मन्यासाठी ठेवायला हवं, नाही ! ...त्याच्या अडचणींत उपयोगी पडेल असं...

**सुधा**–त्या पुरानं दिलेला एवढा धडा तरी अंतःकरणावर नीट कोरला जाऊं द्या म्हणजे झालं, चला, बाबांबरोबर चहा तर घ्या आधी–मी हाक मारतें तोंपर्यंत–मनोहर, ए मन्या......

●●●







# पडछाया

एस. ए. कुलकर्णी

"जुबी, शहनशहाने आज फिर तेजीसे पीना शुरु किया है, सच है न ?"

"जी, मलिका आलम"

"किसने दी शराब ?"

"मुझे मालूम नहीं सरकार !"

"बडे नादान हो तुम सब लोग–उनकी तबीयतकी किसीको फिक्र नहीं है–"

"मेरा कुछभी कसूर नहीं है सरकार !"

"चली जा यहाँसे ! पगली कुत्ती !"

मलिका आलम नूरजहाँने आज अगदी रुद्रावतार धारण केलेला होता. गुलाबाशी सदैव स्पर्धा करणारा तिचा तेजस्वी, मुलायम चेहरा लोहाराच्या भट्टींतल्या तप्त लोखंडाप्रमाणे लालबुंद झाला होता; तिच्या कमनीय भिवया जास्तींत जास्त वक्र बनलेल्या होत्या; तिच्या मनांतील अनावर क्रोध धडधडत्या छातीमधून स्पंदनाच्या रूपाने बाहेर पडूं पाहत होता; कुंदकळ्याना लाजविणारी तिची शुभ्र दंतपंक्ती अधरोष्ठाला सारखी कुरतडत होती; वेगवान श्वासोच्छ्वासाने तिच्या नाकपुड्या थरथरतांना दिसत होत्या-अलम दुनियेंतील सौंदर्याचं प्रतीक म्हणून प्रसिद्ध असलेली नूरजहाँ आज अक्षरशः चंडिका बनलेली होती–आणि याच आवेशांत तिने शहेनशहा जहांगीरच्या दालनांत प्रवेश केला,

शहनशहा पेल्यांवर पेले रिकामे करीत धुंद नजरेनं लोडाशी टेकून बसलेले होते. शेजारी लालबुंद शराबने भरलेली नक्षीदार सुरई होती; शहनशहांना आपल्या अंगावरच्या कपड्यांचीदेखील शुद्ध नव्हती. त्याच्या भरदार व कणखर शरीरयष्टीला एकसारखे हेलकावे बसत होते. सबंध दालनांत दारूचा उग्र दर्प पसरलेला होता. तिथला

तो सर्व अस्ताव्यस्त प्रकार पाहून नूरजहाँचें मार्थे अधिकच भडकून गेलें.

" किसने दी यह शराब ? इतनी कहाँसे लाये ? " शहनशहांच्या खांद्याला आपल्या नाजुक बोटांनी स्पर्श करीत नूरजहाँने कर्कश चीत्कारांत विचारलें.

शहनशहांची नजर भकास होती. आपल्या प्रियमतेचा हा प्रश्न त्यांना प्रथम कळलादेखील नाही. ते तिच्याकडे धुंद नजरेन नुसते पाहातच राहिले. त्यांची मन स्थिति पार पार गोंधळून गेलेली होती.

नूरजहाँने त्याच प्रश्नाची पुनः एकवार अधिक मोठया चीत्कारात तोफ डागली. शहनशहाच्या या शारीरिक व मानसिक दौर्बल्याची तिला आधिकाधिक चीड आली आणि एक प्रकारच्या वैफल्याने तिचें मन काळवडून गेलें; तिचा चेहरा गोरामोरा झाला, डोळे हताश झाले. ती रडकुंडीस आली.

" मैं–मैं–श ऽऽ न ऽऽ शाहा - हूँ–अ ऽऽ लम–दु ऽऽ निया मे–री है–श ऽऽ राबको न ऽऽ दीयाँ हैं–तु ऽऽ म को ऽऽ न पू ऽऽ छती ल– ऽऽ वं– " शहनशहा अक्षरशः आचके देत बोलत होते. त्यांच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या बेफाट बडबडीला थोपविण्याची नूरजहाँने शिकस्त केली. आपली सारी शक्ति एकवटून, आपल्या तळहाताने त्यांचें तोंड तिने बंद करून टाकले. प्रियकराची ही दारुण अवस्था पाहून तिचे डोळे पाण्याने भरून आले– चेहऱ्यावर घर्मबिंदू चमकू लागले, तिच्या हातापायातील सगळें सामर्थ्यच जणू काय निघून गेलें असा तिला भास होऊं लागला. तथापि, तिने अतिशय कष्टाने शहनशहांना तिथेच पलंगावर झोपविलें नि हाक मारली–

" जुबी ! जुबिदा ! "

आपलें थलथलित शरीर कसेबसें आवरत जुबिदा त्या दालनात प्रवेश झाली. नूरजहाँने आपल्या कपाळावर शमर आठया चढवून तिच्याकडे तिरस्काराने एकवार पाहिलें नि ती कडाडली—

" ले जाव वह सुरई यहाँसे ! "

जुबिदाने सुरईला हात घातल्याक्षणी शहनशहा एकदम चवताळून उठले. त्यांनी जुबिदाच्या कमरेत एक लाथ घातली आणि नूरजहाँच्या खांद्याला धरून तिलाहि त्यांनी ढकलून दिलें. या गडबडीत सुरई उडी होऊन आंतली ती लालबुंद मदिरा सबंध तख्तपोशीवर पसरली. एखाद्या व्यक्तीचा खून पडल्यावर आसपास जसं रक्ताचं शिंपण होतं तसं स्वरूप त्या दालनाला प्राप्त झाल. सारा प्रकार तडकाफडकी घडून गेला.

" गि ऽऽ र ग ऽऽ यी–गि ऽऽ र गयी–खैर–अलमारी ऽऽ में अभी बहु ऽऽ त है–तुम को ऽऽ न मुझे रो ऽऽ कनेवाली - " शहनशहा नूरजहाँकडे तुच्छतेने पाहात बडबडत होते.

" चुप रहो ! तबीयत इतनी बिगड गई, फिर भी यह मिजाज ? " नूरजहाँने त्यांच्या नजरेला नजर देऊन खडसावून विचारलें.

" तू ऽऽ जा यहाँ ऽऽ से–मैं तुम ऽऽ से नहीऽऽ चाहता शरा ऽऽ ब मे ऽऽ री रानी ऽ है– तुम को ऽऽ न नादान ल–वं– "

पुनः नूरजहाँने त्यांचें तोंड दाबून धरलें. तिला एकीकडे हुंदका आवरत नव्हता, तर एकीकडे शहनशहांची बाष्कळ बडबड आवरून धरतां येत नव्हती. तिने जुबिदाच्या साहाय्याने त्यांना पलंगावर झोपविण्याची पराकाष्ठा केली. त्या दोघींच्या प्रयत्नांचा कांहीहि उपयोग झाला नाही. ते एकदम उठून बसले आणि त्यांनी नूरजहाँच्या गालावर एकदम चपराक लगावली. त्यांची राठ बोटें तिच्या लुसलुशीत गालावर जशीच्या तशी उठलीं. तिच्या डोळ्यांत अवमानाचा–अवहेलनेचा अंगार धगधगला. ती चटकन मागे झाली. तिचे पाणीदार डोळे डबडबून गेले. हातापायाला मनस्वी कंप सुटला. गदगद्लेल्या स्वरांत ती म्हणाली–

" परवरदिगार ! यही आपकी मर्जी ! मालिक ! कितनी बार आपने मेरी कसम ली और फिर आज तेजीसे पीना शुरु किया ! ठीक है ! जबतक आप शराब नहीं छोडोगे तबतक नूरजहाँका मुहभी नही देखोगे " ती मोठया त्वेषाने बाहेर पडली.

" ग ऽ ऽ यी ल ऽ ऽ वं– " करीत शहनशहा लोडावर कोसळले. बिचारी जुबिदा तेथून केव्हाच पसार होऊन गेली. शहनशहा पुनः धडपडत उठले. आलमारीतून त्यांनी दुसरी सुरई काढली आणि सुरईलाच तोंड लावून ते गटागटा तें विष पिऊं लागले.

शहनशहा व नूरजहाँ यांच्यामधील झगड्याची ही हकीकत साऱ्या राजमहालांत हां हां म्हणतां पसरली. दासदासींमध्ये या प्रकाराची कुजबुजत चर्चा होऊ लागली. कोणी म्हणाले–" नूरजहाँ खरोखरच मोठी कठोर बाई आहे. शहनशहावर एवढं नियंत्रण घालण्याचा तिला काय अधिकार ? काय म्हणे हुकूम -की तिने जेवढी शराब दररोज काढून द्यायची तेवढीच त्यांनी घ्यायची ! नवऱ्याने बायकोवर अधिकार गाजवायचा का बायकोने नवऱ्यावर ? "

कोणी म्हणाले– " बिचारी नूरजहाँ ! शहनशहाची तबीयत चांगली राहावी म्हणून एवढा आटापीटा करते, पण कांहीहि उपयोग नाही. हें शराबीच व्यसनच मोठं वाईट हो ! सुटतां सुटत नाही. पुढं कसं काय होणार कोण जाणे ! "

कोणी चिंताक्रांत नजरेनं म्हणत होतं– " शराबीच प्रमाण कमी केल्याखेरीज राणी शहनशहाला आपलं तोंडहि दाखवायला तयार नाही म्हणे; तिनें शपथ घेतलेली आहे म्हणतात; हा राजाराणीचा तंटा कसा काय मिटणार ? "

कोणी म्हणत होते– " अहो असा झगडा चालून चालून किती दिवस चालणार ? मलिकाला अखेर पडती बाजू घ्यावीच लागणार ! "

कोणी म्हणालं–" शहनशहांनी मलिकाची क्षमा मागितल्याशिवाय ती त्यांच्याशी बोलणारदेखील नाही म्हणे– "

आसमतांत तर्कवितर्कांचें पीक फोफावत चालले. राजमहालांत जिकडे तिकडे भयाण शांतता पसरली. दिवसामागून दिवस जात होते. चांदण्या रात्री निस्तब्धतेंत पाठशिवणीचा खेळ खेळत एकामागून एक सरकत होत्या. मलिका आपल्या दालनातून, गच्चीवरून बाहेर पडायला तयार नव्हती आणि शहनशहा आपल्या सुरईला सोडायला तयार नव्हते. त्यांना यापुढे शराबीचा एक थेंबहि बाहेरून मिळणार नाही अशी कडक व चोख व्यवस्था करण्यात आली होती आणि म्हणूनच, रणांगणावर लष्करी कुमक वेळेवर मिळाली नाही तरी बेपर्वा राहणारा जहाँगीर, आपल्या आलमारीतील शराब संपून गेल्यावर –बाहेरून शराब मिळूं शकत नाही या जाणिवेने हताश होऊन गेला ! त्यांनी खूप आरडा-ओरडा केला; दासदासींच्या नांवाने पुकार केला; त्यांच्या गर्जनेनें सारा राजमहाल हादरून गेला; परंतु त्यांना कोठूनहि, कोणत्याहि प्रकारचा प्रतिसाद मिळाला नाही. जेवण आणणाऱ्या,

दासावर त्यांनी हात उगारला; तारें भराभर भिरकावून दिली. आपल्या डोक्यांत कोणीतरी घण मारीत आहे असा त्यांना भास होऊं लागला. वैफल्यानंतर भावनांचा हलकल्लोळ सुरू होतो म्हणतात, तसंच काहीसं त्यांना वाटूं लागलं.

त्यांच्या मनांत विचार आला, "आपण एवढे मोठे बादशहा, एवढ्या भूखंडाचे अधिपति आणि आपल्याला हवी तेव्हा शराब मिळू नये ? हा कोणता न्याय ? कुठला हा विक्षिप्त कारभार ? या राजमहालात माझी जणू कांहीच सत्ता नाही; सारे त्या नूरजहांचे बंदे गुलाम ! एका यःकश्चित औरतकडून आपला एवढा अपमान ? जन्मदात्या बापाविरुद्ध बड पुकारायला मीं मागंपुढं पाहिलं नाही; अन् ही कोण लागून गेली ?"

बडाच्या कल्पनेसरशी शहनशहा एकदम उठून उभे राहिले; परंतु त्याच्या पायात मोठमोठें गोळे आले. स्वतःच्या पायावर त्याना नीटस उभंहि राहता येईना; डोळ्यापुढे अंधारी दिसू लागली. गेले आठ दिवस त्यानी अहोरात्र शराब पिण्याचा विक्रमच करून सोडला होता, त्याचाच हा परिणाम असावा असं त्याना वाटायला लागलं. तिरिमिरीनं ते पुनः आसनावर बसले.

त्यांच्या मनांत आलं–'काय चुकीचं आहे नूरचं ? आपली एवढी विकलगात्र अवस्था झाली ती शराबीमुळेच ना ? त्यात नूरचा काय अपराध ? तिनं माझ्या तबीयतीसाठीच एवढा आटापिटा चालविला आहे ना?—माझी नूर– माझी प्रिया नूरजहाँ—ती काय यःकश्चित औरत आहे ? ती तर माझा कलिजा आहे ! नूर ! नूर ! !–' त्यानी नूरजहाँला हाका मारण्याचा प्रयत्न केला, परतु त्याच्या तोंडांतून शब्दच बाहेर पडूं शकत नव्हते. घशाला विलक्षण कोरड पडलेली होती. छातीत डावीकडच्या बाजूला किंचित दुखत होतं. ते कसेबसे उठून बसले आणि त्यानी शेजारच्या तिपाईवरील रत्नजडित सुवर्ण झारीतून थडगार पाणी नक्षीदार पेल्यात ओतून घेतलं. पाण्याचा सबध प्याला घशांत रिकामा केल्यावर त्यांना थोडी हुषारी वाटूं लागली.

पुनः त्याना आपल्या प्रियतमेची तीव्रतेने आठवण झाली. गत-आयुष्यातील एकेक घटना त्यांच्या अंतचक्षूपुढे तरळू लागल्या—आपल्या अवखळ तारुण्याचे ते दिवस—थट्टा, मस्करी, खेळ, शिकार, हत्ती, घोड्यावरची रपेट, भरपूर खाण, खूपखूप भटकणं एवढंच आपलं काम होतं तेव्हा. लालबागेच्या त्या तळ्याच्या कांठावर आपण कबुतरं उडवीत, त्याच्याशी गुलुगुलु बोलत उभे होतों. माँसाहेबानी बोलावलं म्हणून निरोप सागावयास आलेल्या त्या सौंदर्यवतीच्या अप्रतिम लावण्यानं *आपण एकदम गारीगार होऊन गेलों—बागेंतलीं* तीं टवटवीत गुलाबी फुलें आकर्षक का हिचा चेहरा आकर्षक ? त्या तिथं घोंगावणारे भुगे आकर्षक की हिचे डोळे आकर्षक ? त्या लुसलुशीत गुलाबी पाकळ्या श्रेष्ठ की हिचे लालचटुक ओठ श्रेष्ठ ? त्या चाफेकळीमध्ये आहे का हिच्या धारदार नाकाचं सौंदर्य–आकर्षकता ? आणि हिचा आवाज तर किती मंजुळ ! नाही तर आमचे ते खाँसाहेब ओरडत असतात ना हातात तंबोरा धरून ! हिचा एकेक शब्द किती अर्थपूर्ण—किती लाडका—तिला पाहून आपल्या मनात असेच काव्यमय विचार डोकावून गेले तेव्हा—

—आपण आपल्या हातांतील ती कबुतरांची जोडी तिच्या हातांत दिली अन् त्याना "नीट साभाळ" अस बजावून आपण माँसाहेबांकड गेलो–

—थोड्या वेळान परत आल्यावर पाहिल तों तिच्या हातांत एकच कबुतर ! आपण विचारलं–"दुसरा कहाँ है ?"

"हाथोंसे निकल गया सरकार !" ती खाली मान घालून शरमिंद्या नजरेनं म्हणाली.

"कैसा ?" आपण थोड्या लटक्या रागानं विचारलं आणि काय गमत ! त्या पोरीन दुसरा कबुतरहि सोडून दिला नि उत्तर दिल– "ऐसा" खूप खूप हसलो आपण.

तीच आपली पहिली ओळख ! तेंच प्रथमदर्शनी प्रेम ! त्या भूतलावरच्या परीनं या सलीमला एका क्षणांत जिंकून टाकलं–मन हिरावून घेतलं !

––आणि नूरबरोबरची ती पहिली रात ! "ओऽऽह !" शहनशहा एकदम बेचैन होऊन गेले.

—नूरजहाँला प्रथम आपल्या बाहुपाशात आपण ओढलं तेव्हा सारी दुनिया जिंकल्याचा आनद झाला आपणाला. जहाँगीर हें नाव त्या दिवशीं सार्थ वाटलं. तिच्या मादक *डोळ्यातली अपूर्व जादू न्याहळीत सारी रात* आपण अक्षरशः जागून काढली. जेव्हा जेव्हा तिच्या डोळ्यांकडं आपण पाहात असूं तेव्हा तेव्हा नवें सौंदर्य, नवें तेज, नवे आकर्षण, नवी नवलाई, नवी जादू आपल्या अनुभवाला आली. तीच जादू आजहि नूरच्या पाणीदार डोळ्यांत आपणाला आढळून येते ! आपण नूरसाठी अगदी वेडे होऊन गेलोंत—अशी तेव्हा सर्वांनी आपणावर टीका केली—

आणि काय खोटं होतं लोकांचं ? तिच्याशी निका लावून इतकीं वर्षं लोटलीं तरी तिचं वेड आपल्यांत कायमच आहे ! माझी नूर ! माझी प्रियतमा नूर–!

शहनशहा आपलं कपाळ हातानं आवळीत हळू हळू पुटपुटत होते. पण पुनः त्याचं मन त्यांना सांगू लागलं–नूरच्या सौंदर्यानं, तिच्या प्रेमानं आपण वेडे झालों म्हणून का तिनं एवढा गैरफायदा घ्यायचा ! आपण काय खावं, काय प्यावं, किती खाव, किती प्यावं ? यावरहि तिचं नियंत्रण ! जहाँगीर म्हणजे काय तिला कुकुलं बाळ वाटल ? बायकांचे फाजील लाड केले की त्या डोक्यावर चढून बसतात म्हणतात हेंच खरं–

शहनशहानी पुनः उठून पाण्याचा दुसरा प्याला घशांत रिकामा केला. त्यांच्या घशांतली जळजळ कमी होत चालली, तरतरी वाटू लागली; नूरजहाँच्या आणखी आठवणी त्यांच्या मनांत डोकावून गेल्या–

आपण गेल्या वर्षीं अगदी विछान्यावर खिळून पडलों; अगदी जिवावरचं दुखणं होत ते– आपल्या दरबारी हकीमानी प्रयत्नाची शिकस्त केली, पण खरी कमाल होती नूरची–रात्रीमागून रात्री तिनं जागून काढल्या. आमच्या उशाशी बसून–रडून रडून तिचे डोळे सुजून गेले होते. सुकून गेले होते. आपल्याला बर वाटल्यावर आपण नूरच्या गळ्याची शपथ घेऊन दारू न पिण्याचा कबुलीजबाब दिला; अर्थात् बिलकुल नाही असं नाही ; पण ती स्वतः जेवढी मोजकी काढून देईल तेवढीच !

परंतु पुन. आपण घसरलों. नूरचा–तिच्या शपथेचा विसर पडला. केवढा दुबळा मी ! केवढा पतित ! माझ्या कलिजाच्या शपथेच महत्त्वहि मो ओळखल नाही—आणि त्या दिवशी तिच्या कोमल गालावर मीं हात टाकला ! ओऽऽ ! ज्या माझ्या हातांनी तिला कवटाळण्यात स्वर्गीय सुख अनुभवल, त्याच हातांनी *तिला निष्कारण शिक्षा करावी ! ज्या गाला-*वर ओठ टेकताना आपल्याला अलम् दुनियेचा

विसर पडला, त्या गालावर एखाद्या लहान मुलाच्या तोंडात द्यावी त्याप्रमाणे आपण चपराक लगावली ! —माझी नूर ! माझी प्रिया ! माझी राणी !—

शहनशहांच्या डोळ्यात अश्रु तरळून गेले. त्याच वेळी त्या दालनांत कोणींतरी प्रवेश केला. शहनशहानी मान वर करून पाहिल—जुबिदा होती ती. शहनशहा रडत असलेले पाहून ती विस्मयचकित झाली होती.

" कहाँ है मलिका जुबी ? "

" अपने कमरेमें सरकार ! "

" यहाँ नहीं आयेगी ? "

यावर जुबिदाने निराश नजरेने मान हलविली. शहनशहाच्या जिवाची तगमग तिच्या लक्षांत आलेली होती. एक क्षणदेखील मलिकाला न विसणारे शहानशहा गेले दहा—बारा दिवस कसे गप्प राहिले याचंच तिला कोडं वाटलं होत.

जुबिदानं शहनशहाच्या या अवस्थेची सर्व हकीगत मलिकाच्या कानावर घातली. 'नूर—नूर ' म्हणून ते रडत असलेल आपण प्रत्यक्ष पाहिल असं जेव्हा तिनं मलिकाला सांगितल तेव्हां मलिकाच्या डोळ्यांत अश्रूंची गर्दी उडाली ! पण " जल्दही वह नेक बन जायगा " एवढंच म्हणून ती तिथून दूर झाली.

नूरजहाँनं जुबिदाला अशा रीतीनं एका क्षणांत डावलल खरं—पण ती आत आपल्या बिछान्यावर जाऊन पडली नि उशीत तोंड खुपसून मुसमुसून रडू लागली. तिच्या मनात आल—आपण याच क्षणीं शहनशहाच्या दिवाणखान्यात जाऊन त्याचे पाय धरावेत नि त्यांची क्षमा मागावी—त्याच्या बाहुपाशात विरहदुःखाचा शेवट करावा.

दुसऱ्याच क्षणी तिला वाटलं—' मीं काय म्हणून क्षमा मागावी ? माझी काय चूक ? माझ्या शपथेचा त्यांना विसर पडला-अर्वाच्य शब्दानी त्यानी माझा अपमान केला—एखाद्या बाजारबसवीच्या अंगावर हात टाकावा त्याप्रमाणं त्यानी आपल्या थोबाडीत चपराक लगावली—तरीहि मीं क्षमा मागावी ?—'

—पुनः तिचं मन म्हणूं लागल— ते काय शुद्धीत होते का तव्हा ? त्याच किती प्रेम आहे आपल्यावर ! त्यांना सोडून मी कशी जगू ? लतिकेला वृक्षाचा आधार नसेल तर ती उभी तरी राहील का ? त्याची तब्बीयत इतकी तोळामासा बनली असताना आपण त्याच्यापासून दूर राहावं ? त्याच्याशी अबोला धरावा ? दासदासी त्यांचं कितीसं करतात ? मायेच्या माणसाच महत्त्व वेगळंच आहे. त्यांना कोण समजावणार ? कोण त्याच्या जेवणाखाण्याची पर्वा करणार ? ते रडतात म्हणे ! त्यांच दुःख मीं कमी करायला नको का ? '

या प्रश्नाचं उत्तर तिला सापडेनास झालं. आपल्या प्राप्तीसाठी स्वत:चा जीव धोक्यांत घालणाऱ्या तरण्याबाड सलीमची रुबाबदार छबी तिच्या डोळ्यापुढे उभी राहिली.—'मोठ्या घराण्याच्या-खानदानीच्या अहंकाराने भारलेल्या अकबर बादशहाने आपल्याला सलीमपासून दूर करावं या उद्देशानं शेरच्या कचाट्यात ढकलल—पाण्याबाहेर काढलेल्या माशाप्रमाणं आपला जीव तळमळला—आपण सलीमकड गुप्त संदेश धाडला आणि अखेर आपल्या प्रियकरान आपली सुटका केली—किती मिनतवारीन ! अंगाखांद्यावर तरवारीच्या जखमांच लेण स्वीकारून त्यानं आपली सुटका केली—आपल्याला बाहुपाशांत घेताना सलीमला आपल्या अंगाखांद्यावरच्या जखमांचदेखील भान राहिलं नाही—अशा थोर प्रेमवीराशी आपल हें वागणं रास्त आहे का ?—नाही ! नाही ! आताच मी माझ्या सरकारकडे जाणार नि त्याच्या मिठीत सारं दुःख विसरून जाणार—'

पण पुनः तिला शहनशहाच्या विपरीत व्यसनाची आठवण झाली.— ' यह ऐसाही चलेगा तो खावदका कलेजा जल जायेगा'-हा हकीमसाहेबांचा इषारा तिला आठवला. ' त्याच्या तबीयतीसाठी आपण विरहव्यथा सहन केली पाहिजे ! ' त्यांना नक्की पश्चात्ताप होत असेल ! त्याचं भावनाप्रधान मन आपल्या परिचयाचं आहे. विरहव्यथेनच त्यांना शराबीचं विस्मरण घडेल !—

—तिच्या मनांत निश्चय बिंबत होता, पण तिचे हुदके तिला आवरत नव्हते.

मलिकाचे हुंदके जुबिदाच्या कानावर आले. आपापल्या दिवाणखान्यात बसून एकमेकाच्या नावानं पुकारा करणाऱ्या व हुंदके देणाऱ्या या राजदपत्यामध्ये कसा समेट घडवून आणावा या विचारानं ती त्रस्त झाली. सारा दिवस तिनं खूप खूप विचार केला नि—दुसऱ्या दिवशीं सकाळीं शहनशहाच्या दालनांत तिनं भीत भीत प्रवेश केला. " शहनशहांनी मलिकाची क्षमा मागावी व तंटा मिटवावा " अशी तिने हळुवार सूचना केली.

" क्या कहती है पगली तूं ? मैं उनकी माफी माँगू ? होशमें हो न तुम ? " शहनशहांनी क्रुद्ध नजरेनं विचारलं. जुबिदा घाबरून गेली, पण तितक्याच धाडसानं तिनं उपाय सुचविला.

मलिका संध्याकाळीं जेव्हा गच्चीवर उभी असते, तेव्हा शहनशहांनी तिच्या पडछायेला स्पर्श करून माफी मागायची—यांत शहनशहांचा अपमान कोणता ?—

—जुबिदाची ही सूचना जहाँगिरला आवडली. ते खुदकन हसून म्हणाले, " ऐसाही होगा जुबी ! तुम बडी होशियार हो ! "

—आणि त्या दिवशीं सध्याकाळीं आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणें मलिका आपल्या गच्चीवर उभी होती. समोरच्या बागेकडे ती भकास नजरेनं पाहात होती. डोक्यांत शहनशहावांचून दुसरा विषयच नव्हता. तोंच पाठीमागे कपड्यांची सळसळ ऐकू आली. तिला वाटलं जुबिदा असेल.

" क्या खबर है जुबी ? " तिनं मागे न पाहतांच सवाल केला. उत्तर आलं नाही. तिनं मान वळवून मागं पाहिलं—आणि ती आश्चर्यचकित झाली.


" आप ! आप ! यहाँ जमीनपर क्या कर रहे हैं मालिक ? "

" मेरी नूर मुझपर नाराज बनी है, वह मुझे देखनेभी तैयार नहीं. उनकी परछाई यहाँ है, परछाईसे माफी माँगता हूं " शहनशहा गदगदलेल्या आवाजांत म्हणाले.

" ओ ऽऽ ह! ये बात ! चलीये अंदर "——ती खुदकन हसून म्हणाली. तिने शहनशहाना आपल्या दिवाणखान्यात नेलं. ती एकदम त्यांच्या गळ्यात पडून म्हणाली—

" क्यो सताते हो मुझे ! आपकी तबीयतके लियेही मुझे यह बहाना बनाना पडता है नूरजहाँका परवरदिगार तो यही है—मेरे ताज —नूरजहाँका जहाँ इस सीनेमें है—कैसे बताऊं मालिक ! कैसे बताऊं ! "

आणि दोघांच्याहि डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या.



# क वि ता

## पाहुणी आलीस का !

पाहुणी आलीस का,
वेदना भोळ्या जिवाची
होउनी गेलीस का !

दोन वाक्यें , दोन भेटी
हेंच होतें का ललाटीं
गुंफुनीही दोन ओळी
गुंफितां गेलीस का ! ॥ १ ॥

लेउनी लावण्यता ही
यौवनाचा कुम्भ डोई
हिंदळोनी चिम्ब ओली
स्पर्शुनी गेलीस का !॥२॥

लोटितां तूं बंद दारें
एक झाले दो किनारे
उम्बरा ओलांडुनीही
मागुती गेलीस का !॥३॥

भावनांची सावुली ती
लोचनांच्या आंत होती
पापणीने पालवोनी
नाहिशी झालीस का !॥४॥

मोगरा स्वप्नीं फुलावा
गन्ध कां मागें उरावा
भास हा की; तो कळेना,
गन्धही नेशील का ! ॥५॥

— शान्ताराम भास्कर.

## चालणें, चालणें !

फुललें, वठलें मथुरेचें वन
निसटलें, गेलें हिरवें दर्शन
हंसलें, वाळलें गोड वृन्दावन
झडलें, उरलें रितें चैत्रांगण
रेखलें, मिटलें श्रावणाचे रंग
आलें, आणि गेलें सावळे रंग
फिरलें, नाचलें मोराचें पाऊल
ऐकली, विरली मेघाची चाहूल
सरलें, सरलें पाहणें, पाहणें
उरलें, उरलें चालणें, चालणें

नरेंद्र पराडकर.

## युग झालें राधापण--

कांठ रिता यमुनेचा
माठ शिरी पाण्याचा
नाद मंद नूपुराचा
भास दिवा–स्वप्नाचा
आज खुळ्या वाऱ्याला
साद हवा मुरलीचा
बावरलें मी वेडी
कृष्णसखा येईना
युग झालें राधापण
वाट अशी बघतांना

रमेश सुळे.

# चैत्रपुष्प

मधुकर केचे

सरिता पदकी

गेल्या तपातील नवीन कवितांच्या ओळींतले एखादें काव्य वेगळें दाखविण्याचा प्रयत्न करतांना बरीच पथ्यें पाळावी लागतात. कित्येक गाजलेले कवि व त्यांच्या गाजलेल्या कविता याचा वेगळेपणा एकदम दिसून यायला ताण पडतो. अनेकदा तर सारख्या तोंडावळ्यामुळें त्या जुळ्या बहिणींसारख्या कविता एकमेकींपासून अलग करतांच येत नाहींत. हा वास्तविकपणे दोषच; पण गमत अशी की, प्रतिमा–कल्पनांचा हा 'तोचतो' पणाच फॅशन म्हणून गाजला. जो उणेपणा ठरायचा तोच अनेक अनवधानांमुळें गुण होऊन बसला. त्यामुळेंच असेल कदाचित्, पण त्या वादळाच्या एकाच तालावर साऱ्या काव्यवल्ली डुलत, हालत असतांना कोपऱ्यांत पडलेल्या कांही वेगळ्या रचनाकडे कोणा रसिकाचें फारसें लक्ष गेलें नाही सरिता पदकीवर हाच अन्याय झाला.

सौ. सरिता पदकी याचेवर अन्याय झाला असे म्हणत असतांना त्यांना कोणीं अनुल्लेखाने मारलें असे येथें सुचवायचें नाही. म्हणायचें एवढेंच की, त्याचा उल्लेख, त्याचा गौरव व त्याचें कवींमधलें स्थान हें इतराच्या पैकी एक–फॅशनवाल्यापैकी एक– हें ठरलें. सत्यकथादि मासिकांतल्या एका साच्यामधून बाहेर पडलेल्या मान्यवर कवींपैकी एक येवढाच तथाकथित सन्मान त्यांच्या वांट्यास आला. हा सन्मानच त्यांच्या वेगळेपणाच्या आड आला असें म्हणण्याचें धाडस करावेसें वाटतें. आज सुदैवानें सत व पत कवींशी उघड नातें बोलून दाखविण्याची सोय होऊं पाहत आहे; मान्यवर टीकाकर्ते या ना त्या कारणानें पुन्हा जुन्याकडे वळत आहेत. याचाच अर्थ त्यांना सध्याच्या (त्यानीं पर्यायानें उत्तेजन देऊन जगवलेल्या) कवितेचा थांवलेपणा जाणवत आहे व नवनवोन्मेषानी बहरलेला उपेक्षित वेगळेपणा ते हुडकूं पाहत आहेत. अशा शुभारंभाच्या वेळीं जर मीं सौ. सरिताबाईंच्या कवितेचा वेगळेपणा नम्रपणें पुढें ठेवला. तर आजच्या महान टीकाकारांची ती अल्पशी सेवाच होईल असें वाटते.

## गुदमरलेलें वेगळेंपण

त्यापूर्वी हें मात्र एकदम मान्य कीं, सरिताबाई यांना स्वतःच्या वेगळेपणाची म्हणावी तशी जाणीव असलेली दिसत नाही. गेल्या तपांतील प्रतिमा, कल्पनाच्या व रचनेच्या कविप्रिय तऱ्हेला त्याहि बळी पडल्या असा भास अनेकदां होतो. त्यामुळें त्याचें स्वतत्र व्यक्तित्व पुरेसा वाव न मिळाल्यामुळे कवितेंत अस्पष्ट रूपाने वावरतें. अनेकदा तें गुदमरतें, पण मरत मात्र नाही. अगदी गुल्मोहोराइतके 'ठसठशीत रगाचे वसंतवैभव लेण्याचा जोम त्यांतून उसळूं पाहतो, पण या गुल्मोहराला 'चैत्रपुष्प' या नांवाने वेषातर करून वावरावें लागतें. मग चित्रकारापासून रसिकापर्यंत चैत्रपुष्पांत गुल्मोहोराचा चेहरा पाहण्याचें प्रत्येकजण विसरून जातो. हा झाला त्यांच्या व्यक्तित्वाला बाहेरचा अडथळा, पण अडथळे प्रमुखपणाने स्वत· रचनाकर्तीचेच आहेत. पुष्कळदा वाटतें की, मान्यवराच्या काल–परवापर्यंतच्या वादळांत लहानांना आपलें असले–नसलें वैभव दडवून ठेवावें लागलें. प्रत्येकच कवि आपला स्वत.चा, प्रामाणिक, अनेक प्रमाणांत वेगळा, विशिष्ट व मोलाचा ठरूं शकणारा अनुभव झाकून ठेवून सत्यकथेंतल्या ठळक कवींसारखा अनुभव घेण्याची व त्यांच्याच चालीने चाल चालण्याची तालीम आपल्या मनाला देऊ लागला. येथे सरिताबाईंच्या बाबतीत सुदैव येवढेंच की, त्या अजिबातच हरवल्या नाहीत. गेल्या तपाचा सारखेपणा गृहीत धरूनहि त्यांत स्त्री व पुरुष असा एक वेगळेपणा दाखवतां येईल. विशेषत: इंदिराबाई सत यांच्या रचनेने तो सिद्धच होईल. सौ. सरिताबाईंमध्येहि वेगळेपणाचा सोस आहे व रूढ अभिव्यक्तीच्या बाहेर कोणी तुटकाफुटका प्रयत्न केला, तर त्याचें कौतुक करण्याइतकी नव्याची ओढ आहे ही गोष्ट 'दिंडी गेली पुढे' च्या कर्त्याला उमगली होती. म्हणूनच आपल्या छोटयाशा पुस्तिकेची पाठराखण करण्यासाठी त्याने बाईंकडे धांव घेतली होती. ही वाङ्मयीन आपुलकी 'अहो रूपं' न ठरण्याचें कारणहि हेंच की, त्यांत रूढि तोडण्याच्या प्रयत्नाना प्रोत्साहन देण्यापलीकडे कसलाहि स्वार्थ नव्हता. जिने हें एवढें केलें तिच्याहि भावदर्शनाचें वेगळेंपण कोणीं करावें–माझ्यापेक्षा अधिक समर्थ माणसाने तें करावें ही इच्छा मनांत धरून–तें पूर्णांशाने होईस्तो मीच सौ. बाईंचें–नव्हे–मराठींतील तगूं पाहणाऱ्या वेगळेपणाचें पूजन करतों.

सत मीराबाईंच्या कवितेंत 'तात–भ्रात' सोडणारा जो निस्सगपणा आहे त्याची धुदी चैत्रपुष्पाच्या कर्तीने प्राशन केल्याचे पुरावे कितीतरी मिळतील. व्यवहारांत चारजणींसारखें निमुटपणाने वावरणारें एक व्यक्तिमत्त्व, कवितेत मात्र व्यवहाराकडे उदास डोळयांनीं व चिडून पाहतांना आढळतें. मुक्त झाल्याचा प्रत्यय येत नाही, पण शृंखला तोडण्याचा आवाज मात्र रसिकाला एक अनाकलनीय कासाविशी देऊन जातो. कुठली तरी अतृप्ति, कुठली तरी ओढ त्याना मीरेच्या निस्संगपणाकडे खेचून नेते. या संदर्भामुळें मग त्यांच्या अनुभवाच्या आटोक्यांत आलेल्या नेहमीच्या उपमांना व प्रतिमांना वेगळे अर्थ येऊं लागतात. त्यांचें मन घुगुर होतें. हा घुगुर सगीत क्षेत्रांतला नित्याचा

छून छुन अर्थ घेत नाहीं. तो नेहमीच्या व्यवहारांतले नातें बोलताना एकदम मुका होतो. त्याची शब्दक्षमता मीरेच्या गिरकीतून तुटल्यामुळें बधिर होते आणि ही बधीरताच, लय हरवून बसण्याची त्याची अशक्यताच सौ. सरिताबाईंच्या एका सचेतन कासाविशीचा प्रत्यय देते. मीरेच्या विषाचा माज मागणारें त्याचें मन एका अपयशाची जाणीव देते व त्या जाणिवेच्या पार्श्वभूमीवर मग त्याचें जें जें विश्व उमटतें तें सारेंच चैत्रपुष्पाची रग भिनलेलें वाटतें. त्यांच्या मुकलेल्या ओठाना, मुक्या गीताला, भित्रेपणाला नेहमीचे अर्थ स्पर्श करूं शकत नाहीत.

त्याच्या निस्संगपणात संतांचा आव त्या स्वतः आणीत नाहीत, सामान्याची शिथिलता त्या कबूल करतात, म्हणूनच त्यांची तळमळ खरी वाटते. मीरेसारखें माहेर मिटण्याच्या, स्मृति कुतलात माळण्याच्या ठरवणुकी कशा एकदम फिसकटतात आणि मृत्यूच्या सादानिशी परसांतल्या केळीला विळखा घालून एकलेंपणच कसे नशिबांत येतें त्याचें अत्यंत सार्थ पण जिव्हारी लागणारें एक चित्र त्यांनी रंगवलें. मीरेचें अनुकरण न करतां मीरा पचविण्याचा हा प्रयत्न निरागस आहे.

**' गोपी ' होण्याची धडपड**

याच संदर्भातील गोपी होण्याची धडपड करणारी एक कविता पुस्तकाच्या शेवटी ओवली आहे. मीरेच्या कवितेसारख्या वागणाऱ्या कविता फार लवकर मान्यता पावतात, पण सरिताबाईंची ' प्राक्तन ' ही कविता तशा मोठ्या घरी नातें लावणाऱ्या अनुभवांचा दभस्फोट करते. अर्थातच हे एवढेंच काम ही कविता करीत नाहीं. आपलें अपयश रंगवतांना सृष्टीपारच्या रंगाची ओढ घेऊन रक्तबंबाळ व अपमानित होतांना सरिताबाई फार यशस्वी होतात– त्या प्राक्तनमध्यें फारच यशस्वी झालेल्या आढळतील. काव्याचा विषय आहे अपयश, पण हें अपयश व्यवहारांतलें नव्हे. म्हणून त्याला व्यवहारापेक्षां वेगळा व वरचा दर्जा आपोआप मिळतोच. शिवाय जेथें काव्यविषयापेक्षां कलाकाराच्या *सामर्थ्याला मोल दिलें जातें तेथें या 'प्राक्तन'* कवितेंतल्या अपयश या विषयापेक्षा तें चितारतांना उपयोगी ठरलेल्या कलेला स्वाभाविकच मुख्य महत्त्व लाभतें. कलेच्या पलीकडे शिवाय त्या अपयशाची महानता व पावित्र्य उरतेंच.

पुन्हा एक वाटते कीं, विश्वापारच्या महानतेकडे वळणारें त्याचें मन व त्यांतलीं पवित्र तळमळ फारशी स्पष्ट उमटली नाही. जांभळ्या भावना आणि पिवळ्या की हिरव्या इ. दुपारी वगैरेच्या उबग आणणाऱ्या शब्दझंजेच्या काळांत स्वतः सरिताबाईंनाहि आपल्या अनुभवांना पेलू शकणारे शब्द सांपडले नाहींत—

' तुझिया समर्थ हांकेनें विरावें तुझ्या मी निळ्या आलिंगनीं '

ही ओळ अजूनहि स्वत.च्या योग्यतेची जोरदार अभिव्यक्ति मागते ' सारखें रक्तामध्यें आभाळ हांका मारते ' अशी एका वऱ्हाडी कवीची ओळ आहे. तिच्याहि बाबतीत अभिव्यक्तीतली अतृप्तता मला जाणवून गेली होती. कदाचित असेहि असेल की, शब्द धिटे पडणें, नकली वाटणें, स्वतः कवींनाहि अभिव्यक्तीचा खुरटेपणा जाणवणें या न संपणाऱ्या पण प्रगतीच्या खुणा असतील.

संत मीराबाई ( तिचें आध्यात्मिक मोठेंपण मान्य करूनहि ) पुष्कळदां वास्तवाच्या आटोक्याबाहेरची वाटते. ती घेऊं *पाहात असलेली झेप अनेकदा ती घेण्यापूर्वीच* घेतल्याचा भास निर्माण होतो. तशा क्षणाना कवितेमुळें येणारी सवेदना संपल्यासारखी वाटते, पण तिच्यापेक्षा लहान असल्यामुळेंच व आपल्या ' अभुक्त शेजसुळां 'ची जाणीव असल्यामुळेंच सौ. सरिता पतकी या युगाची झेप घेऊन जखमी होणाऱ्या मराठी मनाला जवळच्या वाटतात. ●●●

**चै त्र पु ष्प**
**सरिता पदकी**
**प्र. ज्ञानराज प्रकाशन**
**मूल्य दोन रुपये : पृष्ठें ८४**

# नाना अडणविसांच्या कथा

**: १ :**

पेशवाईच्या अस्तकाळीं इंग्रज वकिलांच्या येरझारा वाढलेल्या होत्या.

एकदा इंग्रज वकिलाला नाना अडणविसानें जेवायचें निमंत्रण दिलें. जेवण पेशवाई पद्धतीनें केळीच्या पानावर, चटण्या, कोशिंबिरी, पक्वान्नें अशा साग्रसंगीत पद्धतीने वाढलें होतें. साहेबांशीं जेवणापूर्वी गप्पा मारतांना इंग्रज वकील *नानाला म्हणाला—*

" आम्ही नेहमीं सत्याकरतां, न्यायाकरतां झगडतों. आमचीं सैन्यें लेफ्ट–राईट या तालावर चालतात. पहिला पाय जें त्याज्य आहे, To be left त्याच्यावर आणि दुसरा–सत्याकडे– *To the right*— "

इंग्रज वकिलाच्या बोलण्यावर नाना म्हणाला— " जगात निर्भेळ सत्य नाहीं, तसेंच सर्वस्वी त्याज्य गोष्टीसुद्धां क्वचितच असतात. "

इंग्रज वकिलाचा व नानाचा यावर वाद झाला. तोंपर्यंत जेवणाची वर्दी आली.

ओळीने पानें मांडली होतीं. केळीच्या पानावर चटण्या–कोशिंबिरी, लोणचीं डाव्या बाजूला मुख्य पक्वान्न, भाज्या उजव्या बाजूला असा थाट होता. पानाभोंवती रांगोळ्या काढल्या होत्या.

*जेवणाला सुरुवात करण्यापूर्वी* इंग्रज साहेबाने विचारले, " डाव्या बाजूचे पदार्थ थोडे थोडे अन् उजव्या बाजूला जास्त कां ?

नाना म्हणाला—

" डाव्या बाजूचे पदार्थ फक्त चवीला आहेत ते आग्रहाने वाढत नाहीत. उजव्या बाजूचे मुख्यतः खायचे— आमच्या जेवणातदेखील left–right असतें. पण रांगोळी मात्र सगळ्या पानाभोवतीं असते.— "

साहेब काय ते समजला.

# आइशमनची अखेर



गेल्या महायुद्धांत ज्यूंचा भयंकर प्रमाणावर संहार करणाऱ्या ॲडॉल्फ आइशमनला १ जून १९६२ रोजीं रात्रीं बारा वाजतां टेल अव्हि येथें रॅमले तुरुंगांत फासावर लटकविण्यांत आलें. रूटरचा एकच वातमीदार या प्रसंगीं हजर होता.

या अखेरच्या प्रसंगाचें वर्णन त्याने नंतर जगभर प्रसृत केलें. तो लिहितो--

" काल रात्रीं मला टेल अव्हिव येथील माझ्या घरांतून उठवून मोटारींत कोंवून पोलिस ठाण्यावर नेण्यांत आलें. तेथून तासाभराने आम्ही रॅमले तुरुंगाच्या आवारानजिक येऊन पोचलों. तुरुंगाच्या आवाराभोवती पहारा कडेकोट होता. भोवती तारांचें भलें मोठें कुंपण होतें.

मैलभर अलीकडे आमची कसून तपासणी झाली. आम्ही आंत आंत जात होतों, तसतसे तुरुंगाच्या आवारांतील दरवाजे पुनः कुलूपवंद होत होते.

फाशी–कोठडीच्या शेजारच्या खोलींत वसल्यावर थोड्याच वेळांत प्रिझन वॉर्डर आंत आला आणि म्हणाला-- " पांच मिनिटांत फाशीचा कैदी पलीकडल्या खोलींत येईल. "

दोन-तीन मिनिटें जातात तोंच वाहेरच्या टीच्या खोलींत मला भुंकल्यासारखे आवाज ऐकूं आले. हिब्रू भाषेंत कुणीतरी ओरडत होतें-- " फॉरवर्ड मार्च-- "

रेव्हरंड फादर हल् आणि पाठोपाठ पहारेकऱ्यांनी वेढलेला आइशमन मला खोलीवरून जातांना दिसला.

जेरुसलेमच्या न्यायालयांत तो जसा दिसत होता त्याचप्रमाणें तो आताहि दिसला. चेहऱ्यामोहऱ्यांत कसलाहि फरक नव्हता. भुरकट रंगाचा ओपन कॉलरचा शर्ट आणि तशाच रंगाची पँट त्याच्या शरिरावर होती.

तो ताठ चालत होता. नाकासमोर त्याची दृष्टि होती चेहऱ्यावरील नसा ताठ झाल्या.

कांही सेकंदांत त्याला फासाखाली उभें करण्यांत आलें. फास त्याच्या डोक्यावर लोंवत होता. तीन वॉर्डरनी लगेच त्याचे हात पाठीमागे वांधले. पायाचे आंगठे रेशमी दोऱ्याने एकत्र बांधण्यांत आले.

नंतर प्रथम फाशी-कोठडींतील आइशमनचे शब्द मीं ऐकले. एका वॉर्डरने त्याच्या गुडघ्यांची गाठ जरा सैल केली. माझा शेजारी फादर विल्यम हल्-- " जिझस् जिझस् " असें पुटपुटत होता.

क्षण घरंगळत होते. फास त्याच्या गळ्याभोवती अडकवण्यांत आला. त्याआधी एका वॉर्डरने आइशमनला " तोंडावर घालण्याची टोपी हवी का ? " असें विचारलें. आइशमन म्हणाला-- " मला तिची गरज नाही. "

मग तो म्हणाला, " जर्मनीचा विजय असो ! अर्जेंटिनाचा विजय असो ! ऑस्ट्रियाचा विजय असो ! या तीन देशांशी माझा निकटचा संबंध आला. त्यांना मी विसरणार नाहीं. माझी पत्नी आणि माझ्या कुटुंबाला माझ्या शुभेच्छा सांगा. "

" लढाईतलें प्राप्त कर्तव्य मला करावें लागलें. माझ्या देशाच्या निशाणाच्या इभ्रतीसाठी मीं तें केलें. "

" आटपा, मी तयार आहें. "

अखेरच्या हालचाली सुरू झाल्या. त्याच्या चेहऱ्यावर भीतिदायक हास्य पसरलें. तो आम्हाला म्हणाला--

" मित्रहो, कांही काळानंतर आपली पुनः गाठ पडणार आहेच, सगळ्यांनाच हें मरण अटळ आहे. जन्मभर माझा देवावर विश्वास होता आणि आता मरतांनाहि तो आहे. "

मीं घड्याळांत पाहिलें. बारा वाजून दोन मिनिटें झालीं होतीं. हिब्रू भाषेंत फाशी–अधिकारी ओरडला--" मुखान् " ( तयार ).

फास गळ्याभोवती खेचला जात होता. मीं आइशमनच्या जिवंत चेहऱ्याकडे शेवटचा दृष्टिक्षेप टाकला. त्याचे डोळे अर्धवट मिटलेले होते. डोकें किंचित् डावीकडे झुकलेलें होतें आणि नजर जमिनीकडे खिळली होती.

माझ्या उजवीकडील खोलींत पड्याआड कसली तरी झटपट हालचाल झाली.

आइशमन ज्यावर उभा होता ती काळ्या रंगाची चौकोनी झडप खट्कन् खाली कोसळली. फासाची दोरी ताठ झाली आणि आइशमनचा देह फाशीच्या तिठ्यावर झडपेपाठोपाठ खालीं खेंचला गेला.

मी झडपेजवळ गेलों. खालीं वाकून पाहिलें. आइशमनचा मृतदेह दोरीला लोंबकळत होता. दोरी मुळीच हिंदकळत नव्हती. आइशमन तडकाफडकी मेला होता.

फाशी देण्याअगोदर चारच तास त्याचा दयेचा अर्ज इस्रायलच्या अध्यक्षांनी फेटाळला होता. हा निर्णय त्याला कळवल्यावर आइशमन फक्त उद्गारला-- " अच्छा ! "

मरण्यापूर्वी त्याने घरून आलेलीं दोन पत्रें वाचण्याची इच्छा व्यक्त केली. हीं पत्रें सकाळींच आल्याचें त्याला कळविलें होतें.

●●●

# पर्वती-दर्शन

## एक नवें रसायन

: लेखक :

श्रीकृष्ण पोंक्षे

पर्वती गावाचा पूर्वेकडील तट फोडून एक सरळ रस्ता सातारा-रोडला मिळतो. त्याच्या उजव्या हाताला दहा–पधरा धिट्‌कले टुमदार बगले, नुकत्याच फुललेल्या फुलाची नव्हाळी घेऊन बसलेले आहेत. कांहीच्या भोवतीं फुलबागा आकारत आहेत. सातारारोडला मिळणाऱ्या त्या प्रमुख रस्त्याला पर्वती दर्शनमध्यें जाणारे तीन-चार फूट रस्ते निघाले आहेत. त्या मुख्य रस्त्यापासून दोन फर्लांगावर "पर्वती-दर्शन" ही वसाहत थेट अग्ण्येश्वरापर्यंत पसरली आहे. पांढऱ्या सीमेंटचे पत्रे डोक्यावर घेऊन त्या सत्तर-ऐंशी चाळी, पाढऱ्या टोप्या घालून बसलेल्या एखाद्या अधिवेशनांतील सभासदासारख्या वाटतात. वसाहतीच्या सातारारोडकडील टोंकाला हातपाय पोटाशी घेऊन, अंगाची जुडी करून बसावे, तशा पन्नास-साठ गोल झोपड्या आणि बरोबर विरुद्ध दिशेला अगाला हळद लावून पिवळ्या झालेल्या नववधूप्रमाणें दिसणाऱ्या हौसिंग बोर्डाच्या चाळी–"लक्ष्मी-नगर–" आपले लक्ष वेधून घेतात.

पर्वतीच्या पूर्वेच्या पायथ्याकडील ही बाजू आता सर्वस्वी बदलली आहे. एका वर्षापूर्वी या ठिकाणी तुम्हाला या दिवसांत प्रौढत्वी शैशवास जपणारी, पोपटी–हिरव्या पालवीनें डवरलेलीं चिंचेचीं झाडें दिसलीं असती किंवा आपल्या हिरव्या पालवीत आषाढ घनांतील शामलपणा मिसळून गहिऱ्या हिरव्या रगानी प्रौढपणा घेतलेली आमराई दिसली असती. काताच्या वडीसारखी काळीभोर जमीन दिसली असती. इतस्तत: विखुरलेल्या शिंदीच्या झाडांनी नारळी–माडाची आठवण करून दिली असती. आकाशाला एकाग्रतेनें प्रदक्षिणा घालणारी घार, एखाद्या धारदार कात्रीने रेशमी कापड कापावे तशी आपल्या धारदार शिळीनें आकाशाची निळाई कापतांना दिसली असती. माणसें कुठें दिसली असतीच, तर तीं शेतीचें काम करणारीं. त्या माणसाच्या बोलण्याने आणि सातारारोडवरून पळणाऱ्या वाहनांच्या हॉर्ननें काय इथली शातता भगली असेल तेवढीच. बाकी हें शिवार कसे अगदी शात शात होतें. फळफळावळीनें किंवा बाजरीच्या कणसांनी फुलणारें हें शिवार आतां माणसानीं फुलून गेलें आहे.

पर्वती-दर्शन वसाहतीतील प्रत्येक चाळ १२×१२ च्या १६ खोल्याची आहे. पुढे आठ आणि पाठीमागे आठ. प्रत्येक कुटुंबाला एकच खोली देण्यांत आली आहे. जवळ जवळ १२०० ते १४०० कुटुबें या वसाहतीत आहेत. चाळी बाहेरून सर्व विटानी बाधल्या आहेत आणि आतल्या खोल्या पत्र्याच्या पार्टीशनने पाडल्या आहेत. प्रत्येक कुटुबाला स्वतंत्र बाथरूम आहे, पण नळ मात्र चारच. मी जेथें पाहुणा म्हणून उतरलो आहे ती खोली-चाळीच्या मध्यें आहे. एका बाजूला परटाचा शेजार आहे, दुसऱ्या बाजूला एक कोकणी आहे. पाठीमागें मुसलमान आहे आणि पुढें प्रशस्त अगण आहे. कोंकण्याच्या शेजारी एक एकटाच ब्राह्मण आहे. रात्री नऊ-साडेनऊ ते सकाळीं आठपर्यंतच त्याचें खोलीत वास्तव्य. बाकी खोलीला कुलूप.

इथे वृत्तिवैचित्र्याचे नमुने पुष्कळ आहेत निरनिराळ्या शिक्षण-सस्कृतीचे लोक इथे एकत्र नादत आहेत. दशग्रथी पडितापासून तो कपडे धुणाऱ्या परटापर्यंत आणि दारू पिऊन धिगाणा करणाऱ्या पासून तों घरात आहे की नाही इतक्या शाततेने राहणाऱ्या माणसा-पर्यंत, निरनिराळ्या सस्कृतीच्या आणि वृत्तीच्या या लोकाचे इथे कसे जमतें तीहि एक पाहण्यासारखी गोष्ट आहे.

● ● ●

इथे नेहमी दिसणारें दृष्य असें आहे : समोरच्या राधाकाकू तादूळ निवडीत आहेत. त्याच्या सुपातील तादुळावर शेजारींच राहणाऱ्या शेवंताबाईच्या कोंबड्याचें लक्ष आहे. राधाकाकूचा नातू हातात काठी घेऊन पहारा करीत आहे. कधीं कधी हे आत्मरक्षण सघर्षाचें मूळ होण्याचा संभव आहे. दोन बिऱ्हाडें सोडून त्या पलीकडे पार्वती-बाई ओले मासे धुवीत आहे. मासे धुतलेले पाणी ती नळावरच्या मोरींत ओतणार आहे आणि दोन–तीन दिवस ती घाण इतराच्या नाकांत शिरणार आहे. पार्वतीबाईचा मुलगा आणि चाळीतील इतर समवयस्क मुलें "डम डम डिगा" "चाहे कोइ मुझें जंगली कहे" हीं आणि अशाच प्रकारची सिनेमागीतें सामुदायिक रीतीने म्हणून सिनेमांतील नाचाचें प्रात्यक्षिक करून दाखवीत आहेत. कोणाचें गीत केव्हां सुरू झालें किंवा सपलें हें समजणे कठीण आहे. त्या मेळाव्यां-

तील दोघे तिघेजण गायन आणि नर्तनांत प्रवीण आहेत आणि बाकीचें त्यांच्याकडून तें सास्कृतिक ( ? ) शिक्षण घेत आहेत. तिथे जवळच तो सगीत नृत्याचा कार्यक्रम पहात एक बाई आपल्या मुलीच्या डोक्यांतील उवा मारीत बसली आहे. महत्प्रयासानें पोरीच्या केंसांच्या घनदाटीतून ऊ निवडून ती तिच्या हातावर देत आहे. आणि मिनिटामिनिटाला तिच्या नखावर एकेक बळी पडत आहे.

नळाला पाणी आले आहे. आणि नळावर एकच झुबड उडाली आहे. स्त्री-पुरुष मुलें यांच्या गर्दीत नळाचें अस्तित्व दृष्टिपथाच्या पलिकडे गेलें आहे. एकाच वेळी भांडी घासून विसळणे, धुणी धुणें, आघोळी करणे आणि त्यातच पिण्याचें पाणी भरणे अशा विविध गरजा भागविण्यासाठीं तू आधी कां मी आधी अशा अहमहमिकेनें जो तो सरसावत आहे. जो जास्त आक्रमक, उध्दट, त्याचा नवर अगोदर, मोकळीक लवकर हें सूत्र ठरलेलें आहे. समोरच्या चाळींतल्या म्हैसवालीने पोराबाळांसह हल्ला करून चार तोटयापैंकी दोन तोटया काबीज केल्या आहेत आणि आरामांत तिच्या एकुलत्या एक लाडक्या म्हशीचें रासन्हाणे चालू झाले आहे. तें करताना इतराच्या सोइ-गैरसोईचा विचार तिने कधीं केला नाहीं. नळावरील अन्य समाज तिच्याकडे तिरस्कारानें पहात आहे. त्याची तिने कधीच पर्वा केलेली नाही. तिला फक्त एकच माहीत आहे. आपले घोडें ( म्हैस ! ) पुढें दामटणें. त्या स्फोटक वृत्तीच्या बाईच्या तोंडीं लागायची कुणाचीहि छाती नाही. लोकांची सोय, गैरसोय तिने का पहावी ? ती ज्याची त्यांनी पहावयाची असते असें तिचें तत्त्वज्ञान आहे. तिला चार शब्द सागण्याचा कोणी प्रयत्न केलाच तर तिच्या शें-दोनशे शब्दात ते गाडले जातील. तिच्या कार्यापुढें स्त्री-पुरुष, लहान-थोर असा भेदाभेद मुळीच नाहीं साऱ्यावर ती एकाच मनोवृत्तीनें हल्ला चढविते. ती म्हणते " नळ जसा माझा नाही तसा तो तुमचाही नाहीं. ( तो सर्वांचाच आहे हेंही तिला मान्य नाहीं. ) तो सरकारी आहे. तुम्ही तिकडे काय करायची ती तक्रार करा ! पूर आणला ( आला नव्हे ) कशाला ? " आणि ब्रह्मास्त्र म्हणजे " इथें कशाला आला मग ? बघा की गावात चांगल्या वस्तीत जागा ! "

म्हैसवालीच्या शेजारीच किसन रहात आहे. तो नियमानें सायंकाळी पिऊन येतो. आई, बायको आणि तीन मुले एवढाच त्याचा ससार आहे. घरीं आला की नियमानें भांडण होतें. कधीं आईशीं, कधी बायकोशी. भांडणाला कारण लागतेंच असे नाहीं. कांहीतरी असे घडल्याशिवाय त्याला बरें वाटत नाही. भांडण ऐकू आलें की, किसन आला असें निश्चित समजावें. सकाळीं रेडिओवर वाजणाऱ्या सनई-प्रमाणे तें इतकें ठरून गेलेलें आहे. तो कधींच बाथरूममध्यें आघोळ करीत नाहीं. त्याचें स्नान उघडया नळावर आणि लांडया चड्डीवर. त्याच्या थोरल्या १३-१४ वर्षें वयाच्या मुलानें आतां शाळा सोडली आहे. आसपास वावरणाऱ्या ' सभावितांना ' भट्टीचा माल घरपोंच पुरवून देण्यात तो तरबेज झाला आहे. त्यांतून होणाऱ्या मिळकतींतून तो सिनेमा पाहतो, इस्त्रीचे कपडे वापरतो आणि सिग्रेट-विडया फुकीत नाक्यावरच्या हॉटेलात, पांच-सात पोराच्या मेळाव्यात दिवस काढतो बापाचें नि त्याचें पटत नाही. बाप घरीं आला की हा घराबाहेर. कोणचा पोलिस आपल्या किती ओळखीचा आहे किंवा पोलिसाचा पाठलाग आपण कसा चुकविला याची रसभरित वर्णनें सोबत्यांबरोबर तो अगदीं तल्लीन होऊन करीत असतो आणि आपल्या सोबत्यांना ४२० पणाने कसे पैसे मिळवावे याचें शिक्षण देत असतो. किसनच्या घरीं सायकाळ झाली की येणाऱ्याजाणाऱ्याची फार वर्दळ असते. हे इतके रोज नवीन येणारे लोक कशासाठी येतात, हें इथें राहणाऱ्याला समजणें मुळींच कठीण नाहीं. काल रात्रीपासून किसन बेपत्ता झाला आहे. आणि आज सकाळी त्याच्या मुलानें बापाला पोलिसांनी पकडून नेल्याचे जाहीर केलें आहे. आणि आतां धंद्याची सगळी जबाबदारी आपल्यावर पडली आहे असेहि तो मोठेपणानें सागत आहे. दारू पाडून विकणें हा तसा मोठा गुन्हा नाही अशी त्याची धारणा आहे. ' चहाडी, चुगली किंवा चोरी तर आम्ही करीत नाही ना ! ' असे त्याचें रोकडें तत्त्वज्ञान आहे.

याच चाळीच्या पाठीमागें एक मुसलमान बाई रहात आहे. खोलीतच तिनें किराणा भुसार मालाचें दुकान काढलें आहे. ती इतकी पापभीरू आहे की, तिच्या खोलीशेजारी एकदा दारूची बाटली कोणी आणून ठेवली. दोन-तीन तासांनीं ती बाटली दोघे-तिघेजण येउन तिथेंच पिऊन गेले. दोन-तीन तास ती इतकी अस्वस्थ होती कीं, आतां आपलें कसें होणार या चिंतेने दुकानांत येणाऱ्या प्रत्येक संभाविताला ती ' आतां मी काय करू ' असे विचारीत होती. तिला नव्या पैशांतील हिशेब नीट करतां येत नाही. शेजारच्या पारखीची बायको तिला मदत करते. ती तिकडून भाव आणि माल दिला हें सागते आणि पारखीची बायको किती पैसे झाले हें सांगते. सुकी मासळी भाजल्याचा वास सौ. पारखींना सहन होत नाही म्हणून तिनें ती खाणें सोडलें आहे. पारखीना कधीं रात्रपाळी तर कधी दिवसपाळी असते. रात्रपाळीचे वेळी त्या मुसलमान बाईच्या सोबतीमुळें मला मुळीच


# पांढरे डाग

अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसे व हजारों अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

नकली वैद्यांपासून सावध राहावे.

वैद्य बी. आर्. बोरकर. आयुर्वेद भवन ( माणू )
मु. पो. मंगरूळपीर. जि. अकोला ( महाराष्ट्र. )



# समाज प्रबोधन संस्था

१२४२, सदाशिव पेठ, पुणे २.

| | |
|---|---|
| आर्थिक विकासाचा प्रश्न : दे. अ. दाभोलकर | १·५० |
| लोकशाहीचा कारभार : सदाशिव आठवले | २·०० |
| विश्वरचना : ना. वा. कोगेकर | १·२५ |
| आपला महाराष्ट्र : पन्नालाल सुराणा | २·५० |
| अपंगत्वावर विजय : उषा मोहनी | २·६० |
| भारतीय शेती : स. ह. देशपांडे | २·०६ |
| राजकीय पक्षांसाठीं आचारसंहिता : ( सं. निबंध ) | २·०० |

भीति वाटत नाहीं असें पारखीची पत्नी सांगते. या दोन धर्मांतील कुटुंबाचें हें 'भावनात्मक ऐक्य' पाहण्यासारखें आहे. ●●●

कोणी कोणी आपल्या खोल्यांसमोर भाजीपाल्यांचे वेल आणि फुलझाडें लावलीं आहेत. कांहींचे हे श्रम उनाड शेळयांच्या भक्षस्थानी पडले आहेत. काहीं चाळीसमोर अत्यंत वाखाणण्यासारखी स्वच्छता आहे तर कांहींच्यासमोर सर्व तऱ्हेची घाण आहे. ज्या ठिकाणीं पिण्याचें पाणी भरावयाचें त्याच ठिकाणीं मुलाचें ढुंगण धुणारेहि इथे आहेत आणि आपणाला संडास स्वच्छ हवा म्हणून दुसऱ्याच्या विष्ठेवर नियमानें पाणी टाकणारेहि आहेत. गलिच्छ वस्ती निर्मूलन योजनेखालीं बांधलेल्या या सुरेख वसाहतींत संडासाची सोय मुबलक असूनसुद्धां बाहेर उघड्यावर पोरांना शौच्यासाठीं पाठविणाऱ्या माणसांना काय म्हणावें! पलीकडच्या चाळीला लागूनच असलेल्या रस्त्यावर पाच-सहा पोरें सामुदायिक रीतीनें विधि करीत आहेत. विधि उरकल्यावर तीं नळावर येऊन ढुंगण धुणार आहेत आणि या बाबतीत कोणी बोललें तर त्याचे आईबाप बाह्या सरसावून बाहेर येतील आणि वर सांगतील की, 'पोरेंच आहेत ती. त्याना काय कळतेंय!' घाणीच्या बाबतीत जोपर्यंत सरकार लक्ष घालीत नाही तोंपर्यंत हें सुधारणें कठीण आहे.

पूरग्रस्त आणि सरकार हें नाजुक नातें होऊन बसले आहे. सरकार कितीहि कार्यक्षम असेल आणि जनतेचें त्याला जर सहकार्य नसेल तर विकास कालत्रयीं शक्य नाही. या वसाहतींतील शेंकडा साठ-सत्तर टक्के लोक अजून भाडें भरत नाहीत. बहुसंख्य लोकाची अशी समजूत आहे कीं, जोंपर्यंत यशवंतराव मुख्यमंत्री आहेत तोंपर्यंत आपणाला कांहींहि या बाबतींत त्रास होणार नाहीं. कित्येकाची तर अशी समजूत आहे की, आतापर्यंतचें भाडें माफसुद्धा होईल, मग कशाला भरा! इथें आलेले सर्वच सुस्थितींत आहेत असें नाही. कांहीची मिळकत ४०।५० रु.सुद्धा नाही. कांही कुटुंबात नवरा ४०।५० व बायको भांडीकुडीं घासून १५।२० रु. मिळविते.– अशींहि कुटुंबें आहेत. या सर्वांचे प्रश्न सोडवणें तितकेंच अवघड आहे. या वसाहतीत कुटुंबे भरताना सरकारने त्यांच्या सोईचा विचार केलाच असेहि म्हणतां येणार नाही. इथून खडकी, देहूरोड किंवा जिमखाना भागांत कामाला जाणाऱ्याचे खरोखरच हाल आहेत. पुरुष सायकलचा वापर करूं शकतात, पण भांडीकुडीं घासून जी पोटाला मिळवतात, त्यांची तर फार बिकट परिस्थिती आहे.

गोल झोपडीत राहणाऱ्या कुटुंबांचे तर सर्वस्वी हाल. उन्हाळ्यांत तापून निघाले असतील बिचारे! दोन झोपड्यांच्या मध्यें तट्ट्यानी कुडलेली जी जागा आहे तीच मोठ्याची बाथरूम आणि लहानांचें शौचकूप! ह्या झोपड्याना पाया नाही. नुसते गोल पत्रे जमिनीत पुरलेले. साध्या पावसानेंसुद्धा आंत पाणी शिरावें अशी जमिनीची पातळी. दोन्ही बाजूनी उघडीं गटारें. त्यात कोणी काय करावें याला धरबंध नाही.

आता त्या झोपड्यांतील लोकांना म्हणे "लक्ष्मीनगर" किंवा येरवड्याच्या हौसिंग बोर्डांत जावयाला सांगत आहेत. ज्याची मिळकत रु. ७५ चे आंत आहे, ज्याच्या कुटुंबात पाच-सहा खाणारी तोंडें आहेत तो मनुष्य भाडें भरील, का खायला धान्यधुन्य भरील, कां पोराच्या शाळा गांवांत म्हणून बससाठी पैसे खर्च करील?

येथील अनंत बिऱ्हाडाचे अनंत प्रश्न आहेत. सारेच सुटतील असेंहि नाही. काही सोडूनहि द्यावे लागतील, पण शक्य तितका या बाबतीत सरकारनें प्रयत्न करावयास पाहिजे आहे आणि जनतेनें प्रामाणिकपणें त्यास सहकार्य करावयास पाहिजे आहे. निवडणुकीच्या आचेने झाली एवढी सोय आहे. निवडणुकाबरोबर ती आच संपली आहे आणि कामाची गति मंदावली आहे. ज्या चाळींना बाहेरून तट्टे होते त्यांना अजून भिंती घालायचें काम चालू आहे. मग पत्र्याच्या पार्टीशनऐवजी भिंती यायला किती वेळ लागेल? काही प्रतिष्ठित समाजकारणी माणसें झट्कन दिसून येईल असे 'सांस्कृतिक मंडळ' स्थापण्याच्या खटपटीत आहेत. त्यांच्या हालचालीतून एका महिला मंडळाचाच फक्त इथें जन्म झाला आहे. दूधकेंद्र ही जीवनावश्यक गरज, पण त्याविषयी सरकारकडे प्रयत्न करूनहि अद्याप कांहीच उपयोग झालेला नाहीं. ●●●

संत तुकाराम हा साम्यवादी संत. त्याच्या भाषेंत इथला साम्यवाद सांगावयाचा झाल्यास असे म्हणतां येईल कीं, मुसलमान बाईचा शेजार "भेदाभेद वर्ण अमंगळ" असा आहे, तर म्हैसवालीचा "सर्प विंचू नारायण त्यासी वंदावे दुरून" असा आहे. निधर्मी सरकारचें हें समाजवादी पुनर्वसनाचें कार्य हे या दोन्ही प्रकाराचें झालें आहे. भेदाभेद वर्ण अमंगळ हे बौद्धिक व्यासपीठावरील विचार ऐकायला पटण्यासारखे पण आचारायला पेटत्या आगीसारखे आहेत. आणि म्हणूनच तुकारामासारख्या विश्वाची कणव असलेल्या महात्म्याला भेदाभेद वर्ण अमंगळ वाटत होते तरी सर्व विंचवाना दुरूनच नमस्कार करावा हेही सांगणे अपरिहार्य वाटत होते. सर्व माणसे एकाच देशाचीं, एकाच भूमीची, एकाच देवाची लेकरें असली तरी प्रत्येकाची संस्कृती वेगळी आहे. माणसापासून वाघसिंहापर्यंत आणि कीडामुंगीपासून सर्पविंचवापर्यंत सारीजरी त्या परमेश्वराचीच रूपें असली तरी प्रत्येकाचा संस्कृतीधर्म वेगळा आहे. जातिनिरपेक्ष समाजवादाच्या ह्या प्रयोगातून एक निराळीच जात निर्माण होण्याचा संभव जास्त आहे. ●●●



—शरद अभ्यंकर

"लाज नाहीं वाटत—छत्रींत येतां का असं विचारायला? नायलॉनचा रेनकोट अंगावर आहे—दिसत नाहीं!!"




# न लढे और न बचे

## भारत विंडीज् सामने

रा. म. शास्त्री

पहिल्या कसोटी सामन्यांत भारतानें दहा विकेट्सनी मार खाल्ल्यावर कुणींतरी भारताचे कर्णधार नरी कॉंट्रॅक्टरला विचारलें कीं–" काय हो, दुसऱ्या डावांत भारतीय संघ ९८ धावांत कोसळला त्याला पोर्ट ऑफ स्पेनचें खराब पिच् कारणीभूत आहे कां ?" यावर नरीनें प्रांजलपणें सांगून टाकलें की, " नाहीं हो, पिच् चांगलें होतें, पण आमचे खेळाडू भरभर उखडले गेले खरे ! " वॉरेलनें सांगितलें की, " भारतानें नाणेफेक जिंकली आणि बॅटींग पटकावलें हें ठीक झालें. मीं नाणेफेक जिंकली असती तर पेंचांत पडलों असतों. आणि कदाचित् क्षेत्ररक्षणच पत्करलें असतें. भारताच्या या पहिल्या पराभवावरून त्यांच्या संघाची ताकद कमी लेखण्यांत मात्र धोका आहे, " वॉरेलच्या बोलण्यांत फारच तथ्य होतें. कठीण समय येतां कामास येण्याचा विंडीज् संघाचा वकूब, भारताजवळ नाहीं; हीच कायती भारताची परंपरागत शोकांतिका आहे. शत्रु कात्रींत सापडला की, पुरता जेर करायचा नाहीं आणि " भाऊ पडला " या नुसत्या अफवेनें रणांगण सोडायचें हाच तर आमचा पिढीजात दोष. या सामन्यात दुसऱ्या दिवशीं विंडीज् संघ दुराणीनें चांगला कात्रींत पकडला होता, रथीमहारथी उलथले होते, पण हेन्ड्रिक्स-हॉलनेंच धुमाकूळ घातला. दुसऱ्या डावांत एकानेहि तिशी गांठली नाहीं. नुसता पिच्पर्यंत हिंडणवारा केला. तरीपण हॉलला टोलावणें शक्य आहे, दुराणी, बोर्डे यांच्या फिरकीवर कन्हाय–वॉरेल –सोबर्स यांना कबजा बसवणें कठीण जातें, देसाईला आघाडीला खिंडार पाडणें अशक्य नाहीं या गोष्टी या सामन्यांत आशा देऊन गेल्या होत्या.

### सबिना पार्कवरील छबिना

दुसरी सलामी होती किंगस्टन येथें सबिना पार्क मैदानावर सात मार्चला. त्या दिवशीं सकाळीं आपल्याकडील वृत्तपत्रांत वेस्ट-इंडिजचा संघ जाहीर झाला. भारताच्या गोलंदाजांनी ज्याला हातोहात फसवलें त्या कॅमी स्मिथला काढून त्याच्या जागीं मॅकमॉरिस हा जमेकाचा आघाडीला येणारा फलंदाज संघांत आला होता. रॉड्रिग्यूला घेऊन वॉटसन्‌ला वगळण्यांत आलें होतें. कारण चेस्टर वॉटसन्‌ने पहिल्या सामन्यांत फक्त एकच विकेट घेतली होती. बोला फुलाला गांठ म्हणतात तसा हेन्ड्रिक्स मात्र खरोखरच आजारी पडला होता आणि त्याच्या जागीं मेनडोन्काला समाविष्ट केलेलें होतें. यावरून पाहतां वेस्ट इंडिज संघाची चांगलीच डागडुजी करण्यांत आलेली होती. भारताची हालहवाल कांहीं ठीक नव्हती. पतौडी, उम्रीगर यांना लचक होती, वसंत रांजणेचा खांदा अजून सुधारलेला नव्हता आणि दिलीप सरदेसाईच्या पोटांत ढवळत होतें. लक्षणें कांहीं ठीक नव्हतीं.

दि. ८ मार्चला महाराष्ट्राचें मंत्रिमंडळ जाहीर होणार होतें. त्यांतील नांवांपेक्षां आम्हांला उत्सुकता होती ती भारतीय संघांतील खेळाडूंच्या नांवांची. सकाळीं वृत्तपत्रांत भारताची लंचपर्यंतची धावसंख्याहि नांवांबरोरच आली. भारत चार बाद ८९ ! जयसिंह २८, कॉन्ट्रॅक्टर १, सुरती ३५ आणि मांजरेकर १३. पतौडी, सरदेसाई, रांजणे खेळूं शकत नव्हते आणि प्रसन्न-सुरतीना जागा झालेली होती. सकाळच्या चहाची आमची चवच गेली.

परंतु सबिना पार्कला बोर्डे उम्रीगरनें दुपारच्या चहाला फारच चव आणलेली होती. चहाची वेळ होईपर्यंतच्या दोन तासांत बोर्डे उम्रीगर जोडीनें चार बाद ८९ ही धांवसंख्या १८३ वर आणून ठेवली. पंचेचाळीस मिनिटांत या जोडीनें ५१ धांवा केल्या आणि हॉल, स्टेयर्स, रॉड्रिग्यू यांना पिटाळून लावून वॉरेलला गोलंदाजी घेणें भाग पाडलें होतें. पांच खेळाडू ऑफ बाजूस आणि चार लेगच्या बाजूस चौकार अडविण्याचा आटापिटा करूं लागले. धांवा अशा

वेगानं वाढत होत्या की विचारूं नका ! टायगर पतौडी आजारी होता तरी बोर्डेच्या अंगांतच वाघ शिरला होता. अखेर उम्रीगरला बाद ठरविण्यात आलें. सोवर्सचा चेंडू त्याच्या बॅटनें रपाटा दिल्यावर उसळी मारून त्याच्या पॅडवर आदळला आणि मेनूडोन्काच्या हातांत गेला. मेनूडोन्कानें झेलबाद म्हणून निर्णय मागितला आणि पंचानें त्याला ठरविला लेगबिफोर ! हें प्रेक्षकांना कधी कळलें तर सबिना पार्कच्या स्कोअर बोर्डावर उम्रीगर-कॉट मेनूडोन्का-बोल्ड सोवर्स-अशी जाहिरात लागतांच पचानें तें बदलून तासाभरानें L.B.W. केले तेव्हा. म्हणजे आपण कसे बाद झालों हें उम्रीगरलाहि तंबूत गेल्यावर तासाभराने कळलें, पण या मधल्या वेळांत बोर्डे-दुराणी जोडीनें धांवसंख्या दोनशेंच्या पुढें लोटली होती. या सामन्यांत पच तरी एक एक बहाद्दर होते बघा ! हॉलचा एक चेंडू कमरेएवढी उंची घेऊन विकेटच्या बाहेर जात असतांना दुराणीच्या पॅडवर आला. विंडीज्चे खेळाडू ओरडले-"हाऊ ऽऽ दॅट !" पचानें मानेनें नकार दिला. लगेच बोट मात्र वर केलें. दुराणीला कळेना आपण बाद कीं नाबाद ! पण पंचानें मान स्थिर केली आणि दुराणी फक्त १७ धांवा काढून परतला.

बोर्डेची शतकाकडे घोडदौड सुरू होती. नाडकर्णी त्याला साथ करूं लागला. स्टेअर्स, हॉल नव्या चेंडूने मारा करीत होते. परंतु बोर्डेनें चौकारांचें सत्र सुरू ठेवून नव्वद धावा ओलांडल्या. त्यांत १३ चौकार होते. नाडकर्णीने यावेळीं सतत पाच षट्कें बोर्डेला खेळूच दिलें नाहीं अखेरच्या चेंडूवर एकादी धांव घेऊन पुनः नाडकर्णीच खेळूं लागे. बोर्डे कटाळला असावा. दिवसाचा खेळ संपायला अर्धा तास असताना ९३ धावा काढून बोर्डे बाद झाला. हॉलनें त्याची दांडी उडविली धांवसंख्या होती. २६३.

वॅरेलनें द्रुतगति गोलंदाजांचा मारा पुन्हा दोन्ही बाजूंनीं चालू केला. त्याला वाटलें असावें, उरलेल्या वेळांत इंजिनिअर, देसाई, प्रसन्न झट्कन् खेळून जातील, परंतु नाडकर्णी इंजिनिअर दिवसअखेर चिकटून राहिले. पहिल्या दिवसाच्या खेळाच्या शेवटीं भारताचे सात गडी बाद २८० धावा झाल्या होत्या. देसाई, प्रसन्नला आपलीं बांधलेली पॅड्स् न खेळताच सोडावीं लागली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं इंजिनिअर-नाडकर्णी या जोडीनें वॅरेलचा दम उखडला. सदतीस मिनिटांत या जोडीनें पन्नास धावा वाढवल्या. रॉड्रिग्यूच्या सात षट्कांत सदतीस धांवा घेतल्या आणि इंजिनिअरने तर हॉलला एका षट्कांत लागोपाठ दोनदा सीमापार केलें. हॉलच्या जागीं स्टेअर्स आला. रॉड्रिग्यूच्या जागी गिब्स् आला. काहीं परिणाम दिसेना. इंजिनिअरने ७५ मिनिटात ५० धावा केल्या आणि तो नाडकर्णीच्या पुढें गेला. मद्रास येथें याच जोडीनें इंग्लंडविरुद्ध १०१ धावाची भागिदारी केली होती आणि दोन महिन्यांच्या आत पुनः शंभरीचा विक्रम करण्याचा घाट घातला होता. अखेर यष्टिरक्षकानेच यष्टिरक्षकाचें मरण हेरलें. मेन्डोन्काने इंजिनिअरला स्टंप केलें. देसाई आला आणि लगेच गेलासुद्धा. लंचपूर्वीच हिंदी संघाचा डाव संपणार असें चिन्ह दिसूं लागले, परंतु प्रसन्न खेळू लागला. नाडकर्णी षट्काच्या शेवटच्या चेंडूवर धांवा घेऊं लागला. लंचला धांवसंख्या झाली नऊ बाद ३८९.

पुनः खेळ सुरू झाल्यावर फक्त ७-८ मिनिटांत भारताचा पहिला डाव ३९५ धांवावर संपला. नाडकर्णी ७८ धावा काढून नाबाद राहिला. त्यांत १० चौकार होते. भारतानें ४५३ मिनिटांत ३९५ धांवा केल्या-आणि धांवांचा वेग मिनिटाला एक धांव या प्रमाणाच्या जवळपास ठेवला.

### हॅटींग झालें पण—

जवळ जवळ ४०० धांवा उरावर ठेऊन कॉन्ट्रॅक्टरनें उत्साहानें क्षेत्ररक्षण रचलें. चवथ्याच षट्कांत देसाईन हंटला उडवले. कॉन्टॅक्टरनें त्याचा लेगवर झेल घेतला. १बाद१६. कन्हाय-मॅकमॉरिस जोडी चुकतमाकत खेळत होती. देसाईचे चेडू हळूहळू सीमापार होत होते, तरी देसाई आणखी एखादी विकेट घेईल असे वाटत होते. अखेर ४७ धांवा दिल्यावर देसाईला काढून कॉन्ट्रॅक्टरनें चेंडू दुराणी-बोर्डेकडे दिला. पचवीस मिनिटांत फक्त ३ धांवा झाल्या. कन्हाय-मॅकमॉरिस अडचणीत कोंडले जात होते. कन्हायनें ओळखलें, आता चढाई करून चान्स घेतल्याखेरीज कोंडी फुटणार नाहीं. कन्हायनें रेषेबाहेर येऊन चेंडू फटकारण्यास सुरुवात केली. मॅकमॉरिसनेहि त्याचीच री ओढली. उपाहाराच्या वेळी धावसंख्या झाली १ बाद ९०. दिवसअखेरपर्यंत अनेकवेळां बोर्डे-दुराणीचे चेंडू विकेटजवळून निसटले, पण दैव विंडिजकडे झुकलें होतें. दुसरा दिवस संपला, तेव्हा कन्हाय मॅकमॉरिस दोघे नाबाद राहिले. धावसंख्या होती १ बाद १५७.

दि. १० मार्चला सकाळच्या वृत्तपत्रात मथळा आला-"मॅकमॉरिस-कन्हायचीं नाबाद शतकें." मॅकमॉरिस नाबाद १११; कन्हाय नाबाद १३४ शिवाय खाली-सोबर्स, वॅरेल, सॉलोमन, हॉल...बहुतेक बाजार आटोपलाच होता !

आणि प्रत्यक्ष १० मार्चला सबिना पार्कवर खरोखर ग्रह आटोपतच आला होता. मॅकमॉरिसला १२५ धांवांवर आणि कन्हायला १३८ धावावर प्रसन्नाने बाद केलें. पाठोपाठ आलेल्या रॉड्रिग्यूलाहि त्यान फक्त तीनच धांवा दिल्या. चार बाद २९३ ! परंतु वॅरेल-सोबर्सनें गोलंदाजी यथेच्छ तुडवली. अखेर वॅरेल उडाला. सहा बाद ४३०. सॉलोमन रन्आउट झाला. मग अलेक्झांडर, हेन्ड्रिक्सच्या वशाचा यष्टिरक्षक मेन्डोन्का आला. आला तों आपला चौकार हाणीतच सुटला. एक चौकार सोबर्सचा, एक मेन्डोन्काचा. धावसंख्या ४३० वरून ५५७ वर गेली. अखेर १५३ धांवा काढून सोबर्स बाद झाला. दुराणीच्या गोलंदाजीवर देसाईनें झेल घेतला.

## अगाध ज्ञान

एस.एस. सी.च्या एका विद्यार्थ्याने परीक्षेच्या पेपरांत फुप्फुसांबद्दल खालील माहिती लिहिली होती;

फुप्फुसें हीं हृदयांत कोठेंतरी असतात. त्यांचे दोन भाग केलेले असून एक भाग 'फुप्फु' असें करतो, व दुसरा भाग 'फुस्' असें करतो, म्हणून त्यांना फुप्फुसें असें म्हणतात.

'दैनिक समाचार' वरून.

मेन्डोन्काला साथ देण्यासाठी स्टेअर्स आला. हा खरा स्टेअर! पस्तीस धावा त्याने केल्या. भारताविरुद्ध ऊच्चांक ठरणारी ६३१ ही धावसंख्या झाल्यावर आणि मेन्डोन्का ७८ धावा काढून बाद झाल्यावर वॉरेलने डाव घोषित केला. नाहींतर स्टेअर्सनेहि बहुधा अर्धशतक लावलें असतेंच. एका डावात तीन शतके आणि जवळ जवळ तीन अर्धशतकें भारताला यावेळी डावाचा मारा द्यायचा असाच वॉरेलचा विचार असावा. वस्तुत. प्रसन्नाने जेव्हा ६७ धावांत मॅकमॉरिस, कन्हाय, राड्रिग्यू यांचे बळी घेतले आणि हातून जाणारा सामना कह्यांत आणला, तेव्हा क्षेत्ररक्षण डोळचांत तेल घालून व्हायला हवे होतें, परतु सोबर्संच्या दोन धावा झालेल्या असतांना त्याचा दुराणीच्या चेंडूवर सोपा झेल इजिनिअरनें सोडला. त्याच्या २७ धांवा झालेल्या असताना दुराणीला प्रसन्नच्या गोलंदाजीवर उडालेला त्याचाच झेल पकडता आला नाहीं.

### बाटल्यांचा मारा

इंजिनिअरने हातात चेंडू पडण्यापूर्वीच स्टंप उखडले आणि सॉलोमनला पचानी नजरचुकीने बाबचीत घोषित केलें. याचा अर्थ पचाची नजरचूक झाली नसती तर हा मोकाहि हुकलेला होता. ज्या विंडीज् प्रेक्षकानी आदल्या दिवशीं उमरीगर आणि दुराणी याच्याबाबतचे सशयास्पद निर्णय टाळ्या वाजवून स्वागतार्ह मानले त्यांनीच सॉलोमनला बाद देताच क्रीडागणावर बाटल्या फेकून गोंधळ उडविला. तिसऱ्या दिवशी दोन तासांत विंडीझनी रटाळ खेळ करून फक्त ६७ धावा काढल्या. आणि दिवसअखेर धांवसख्या ३९८ वर जाऊन सोबर्स, वॉरेल नाबाद राहिले. भारताने पहिल्या दिवशीं हॉल-स्टेअर्सच्या गोलंदाजीवर २८० धांवा कराव्यात आणि विंडीझने दुराणी, बोर्डे, उमरीगर, देसाई, प्रसन्नाच्या गोलदाजीवर फक्त २२७ धावा दिवसभरांत कराव्यांत यांतला फरक चाणाक्षांच्या ध्यानीं आला. धावांचा डोंगर रचण्याचें वॉरेलचें ध्येय मात्र साध्य झालें. भारताचा दुसरा डाव सुरू झाला, तेव्हा विंडीझने भारतावर २३६ धावाचें कर्ज रचले होतें.

चहापानापूर्वी पाऊण तास भारताचा खेळ सुरू झाला. जयसिंह-कॉन्ट्रॅक्टर हॉलला तोड देऊ लागले. हॉलचे चेंडू बॅटचा स्पर्शहि न होता मध्येंच सीमापार होत होते आणि अवांतर धावाहि मिळत मिळत संख्या ३४ वर आली. हॉलला कसोटी सामन्यांत १०० गडी बाद करायला फक्त तीन कमी पडत होते. बहुधा अकरा मार्चला सामन्याच्या शेवटच्या दिवशीं हा विक्रम पूर्ण होईल अशी सर्वांची अपेक्षा होती, पण हॉलनें चेंडूफेंक अवसानानें सुरू केली.

तिसऱ्याच षट्कांत त्याने जयसिंहाची लेगस्टंप उखडली. १ बाद ३४. धावा ४५ असतांना त्याने कॉन्ट्रॅक्टरचा त्रिफळा उडवला आणि सुरतीला लेग बिफोर घेऊन त्यानें कसोटी सामन्यांतलें १०० बळीचें श्राद्ध पूर्ण केलें. प्रेक्षकांचा आरडाओरडा वाढू लागला. नाडकर्णी उमरीगरने धावसंख्या एक-एक, दोन-दोन करीत तीन बाद पन्नास वरून ८३ वर आणली-आणि सामन्याचा चौथा दिवस मावळला.

पाचव्या दिवशी काय होणार याची भाकितें वृत्तपत्रानीं दिलीच होतीं. "भारताचा पराभव अटळ. हॉलची अचूक गोलंदाजी." सुरुवातीला तासभर उमरीगर नाडकर्णी यांनी वॉरेलला दाद दिली नाहीं. दोघे जपून खेळत होते. निदान सामना अनिर्णित राहणार अशी आशा निर्माण झालेली होती, परंतु धांवसंख्या ११६ असतांनाच उमरीगर-नाडकर्णी या दोघांना गिब्सनें चकवलें. जे चेंडू विकेट-बाहेरून जात होते त्यांच्या मोहात दोघांचे झेल उडाले. मांजरेकराला लेग बिफोर देण्यात आले. १९ धांवा काढून मांजरेकर परतल्यावर पुनश्च बोर्डे ही एकच आशा उरली, परंतु हॉलचा बंपर छातीपर्यंत आल्यावर बोर्डेनें तो बॅटने अडवला आणि बोर्डेचा झेल मॅकमॉरिसनें घेतला. दुराणीचा गिब्सनेंच त्रिफळा उडवला. आठ बाद १५७! दुसरा डाव दोनशें धावात आटोपणार असें वाटत होतें, पण अिजिनिअरने गिब्सला धडा शिकवण्याचें मनावर घेतलें. त्यानें ४० धावा काढल्या. धांवसंख्या दोनशेपार झाली. अखेर नवा चेंडू आला आणि तो हॉलनें घेतला.

अिजिनिअर, देसाई अनुक्रमें ४० व २० धांवा काढून हॉलला अखेर शरण गेले. भारताचा डाव २१८ धावात आटोपला. चहा-पानाला तास असतांनाच एक डाव आणि १८ धावांनी विंडीझनीं भारताला दुसऱ्या सलामीतहि नामोहरम केलें.

भारताच्या दुसऱ्या डावांत हॉलने ४९ धावांत सहा गडी बाद केले, तर जेथें हॉल हात टेकले तेव्हा उमरीगर-नाडकर्णींना बाद करून गिब्सने फार मोठी कामगिरी बजावली, किंबहुना पुढच्या सामन्यांत हॉलच्या जोडीला गिब्स हा नवा कर्दनकाळ आता भारताला निर्माण झाला होता. त्याला भारताच्या फलंदाजांची नाडी बरोबर हाती लागण्याची चिन्हें दिसू लागलीं होती.

किंग्स्टनचा सामना हरल्यावर भारताचा कर्णधार नरी यानें सांगितलें - "जगांत विंडीझचा सघ हा सर्वांत बलाढ्य संघ आहे. आम्ही दौऱ्यावर आलों तेव्हा ही गोष्ट गृहीतच धरली होती की, आम्हाला विजयाची फारशी आशा नाही, पण अपेक्षेपेक्षां आम्ही आतापर्यंत चांगले खेळलों. आता हा सामना मात्र, आमचे भरंवशाचे फलंदाज कोसळले आणि आम्हीं सोबर्सला जीवदान दिलें यामुळें हरलों -"

कर्णधाराने अशी कबुली दिल्यावर तिसऱ्या कसोटी सामन्याच्या तयारीला किती जोर चढला असेल नाहीं? या निवेदनानंतर नरी कॉन्ट्रॅक्टरला पुन: पराभवाची मीमांसा करण्याची संधीच मिळाली नाही. हें निवेदन त्यानें केलें १३ मार्चला.

तिसरा कसोटी सामना ब्रिजटाऊन येथील केनिंग्स्टन ओव्हल मैदानावर २३ मार्चला सुरू होणार होता. त्यापूर्वी बार्बाडोस सघा-बरोबर जो सामना १७ मार्चला सुरू झाला त्या सामन्यात कॉन्ट्रॅक्टर, चार्लस् ग्रिफिथच्या चेंडूवर जखमी झाला. एका शॉर्टपिच् चेंडूवर खेळतांना तो भीतीनें खाली वाकला आणि चेंडू अपेक्षेप्रमाणें उची न घेता त्याच्या डोक्यावर आदळून कॉन्ट्रॅक्टरच्या कानामागें कवटी-वर जोराचा तडाखा बसून कॉन्ट्रॅक्टर खाली कोसळला. लीकॉक या न्यूरो सर्जनला पाचारण करावें लागले आणि तातडीनें त्याच्या डोक्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. दि. १९ च्या वृत्तपत्रांनीं ही बातमी देतांना हेंहि जाहीर केलें कीं - नरी यापुढील दौऱ्यांत खेळणार नाहीं. बार्बाडोस सघानें भारताचा एका डावानें पराभव केला तरीहि पहिल्या डावात जखमी झाल्यामुळें खेळूं न शकलेल्या मांजरेकरने दुसऱ्या डावांत नाबाद शंभर धावा काढून आपला फॉर्म गेलेला नाहीं याची याद आणून दिली.

दुसऱ्या कसोटी सामन्यांतील पराभवावर भाष्य करताना प्रसिद्ध क्रीडाटीकाकार तल्यारखान यानीं टाईम्स पत्रांत लिहिलें-"दोन

कसोटी सामने आपण हरलों याचें मला मुळींच आश्चर्य वाटलें नाहीं. उरलेल्या कसोटी सामन्यांचेंहि असेंच होणार आहे हें मी धरून चाललों आहें. मी कर्णधार असतों तर लगेच भारतांत तार धाडली असती कीं– " अरविंद आपटे, सुभाष गुप्ते यांना विमानानें इकडे धाडा ! "

### तिसऱ्या फेरीचें नमन—

तिसऱ्या कसोटी सामन्यांत मागील दोन सामन्यांप्रमाणें पतौडी खेळणार नसल्यास उमरीगरकडे कप्तानपद येईल असें वाटत होतें. एक असा विचार आला कीं, वेस्टइंडिजला संघ पाठवितांना यापुढें सगळ्या खेळाडूंचीच कप्तानपदासाठीं उतरंड जाहीर करणें अधिक श्रेयस्कर !

दि. २३ मार्चला वृत्तपत्रांनीं कळविलें, " तिसऱ्या कसोटी सामन्यांत भारताचा बलाढ्य संघ ! " ज्या संघांत कर्णधारच गायब तो भारताचा सर्वांत बलाढ्य संघ ठरावा हें नरीचें दुर्दैवच ! विंडीझच्या दौऱ्यांत नरीनें म्हणण्यासारखें कांहींच केलें नव्हतें. प्रत्येक सामन्यांत त्याचें ओझें मात्र झालें. टायगर पतौडी या संघांत कप्तान होता. वय फक्त २१. आतांपर्यंतच्या कसोटी सामन्यांत एवढा तरुण कप्तान हाच ! सरदेसाई, देसाई, जयसिंहा, बोर्डे, दुराणी, नाडकर्णी, मांजरेकर, उमरीगर, इंजिनिअर, सुरती–हा तो बलाढ्य संघ. कॉन्ट्रॅक्टर व प्रसन्न जाऊन त्या जागीं सरदेसाई, पतौडी आले होते.

चार्लस् ग्रिफिथ चेंडू ' फेकतो ' अशी शंका असल्यामुळें त्याला आतापर्यंत कुठल्याच कसोटी सामन्यांत घेण्यांत आलेलें नव्हतें, बार्बाडोस सामन्यांत त्यानें वस्तुत: भारताचे पांच गडी फक्त ५० धावांत उखडले होते आणि कॉन्ट्रॅक्टर आपल्या चुकीमुळें जखमी झाला होता. तरीहि तिसऱ्या सामन्यांत त्याचा अंतर्भाव झाला नाहीं. यामागें वॉरेलचा हात असावा. वॉरेलनें नरीला रक्तदान केलें आणि ग्रिफिथचा काटा निवडसमितीकरवीं काढून भारताला थोडेंसें अन्नदानसुद्धां केलें.

विंडीझच्या संघांत दोन बदल झाले. मेन्डोन्काच्या जागीं यष्टिरक्षक म्हणून डेव्हिड ॲलन आला. ( ॲलन डेव्हिडसन् निराळा ! ) रॉड्रिग्यूच्या जागीं व्हॅलेन्टाईन आला.

भारताची आघाडीपासूनची रडकथा या सामन्यापासून सुरू होणार होती. कॉन्ट्रॅक्टर संघांत नाहीं, मेहरा–कुंदरम नाहीं––मग फलंदाजीची सुरुवात जयसिंहाबरोबर कोण करणार? एकच नांव दिसत होतें–– दिलीप सरदेसाई ! या पठ्ठ्याला पहिला पाठवा, तिसरा पाठवा, पांचवा पाठवा, आठवा पाठवा––जागा बदलली तरी धावांचा रतीब चुकायचा नाहीं. आता घोडंमैदान जवळ येतंच होते.

दि. २४ मार्च उजाडला. भारतानें नाणेफेक जिंकून फलंदाजी पत्करली. उपाहारापर्यंत ४ बाद ४९ ?

अंदाज फारसा चुकला नाहीं. भारतानें नाणेफेक हरली, पण वॉरेलनें भारतालाच फलंदाजी दिली. सरदेसाई–जयसिंहानें भारताचा डाव सुरू केला. दोघांनीं उत्कृष्ट सुरुवात केली. पन्नास धावा एकहि गडी न गमावतां फलकावर चढल्या. वॉरेलला वाटलें कीं, आपला अंदाज चुकला. हा सरदेसाई हॉलला बधत नाहीं आणि जयसिंहहि नेटानें खेळतो आहे. वॉरेल तासभर अस्वस्थ होता. धांवा वाढत होत्या. जयसिंहाचा झेल मॅक मॉरिसनें सोडला आणि स्टेअर्सला दुसऱ्याच षट्कांत मिळणारा बळी वांचला. ही रुखरुख होतीच. जयसिंह ठोकाठोक करीत होता, पंचेचाळीस मिनिटांत पन्नास धावा ! पण त्या नवीन आलेल्या डेव्हिड ॲलननें हॉलच्या गोलंदाजीवर जयसिंहाचा झेल घेतला. ५६ धावा असतांना जयसिंह बाद झाला. त्यांत त्याच्या



गुलाम महंमद जखमी कॉन्ट्रॅक्टरला नेत असतांना

धावा होत्या ४१. स्टेअर्सच्या सहा षट्कांत ५२ धावा खर्ची पडल्या बस्स. एवढाच दीड तास काय तो भारताला बरा गेला. ये–जा सुरू झाली होती. सुरती ७, मांजरेकर, ८ भारताच्या उपाहारापर्यंत धावा होत्या ४ बाद ९०. सरदेसाईला गिब्सनें ३१ धावांवर बाद केलें.

दिवसअखेर भारताचा पहिला डाव २५८ धावांत संपला आणि विंडीझ् संघानें एकहि गडी न गमावतां पांच धांवा फेडल्या होत्या ! या डावांत पतौडीनें ४८ धावा करून कप्तानपदाला साजेशी फलंदाजी केली. नाडकर्णी, दुराणी जोडीनें नवव्या विकेटसाठीं पन्नास धावांची भागिदारी करून अगदीं कोसळलेला डाव सावरला. आठ बाद १८८ वरून त्यांनीं गाडी नऊ बाद २३० वर नेली. दुराणी ४८ धावा काढून नाबाद राहिला. ज्याला ज्याला म्हणून वॉरेलनें गोलंदाजी दिली त्या सर्वांनीं विकेट्स्ची लूट वाटून घेतली. या दिवशींच्या कर्तबगारीबद्दल फारसें लिहिण्यासारखें नाहीं.

दुसरा दिवस उजाडला. उपाहारापर्यंत आदल्या दिवशीं भारतानें ९० धावा केल्या तर विंडीझ संघाला तेवढ्या वेळांत जेमतेम ६२ धावा मिळाल्या. दुराणी, सुरती, देसाई, नाडकर्णी यांची ही करामत होती. दिवसअखेर मात्र विंडीझनीं भारताची धावसंख्या पांच धावा ओलांडून सर्व दिवसांत बरोबर भारताएवढ्याच धावा करण्याचें श्रेय उपटलें.

कन्हायनें रनआऊट देण्यापूर्वी ८९ धावांत तीन षट्कार आणि डझनभर चौकार ठोकले. सकाळच्या कंटाळवाण्या खेळाविरुद्ध सतत आरडाओरड करणाऱ्या प्रेक्षकांचें अखेर समाधान झालें. विंडीज्‌ची धावसंख्या दिवसअखेर चार बाद २६३ झाली. सॉलोमन नाबाद २३ व गिब्स् नाबाद १. बाद झालेली मंडळी, हंट ५९, मॅकमॉरिस ३९, कन्हाय ८९, सोबर्स ४२ ! समाधान एकच होतें की, विंडीझचे रथी महारथी उडाले होते आणि धावसख्या अजून आवाक्याबाहेर वाढलेली नव्हती.

### ४५ फटके-२३ निर्धाव

या तिसऱ्या सामन्यांत भारताची गोलंदाजी व क्षेत्ररक्षण फारच कौतुकास्पद झालें. तिसऱ्या दिवशीं तर भारतीय गोलदाजांनीं सॉलोमनला जागेवर खिळवून टाकलें. सकाळच्या पहिल्या दोन तासांत ४५ षट्कें टाकण्यात आली. त्यातील २३ निर्धाव होती. गिब्सला बोर्डेनें विटीचीत केलें. दुराणी-बोर्डे यांच्या गोलंदाजीवर नंतर आलेल्या वॉरेलला तर खेळणेच अशक्य झालें. आठ धावा काढायला त्याला दीड तास लागला. उमरीगर-दुराणी यांनी लागोपाठ पांच षटकें निर्धाव टाकलीं. दिवसअखेर आणखी तीन गडी गमावून विंडीझनी धावसख्या आठ बाद ४२७ वर आणली. सर्व दिवसभर खेळून भारतीय फलदाजानीं २५८ धावा कराव्यात आणि विंडीझ फलंदाजांना १६५ धावाहि करतां येऊं नयेत यावरून तडफदार खेळाचें तुणतुणें विंडीझनें यापुढें वाजवूं नये हें उत्तम असेच म्हणावें लागेल. वॉरेलचा पाय दुखावलेला होता खरा, पण सॉलोमन ! ९६ धावा झाल्यावर सॉलोमननें ताणून मारलेला दुराणीचा चेंडू सीमापार होण्यापूर्वीच देसाईनें मिडविकेटवर उचलला आणि सॉलोमनचें शतक अखेर हुकलें तें हुकलेच. २८६ मिनिटें म्हणजे सुमारें ४॥ तास खेळून त्यानें विंडीझची धावसंख्या चारशेंच्या घरांत पोहचविली. वॉरेलच्या चाळीस धावा होत्या.

धावसंख्या ३९० झालेली असतानाहि यावेळी नाडकर्णी-उमरीगर यानीं पाठोपाठ आठ षटकें निर्धाव टाकली. पन्नाशी गाठायलाच वॉरेलला ४ तास चाळीस मिनिटें लागलीं. कसला खेळ अन् कसलं काय ? नाडकर्णीने ६० षटकांत ७३ धावा देऊन दोन बळी घेतले. सोबर्स आणि स्टेअर्सला नाडकर्णीने बाद केलें. दिवसअखेर वॉरेल ६४ धावा काढून नाबाद राहिला. आणि डेव्हिड ॲलन ९ धावांसहित त्याच्या सोबतीला होता. अगदी रटाळ अन् कंटाळवाणा खेळ ! चौथ्या दिवशी जवळ जवळ सव्वा तासांत वॉरेल ॲलन जोडीनें धावसख्या ४५४ पर्यंत नेली. यावेळी वॉरेलच्या ७७ धावा झाल्या असतांना उम्रीगरचा चेंडू विकेटमध्यें जोरांत घुसला आणि वॉरेलने बॅटनें तो व्यवस्थित त्रिफळधावर ओढला. व्हॅलेंटाईनला चार धावा देऊन बोर्डेनें त्याची दांडी उडवल्यावर विंडीझचा डाव ४७५ वर सपला. भारताच्या उरावर २१७ धावा रचल्या गेल्या.

उपाहाराला पंधरा मिनिटें असताना भारताची आघाडीची जोडी, सरदेसाई-जयसिंहा दुसऱ्या डावासाठीं उभी राहिली. भारताच्या पहिल्या डावात स्टेअर्सनें ५६ धावा दिल्याबद्दल विंडीझ प्रेक्षकांनीं हुर्यो उडविली त्याचा परिणाम म्हणून असेल कदाचित् दुसऱ्या डावांत त्यानें शून्यावर विकेट घेतली. जयसिंहा लेगबिफोर-स्टेअर्स-० ! दि. २८ मार्चच्या वृत्तपत्रानीं लंचपर्यंतची धावसख्या देताना सरदेसाई-ऐवजी आर्. बी. देसाईचें नाव आघाडीच्या फलदाजांत दाखवून

# डोळां नाही पाणी

ॲलन शेपर्ड, गिसॉम्, जॉनग्लेन या तीन अंतराळ प्रवाशांनंतर अमेरिकेनें चौथ्या उड्डाणासाठीं माल्कम स्कॉट कार्पेन्टर (३७) या आरमारातील अधिकाऱ्याची निवड केली. कार्पेन्टर यांचा अंतराळ-प्रवास संपल्यानतर केप कॅनाव्हेरल येथें पत्रकाराना कार्पेन्टर यांची पत्नी रेनी (३४) यानीं सांगितलें,

" अंतराळ-प्रवास सुरू असतांना माझ्या डोळयात एक टिपूसहि आलें नाहीं. निसर्गतःच काळजी करीत बसण्याचा माझा स्वभाव नाहीं."

कार्पेन्टर हे कॉलेजांत उच्च शिक्षण घेत असतानाच १९४७ सालीं रेनीचा त्यांच्याशीं परिचय झाला. एका सिनेमागृहांत रेनी त्यावेळी नोकरीला होती. वर्षानंतर त्यानी लग्न केलें. कोरियन युद्धांत कार्पेन्टरने आरमारी दलांत वैमानिकाची नोकरी केली. हवाई बेटांत तो बायकोबरोबर राहात असे. रेनी कार्पेन्टरनी म्हणूनच पुढें सांगितलें-

" हवाईंत असतांना जर घरीं यायला संध्याकाळी माल्कमला उशीर झाला तर तो कधीच परत येणार नाही असे मी मनांत धरून चालत असें. या वैधव्य-कल्पनेचें दुःख मी त्या काळात वारंवार सोसले आहे. एकदां तर आठवतें कीं, अशीच वाट पाहात असताना मी कल्पनेपुढें मला विधवा झाल्याचें ऐकून भेटायला आलेल्या हवाई येथील चर्च फादरशी मी कशी वागेन याचेंहि चित्र रंगवलें होतें."

यामुळेंच जेव्हा कोरियन युद्धानंतर कार्पेन्टरची अतराळ-उड्डाणासाठी निवड करण्यात आली, तेव्हा रेनीने त्याला मुळीच आडकाठी केली नाही. उलट त्याला प्रोत्साहनच दिले, जेव्हां अतराळ-शिक्षणासंबधी शेवटची विचारणा वॉशिंग्टनहून करण्यात आली, तेव्हा कार्पेन्टर घरीं नव्हता; रेनीनेच त्याच्यावतीनें होकार कळवूनहि टाकला.

प्रत्यक्ष उड्डाणाच्या वेळीं ती केप कॅनव्हेरल येथें हजर होती. यापूर्वी कुठल्याच अंतराळ-प्रवाशांच्या पत्नीला हें धैर्य झालेलें नव्हतें. उड्डाण सुरू झाल्यावर तिनें एकदाहि परमेश्वराची प्रार्थना केली नाही. तसेच त्याला कोणत्याहि प्रकारचें साकडें घातले नाही. तिनें पत्रकारांना सागितले - " आजचा अनुभव हा तुम्हाला नवीन असला तरी मला तो नेहमीचाच आहे.

वैधव्याचें हे काल्पनिक दुःख सोसून सोसून माझ्या सुख-दुःखाच्या सवेदना गोठून गेल्या आहेत. विजयाच्या उत्कट क्षणीहि त्यामुळेच आनंदाचें भरतें येण्याऐवजी एक प्रकारच्या कोरडया मनानें मी त्याचें स्वागत करीत असतें."

●●●

त्याला नाबाद दाखवलेला होता. यावरून सरदेसाई पुन: आजारी पडून पराभवावर शिक्कामोर्तब झालें असें वाटलें. सुदैवाने ती चूक ठरून चौथ्या दिवसअखेर मांजरेकर-सरदेसाई नाबाद राहिले आणि धांवसंख्या दोनबाद १०४ वर स्थिर होती. सुरती ३६ धावा काढून स्टेअर्सच्याच गोलंदाजीवर लेग बिफोर ठरला.

अखेरच्या दिवशीं उपाहाराच्या वेळी तिसरा सामना निकाली ठरेल यावर कुणाचाच विश्वास बसला नसता. लंचला धांवसंख्या सरदेसाई-मांजरेकरने १५८ वर आणली होती. स्टेअर्स, हॉल, सोबर्स, कन्हाय, वॉरेल, सॉलोमन, गिब्स्, व्हॅलेन्टाईन या आठ जणांनी गोलदाजी टाकून पाहिली तरी हातातला विजय निसटूं पाहात होता.

## गिब्सचा भोवरा

खाना सपला. विंडीझ संघ पुन: क्षेत्ररक्षणासाठीं बाहेर पडला. सामना अनिर्णित राहाणार असा सर्वांचाच कयास होता. अशा वेळीं ऑस्ट्रेलियात हॅट्ट्रिक गाजवलेला गिब्स् पुढे आला अन् या कर्दनकाळापुढे निर्भय हिंद खेळूं लागला.

उपाहार आणि चहाची वेळ यांच्या दरम्यान दीड तासात या कर्दनकाळाने भारताकडून आठहि बळी हिसकावले. सर्व झेलबाद. प्रथम त्यानें माजरेकरला फसविलें. वॉरेलने त्याचा झेल टिपला. माजरेकर निमिषभर भ्रांतचित्त झाला आणि वॉरेलने त्याचा झेल घेऊन निसटणारा विजय खेचून आणण्यास सुरुवात केली. मांजरेकरनें ५१ धांवा काढल्या. यापूर्वी गिब्सनें सरदेसाईला फसविले होतें. उम्रीगर १०, पतौडी ०, बोर्डे ८, इजिनिअर ५, दुराणी ५, देसाई १, नाडकर्णी नाबाद २. भारताचा हा डाव गिब्स्ने साफ उखडून टाकला. ५३ षट्कें–३७ निर्धाव– ३८ धावा आणि आठ बळी हे गिब्सचें गोलंदाजीचें पृथक्करण पाहिले कीं, वाटते धांवत जाऊन त्याची पाठ थोपटावी. सपला–तिसरा सामना सपला ! एक डाव आणि बत्तीस धावांनी भारतानें पुन. एकदां मार खाल्ला. टायगर पतौडीना सामना सपल्यावर ब्रूनेल जोन्स या पत्रकारानें विचारले, "सामना आपण कां हरलांत हे सागाल काय ?" टायगर म्हणाले, "माजरेकर–सरदेसाई बाद झाले आणि सामना उलटला" अपयशाचें हें पृथक्करण की थट्टा ! सर्व दिवसभर माजरेकर–सरदेसाई यानी खेळत राहावे असें या जवान वाघाला वाटत होतें कां ? केनिंग्स्टन ओव्हलचा हा सामना भारताला विसरणें एकदरीत कठीणच आहे. याच मैदानावर कॉन्ट्रॅक्टरची कवटी फुटली आणि भारताची तिसऱ्या सामन्यात गिब्सनें पा शेकली. पाचापैकीं ३ सामने ओळीनें जिंकून वेस्ट इडिजनें सिरीझहि गिळली. या सामन्यात भारताला काहीं सापडले असेल तर सरदेसाईचा आघाडीचा फलंदाज म्हणून शोध लागला. वॉरेलनहि त्याची पाठ थोपटली.

**गुजरातेंतील मराठी राजवट**

वि. गो. खोबरेकर

मूल्य सात रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणें २.

## चौथी सलामी

पराभव ! पराभव ! ! पराभव ! ! ! लागोपाठ तीनहि सामन्यांत भारताचा पराभव झाला. पहिल्या सामन्यांत आठ गडी राखून आणि दोन सामन्यात एका डावानें विंडीज् सघानें भारतावर मात केली.

वस्तुत: चौथा कसोटी सामना दि. ७ एप्रिलला ब्रिटिश गियानांत सुरू व्हायचा. परंतु तेथें कांही राजकीय हालचालींमुळें या सामन्याचें देवक पुन: पोर्ट ऑफ स्पेनलाच क्वीन्स पार्क ओव्हलवर दि. ४ एप्रिलला बसलें. भारताचा वकूब ध्यानात आल्यानतर प्रयोगाखातर काही नवें रक्त विंडीज् सघात दाखल होईल असे वाटत होते, परतु जे तीन निर्णय बदल–विंडीज् संघांत करण्यांत आले त्यामुळें संघाची ताकद उलट थोडीशी वाढलीच. डेव्हिड ॲलनच्या जागी यष्टिरक्षक म्हणून पुन: मेन्डोन्काला घेण्यांत आलें. व्हॅलेन्टाईनच्या जागीं स्पिनर रॉड्रिग्यू पुन: आला आणि सॉलोमनला बाजूस ठेवून सीमूर नर्सला प्रथमच सघात दाखल केलें गेले. नाहीतरी भारताविरुद्ध हॉल, स्टेअर्सनी गोलदाजी करावयाची म्हणजे एकादा नर्स–हवाच नाही कां ?

भारताने विचार केला–पराभव अटळ आहेच. मग थोडी फलदाजी बळकट करून पराभवाची उग्रता तरी कमी करावी. रमाकात देसाईला काढून त्याच्या जागी विजय मेहराला घेऊन आणि इंजिनिअरऐवजी कुंदरमला यष्टिरक्षक करून पतौडीने फक्त हेच साधले होतें.

## कन्हायची दौड

मागील सामन्यापासून नाणेंफेकीतहि विंडीज्चेच दैव बलवत्तर ठरत होते. नाणेफेक जिंकून वॉरेलने हंट–मॅकमॉरीसला खेळावयास पाठवलें. धांवसंख्या पन्नासवर गेल्यावर उम्रीगरनें त्याची दांडी उडवली. कन्हाय खेळायला आला आणि क्षेत्ररक्षण भराभर पागू लागलें. त्याने मॅकमॉरीसला मागें टाकले आणि शतकाची घोडदौड सुरू केली. पंधरा चौकार आणि दोन षट्कार मारून त्याने १३९ धावा दिवसअखेर केल्या. विंडीझचा तो पहिल्या दिवशीचा आधार ठरला. मॅकमॉरीसने ५० धावा काढल्यावर ताणून मारलेला फटका–मिडविकेटवर सरदेसाईनें पकडून प्रेक्षकाना मत्रमुग्ध केल्यावर नर्स, सोबर्स आणि कन्हाय याच्या विकेट्स् भराभर पडल्या. मॅकमॉरीस गेला तेव्हां धांवसंख्या २ बाद १६९ होती, ती ५ बाद २५७ वर घसरली. एका बाजूनें विकेट्स् पडत असतांना रॉड्रिग्यू मात्र २५ धावा काढून दिवसअखेर नाबाद राहिला. खेळ सपता सपता मेन्डोन्काचा उम्रीगरनें त्रिफळा उडवला आणि दिवस सपला तेव्हा विंडीज् संघाच्या सहा गडी बाद २६८ धांवा होत्या.

रॉड्रिग्यू दुसऱ्या दिवशी गिब्सच्या जोडीनें खेळायला आला तेव्हा विंडीझ् सघात आपली जागा पक्की करण्याची ही शेवटची संधि आहे हें तो ओळखून होता. गिब्सच्या मदतीने त्याने अर्ध्या तासात ४४ धावा वाढवल्या. त्याला धोका वाटत होता फक्त उम्रीगरचाच. त्याच्या गोलदाजीवर त्यानें एक सिक्सर मारलीच; तरीहि पतौडीने उम्रीगरकडे गोलदाजी तशीच ठेवली. आणि अखेर उम्रीगरने रॉड्रिग्यूला चकवलेच. त्याचा चेंडू फटकारण्याच्या प्रयत्नात उम्रीगरने स्टंप

उखडला. रॉड्रिग्यूनें ५० धावा करून आपला अंतस्थ हेतु मात्र साध्य केला. यापूर्वीच नाडकर्णीने गिब्सला वाटेला लावले होतें उपाहारा-पूर्वीची उमरीगरची ओव्हर सुरूं झाली तेव्हां धांवसख्या ३४६ असून आठ गडी बाद झाले होते. स्टेअर्सला या शेवटच्या षट्कांत उमरीगरनें उडवले. सुरतीनें त्याचा डाव्या हातात मिडविकेटवर सुदर झेल घेतला. आतां फक्त हॉल उरला होता. आणि वॅरिल २६ धावा काढून खेळत होता.

## हॉल हंसला !

वेस्ट इंडिज् सघ ३५० धावांत उखडू या मनोराज्यात भारतीय सघाने खाना उरकला. हॉल मनांतल्या मनात हंसत असावा.

उपाहारानतर हॉलनें जी ठोकठोक, तब्बल ८० मिनिटें, आरभिली तिला तोड नाही. तो आणि वॅरिल यानी ८० मिनिटांत ९८ धावाचा पाऊस पाडला. हॉलने ५० धावांत ७ चौकार हाणले. अखेर धावसख्या ४४४ झाली, तेव्हां वॅरेलने ९ गडी बाद डाव घोषित केला. वॅरिल ७३ आणि हॉल पन्नास धावा काढून नाबाद राहिले.

सामन्याच्या दुसऱ्या दिवशी हॉलने भारताचे पुरतेच हाल करण्याचें मनावर घेतलें असावे तिसऱ्याच चेंडूने त्यानें सरदेसाईचे स्टंपस्च फाकवून टाकले. नर्सने त्याचा सेकड स्लिपला झेल घेतला. पांचव्या चेंडूवर त्यानें सुरतीला झेलबाद केलें. एक बाद ०. दोन बाद ०. मेहरा, माजरेकर यानी आठ धांवा जमविल्या. पाच माणसें स्लिपमध्यें रचून हॉल गोलदाजी टाकीत होता. हे लक्षात घेऊन ऑफ स्टपच्या बाहेरून जाणारे चेंडू सोडून देण्याचा विवेकहि मांजरेकर जयसिंहला सुचला नाही. दोघे यष्टिरक्षक मेन्डोन्काच्या हाती कद् करण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाले. तीन बाद ९; चार बाद २५.

आता उम्रीगर मेहराच्या दिमतीला आला. मेहरा शहाणपणानें बाहेरचे चेंडू सोडत होता. तो १४ धावा काढून नाबाद राहिला. थोडी आशा वाटते न वाटते तोंच दिवस मावळायला पाऊण तास असताना मेहराचा स्टप उखडला गेला. पाच बाद ३०. काय म्हणायचं या कमाला ! हॉलचे पृथक्करण काय तर नऊ षट्कें, तीन निर्धाव, वीस धावा अन् पांच बळी.

पतौडी–उम्रीगर जोडीने नेटाने दिवस सपण्यापूर्वी धांवसख्या ६१ पर्यंत खेंचली आणि दुसऱ्या दिवशी–फॉलो ऑन मिळण्याची नामुश्की टळली.

तिसऱ्या दिवशीं पतौडी उम्रीगर यानी मोलाची कामगिरी केली, त्यानें धाव संख्या पाच बाद ३० वरून पाच बाद १२४ वर नेली. गिब्स्, हॉल, सोबर्स, स्टेअर्स या सर्वांनी जिथे हात टेकले तेथे नेमका रॉड्रिग्यू मदतीला आला. त्याचा लेग स्पिनवर उडालेला पतौडीचा झेल, स्लिपमध्यें सोवर्सनें पकडला. हा झेल म्हणजे खरोखरच एक आश्चर्य होते. जमिनीपासून फक्त तीनचार इंच उचीवर सोवर्सनें झेल उचलला वोर्डे बाहेर पडला. उम्रीगर, वोर्डे यानी धावसंख्या १४४वर नेली आणि अखेर घात झाला. उम्रीगरला यष्टिरक्षक मेन्डोन्कानें स्टंप केले. फॉलो ऑन टाळायला अजून १९१ धावा हव्या होत्या. परंतु दुराणी–नाडकर्णी, कुदरम् भराभर उडाले आणि बोर्डे ४२ धावा काढून बाद झाल्याबरोबर १९७ धावांत भारताचा डाव अटोपला. वीस मिनिटांपूर्वी उपाहार घेऊन बाहेर पडलेले सघ पुनः आत गेले.

## फॉलो ऑन

फॉलो ऑन ! पुन. तीच नामुष्की !! याचवेळीं फलंदाजाच्या अनुक्रमात क्रांतिकारक बदल करणें पतौडीला भाग पडलें. सरदेसाईला आजारीपणामुळें खाली ढकलावे लागलें आणि जयसिंह, मेहरा आघाडीला आले. जयसिंहानें नेहमीप्रमाणें बाहेरचा चेंडू फटकावण्याच्या प्रयत्नांत मेन्डोन्काच्या हाती झेल दिल्यावर–पहिल्या डावात नववा आलेला दुराणी एकदम तीन अनुक्रमात वॅट घेऊन बाहेर पडला. पतौडीने केलेला हा बदल फार चांगला ठरला. कारण मेहरा-दुराणी जोडीनें धावाची संख्या रेटणाम सुरुवात केली. स्टेअर्सला दुराणीनें लागोपाठ तीन वेळां सीमापार केले. हॉलची हकिगतहि ठीक नव्हती. गिब्स्-रॉड्रिग्यू गोलदाजी करूं लागले. चहापानाच्या वेळी दुराणी मेहराच्या दहा धावांनीं पुढें गेला होता. त्याच्या धावा ४१ होत्या- आणि धावसख्या एक-बाद ९३ होती.

चहापान आटोपून दुराणी-मेहरा बाहेर पडले आणि अर्ध्यां तासांत त्यानी ४७ धावा जमवल्या. धांवसंख्या वाढतच राहिली भागीदारीचें शतक ओलाडून झाले.

खेळ सपायला फक्त अर्धा तास उरला होता. मेहराच्या ६२ धांवा होत्या. दुराणी दमला होता. वॅरिल याच सधीची वाट पाहात होता. वॅरिलने चेंडू हॉलच्या हाती सोंपविला.

आणि झाले. मेहराचा गड हॉलने सर केला. सकाळपासून खबीरपणें खेळणाऱ्या मेहराला हॉलनें बाद केले. दोन बाद १६९.

हॉलनें स्टार्ट वाढवला. गति वाढविली. दिवसअखेर दुराणी किंवा माजरेकरला वाटेला लावायचेंच या इर्षेने त्यानें गोलंदाजीस सुरुवात केली, पण दुराणीने दाद दिली नाहीं. ९१ धावा काढून दुराणी आणि ९ धावा काढून मांजरेकर नाबाद राहिले. २ बाद १८६ धावावर तिसरा दिवस संपला.

दि. ७ एप्रिल. चौथा दिवस उजाडला. दि. ८ एप्रिलला आपल्याला वृत्तपत्रांत लंचपर्यंतची धावसख्या कळणार होती. अपेक्षेप्रमाणें मथळा होताच–" भारताचा पराभव अटळ. सोबर्स-गिब्स् यानीं उडविलेली दाणादाण !" आदल्या दिवशीची नाबाद जोडी–दुराणी–माजरेकर, खेळण्यास आली. आदल्या दिवशीच्या १८६ धावांत फक्त ६ धावांची भर पडून मांजरेकर–पतौडी वाटेला लागले होते. चार बाद १९२. दोघांनाहि सोबर्सनें झेलबाद केलें. मांजरेकरचा लेगब्रेकवर उडलेला झेल स्लिपमध्यें घेतला गेला. पतौडी–लेग स्पिनर–कन्हायच्या हातात सरळ पॉईंटवर चेंडू टोलवून निघून गेला.

## दुराणीचें शतक

नतर मात्र उम्रीगर दुराणीला येऊन मिळाला. धावा वाढायला लागल्या. दुराणीचें शतक लागलें. कसोटी सामन्यातले हे त्याचें पहिलें शतक आणि तें त्यानें वेस्टइंडीजसारख्या बलाढ्य संघाविरुद्ध आणीबाणीच्या वेळीं झळकवलें हें विशेष कौतुकास्पद. या शतकांत १४ चौकार होते. शतक लागल्यावर मात्र लगेचच १०४ धांवा काढल्यावर दुराणीचा हुक–बाऊंड्री रेषेवर रॉड्रिग्यूनें घेतला. पाच बाद २२१.

पाठोपाठ आलेल्या सुरतीलाहि गिब्स्नें हातोहात चकवलें. मेन्डोकानें त्याचा दोन धांवातच झेल घेतला. सहा बाद २३६. मधल्या वेळांत ज्या २५ धावा काढल्या त्यांतल्या. २३ उम्रीगरच्या होत्या.

सुरतीची जागा बोर्डेनें घेतली. आणि बोर्डे जबाबदारीने खेळूं लागला. फार थोडा वेळच त्याला ही स्वभावाविरुद्ध भूमिका साधली. १३ धांवा झाल्या असतांना गिब्स्च्या साध्या ऑफ ब्रेकवर त्यानें लेग स्लिपला सोबर्सच्या हातांत झेल दिला. सात बाद २७८. सरदेसाई आला आणि गेलाच. सरदेसाईनें या सामन्यात चष्मा मिळवला. आठ बाद २७८. गिब्स्नेंच झेल काढून वॉरेलच्या हातीं दिला.

बहुतेक मामला संपत आला असें वाटलें. उपाहाराला धांवसंख्या २८५ आठ गडी बाद अशी अवस्था होती. म्हणजे फक्त ३८ धावा वेस्टइंडीजच्या उरावर होत्या आणि उम्रीगर नाडकर्णी खेळत होते. सामना संध्याकाळपर्यंत आटोपणार असाच रंग भरत होता.

पण नाडकर्णी बापू अशा वेळीं नेहमी कामास येतो तसा तो याहि वेळीं आला. उम्रीगरला फक्त साथ हवी आहे हे त्यानें ओळखले. लेगला एखाद्या चेंडूला बॅट स्पर्शून एखादी धाव घ्यावी आणि उम्रीगरला खेळती द्यावी असें धोरण त्यानें आखलें. गिब्स-सोबर्सच्या गोलंदाजीवर उम्रीगरनें असा हल्ला चढवला कीं, ते दोघे जन्मांत ही फलंदाजी विसणार नाहींत. हुक्स, हल, ड्राइव्हझ्, कटस् यांचा धडाका लावून उम्रीगर शतकाच्या घरांत दौडत आला. गिब्स, सोबर्सना काढून वॉरेलनें चेंडू हॉलकडे दिला.

### अभिमन्यू उम्रीगर

उम्रीगरचें हें वैशिष्टच आहे कीं, तो खेळूं लागला की मुसंडी-पद्धतीनें खेळतो, आता तो हॉललाहि झोडपत सुटला. त्याने ३०० धावांना घेतलेल्या नव्या चेंडूचा भुसभुशीत लाडू करून टाकला. शतक ओलांडलें तरी उम्रीगरची दौड चालूच राहिली. नवव्या विकेटसाठीं नवें रेकॉर्ड झालें. धावा ३७१ वर येऊन थडकल्या. आणि नाडकर्णी रनआऊट झाला. नाडकर्णीची विकेट अन्यथा विंडीझ्ला मिळणेंच अशक्य होतें.

स्टेअर्सच्या लेगकडल्या चेंडूला उम्रीगरनें स्पर्श केला होता आणि उमरीगर मेन्डोन्का झेल घेतो कीं काय या काळजींत गीब्जजवळच मागें वळून पहात उभा राहिला. वळून पाहतो तो नाडकर्णी मेन्डोन्का झेल घेऊं शकत नाहीं याचा बरोबर अंदाज घेऊन अर्ध्या पिचवर धांवत आलेला होता. उमरीगर आता क्रीज सोडूं शकत नाही–चेंडू तर गिब्जच्या हातांत अशी परिस्थिति पाहताच नाडकर्णीनें उलट फिरून मागें झेप घेतली, परंतु तो क्रीज गाठण्यापूर्वीच स्टेअर्सनें त्याला बाद केले. नाडकर्णी २३ धांवा काढून बाद न होता तर या सामन्याचा शेवट काय झाला असतां ? कुणीं सांगावें धांवसंख्या सहाशेंवरहि गेली असती, कारण उम्रीगर १७२ धांवा काढून अखेर नाबाद राहिला. नाडकर्णी गेला तेव्हां धांवसंख्या नऊ बाद ३७१ होती. शेवटीं आलेल्या कुंदरमनें उम्रीगरला चांगली साथ दिली.

उम्रीगर आतां दमला होता, परंतु भारताच्या बॅकेंत फक्त १२४ धावांची आघाडी होती. उरल्या सुरल्या बळानें उम्रीगर गोलंदाजी झोडपूं लागला. पुढल्या पाऊण तासांत त्यानें स्वतःच्याच पन्नास धांवा केल्या.

नियमाप्रमाणें अखेरची जोडी खेळत असतां चहापान अर्धा तास पुढें ढकलावें असें ठरलें होतें. उम्रीगरला आता विश्रांतीची आशा नव्हती. १५२, १५७, १६१, आणि १६६ या धांवसंख्यांवर त्याला पाठोपाठ चार जीवदानें मिळालीं. अर्थात विंडिज् खेळाडूंनी हें कांहीं सुखासुखी होऊं दिलें नव्हतें, पण उम्रीगरनें फटकारलेल्या चेंडूंत अवसानानें घात घालावा तर हात चटका बसल्यासारखा प्रत्येक वेळीं मागें आला. उम्रीगरच्या १७२ धांवा झाल्या असतांना कुंदरम्चा मिडऑफला झेल उडाला आणि रॉड्रिग्यूनें तो घेतला.

उम्रीगर नाबाद राहून परत फिरला, तेव्हां यच्चयावत् विंडीज्–प्रेक्षकांनी तो तंबूत दिसेनासा होईपर्यंत टाळ्यांचा कडकडाट केला




शरद अभ्यंकर

५६ षटकें अन् १०७ धावांत त्यानें वेस्टइंडीज्चें पांच बळी घेतले, आणि पाठोपाठ १७२ धांवा काढून त्यानें विंडीज् सघाला विजयासाठी १७६ धावांची धांवपळ निर्माण केली. हा सामना अखेर कोणीं जिंकला याला महत्त्व असलें तरी हा सामना उम्रीगरनेंच गाजवला यांत शका नाही. विनू मनकडच्या इंग्लंडमधील पराक्रमाची ही पुनरावृत्तीच होती.

## पराभवाच्या छायेंत

वेस्टइंडीज सघाने दुसरा डाव सुरू केला. दिवस संपायला तास होता. पाचवा दिवस मोकळा होताच. एवीतेवी सामना पांचव्या दिवसावर जाणार होता, तर मग घाई कशाला ? हंट मॅकमोरीस यानी फक्त २३ धावांची वजाबाकी केली आणि दोघे नाबाद राहिले.

पांचव्या दिवशी एकाद्या प्रेतयात्रेला जावें तसा भारतीय सघ क्षेत्र-रक्षणाला उतरला. जणू सगळें सपलेंच होतें. हातातून निसटणारा एक डावाचा विजय खेचून आणणाऱ्या गिब्सची ईर्षा कुठें आणि वेस्ट इंडीजला १५४ धांवांची विजयासाठी गरज असताना सुरुवातीपासून हातावर विजयाचें उदक सोडणारा भारतीय संघ कुठें ?

मॅकमोरीसच्या २४ धावा असताना–मेहराने त्याचा सर्वांत सोपा झेल जमिनीवर ठेवला. आतापर्यंत धावसख्या फक्त ८६ पर्यंत गेली आणि मॅकमोरीस ५० धावा काढून नाबादच राहिला.

उपाहारानतर उम्रीगर खेळू शकला नाही आणि गोलंदाजी सुरती-कडे आली. नाडकर्णीचे जागी दुराणी आला. दुराणीने यावेळच्या चेंडूफेकीत हंट, मॅकमोरिस आणि कन्हाय या तिघाना ओळीनें बाद केले. ३ बाद ९३, २ बाद १००, ३ बाद १३२. वस्तुतः एका बाजूने दुराणी–गडी बाद करीत असताना दुसऱ्या बाजूला बोर्डे किंवा नाडकर्णीला गोलदाजी घ्यायला हवी होती, पण सामना आपण हरणा-रच आहोंत या थाटांत सर्व व्यवहार चालू होते. जयसिंह, मांजरेकर इजीनिअर (यावेळीं यष्टिरक्षक नव्हता-उत्तरी गरचें जागी तो क्षेत्ररक्षण करीत होता.) यानी चेंडू वाकडे तिकडे फेकूनहि कांहीं धांवा विंडी-ज्च्या पदरात टाकल्या. नर्स–सोबर्सच्या जोडीनें या गलथानपणाचा फायदा घेऊन उरलेल्या धावा गोळा केल्या. धांवा वाढत असताना बोर्डेला एकच षटक् देण्यांत आले. तें निर्धाव असूनहि त्याला पुन्हा गोलदाजी देण्यांत आली नाही.

सलीम दुराणीच्या गोलंदाजीवर अखेरचा चौकार सीमूर नर्सने मारला. हा फटका दुराणीला जेव्हा अडवता आला नाहीं आणि चेंडू दुराणीला ओलाडून सीमेकडे धावू लागताच–प्रेक्षकाच्या हल्लकल्लोळांत भारताच्या ओळीनें चौथ्या पराभवावर शिक्कामोर्तब झाले. चौथा कसोटी सामनाहि विंडीज्ने सात गडी राखून जिंकला.

शेवटच्या दिवशी भारताने ही जी स्वत.ची अप्रतिष्ठा करून घेतली त्याला मुख्यत: कर्णधार पतौडीच जबाबदार आहे. बोर्डेला एकच षटक् का दिलें ? असा प्रश्न सामना सपल्यावर विचारतां पतौडीनें आढ्यतेखोरपणानें सांगितलें " I did not want him to bowl ". जणू बोर्डेला गोलदाजी न देऊन त्याने बोर्डेवर उपकारच केलें होते बाकी या पश्चात् टीकेत काही अर्थ नाही म्हणा. सामना तर हातचा गेलाच !

## अति झालें हसूं आलें

चौथा कसोटी सामनाहि जेव्हां भारतानें गमावला, तेव्हा आमच्या-सारख्या क्रिकेट शौकिनांची–अति झाले आणि हसू आलें–अशी अवस्था झाली. हॉल–स्टेअर्स या द्रुतगति गोलंदाजांना तोंड देणें भारतीय संघाला जमलें नाहीं आणि सोबर्स–गिब्स याच्या फिरक्या संथ गोल-दाजीवरहि त्यांना खेळतां आलें नाही. त्यामुळें कधी हॉल तर कधीं स्टेअर्स, कधी सोबर्स तर कधी गिब्स भारताचा डाव उधळून लावूं शकले. एकंदरीने पाहता भारतीय सघाला तीनदां खेळी दिली असती तरीहि पराभव व्हावा इतकी भारतीय संघाची शक्ति विंडीझ संघाच्या पुढें दयनीय आहे ही गोष्ट मान्य केल्यावाचून गत्यंतर नाहीं. सध्याचा वेस्ट इंडीझ सघ हा गेल्या दहा वर्षांतील कुठल्याही संघापेक्षां बलाढ्य संघ आहे ही गोष्ट आता कशी नाकारता येईल ? ही गोष्ट मान्य न करण्याची वाणी फक्त बेनॉंचीच असूं शकते. कारण बेनॉंचाच संघ अजूनपर्यंत या सघापुढें वाकलेला नाहीं. म्हणूनच तेव्हा चारही बाजूनें वेस्ट इंडीझ संघ जगात सर्वश्रेष्ठ आहे अशी मतें व्यक्त होऊ लागली, तेव्हा बेनॉन सक्त बजावलें–" नाही, मला हें मान्य नाही ! "

## पांचवी लढत

मेलेल्याला अधिक मारू नये असा दंडक आहे, परतु क्रिकेटच्या सामन्याच्या बाबतीत हा दडक कुणी मानीत नाहीं. वेस्ट इंडिझ् संघानें भारताला ओळीने चार वेळा पराभूत केल्यावर शेवटच्या सामन्या-करितां विंडीझ, काही नवें– नवशिके खेळाडू घेऊन लढतीला उतरतील असें वाटलें होतें, परतु काहीं किरकोळ बदल करून विंडीझ पूर्वीच्याच ताकदीने पाचव्या लढतीला सिद्ध झाले.

नर्सच्या जागी पुन: सॉलोमन आला मेन्डोन्काच्या जागी ॲलन यष्टिरक्षक झाला , रॉड्रिग्ज स्टेअर्सच्या जागी व्हॅलेंटाईन आणि लेस्टर-कीग याना सामील करण्यांत आले. लेस्टर कीग हा एकच द्रुतगति गोलदाज नवीन होता. कीग हा काही हॉलइतका द्रुतगति गोलंदाज नाही ही माहिती थोडीशी आशादायक होती एवढच.


भारतीय सघांत इजिनियर, देसाई यांना वगळून कुंदरम्, रांजणे याचा समावेश झाला. रांजणे प्रथमच विंडीझविरुद्ध कसोटी सामन्यात या दौऱ्यात खेळणार होता.

पाचवा आणि शेवटचा सामना पुन: सबिना पार्क– त्रिनिदादाला दि. १३ ॲप्रिलला सुरू झाला. वेस्ट इंडिझने नाणेंफेक जिंकून फलंदाजी पत्करली. हंट–मॅकमॉरिसने डाव सुरू केला.

## रांजणेची कामगिरी

राजणे गोलदाजी करू लागला. पहिल्याच षट्कात त्याच्या आऊट स्विंगर उडवतांना हंट अडमडला आणि कुंदरम्नें झेल घेतला. यावेळीं चिन्हे जरा वेगळी दिसू लागली. मॅकमॉरिस-कन्हाय या जोडीने धांव-सख्या पन्नासावर पोचवली. पुन: असें वाटू लागले की, सामना पूर्वी-प्रमाणें वेस्टइंडिजकडे कलू लागला. तितक्यात ६४ धावावर वेस्ट-इंडिजचे दोन खदे फलंदाज तबूत परतले दुराणीने आपल्या पहिल्याच षट्कात मॅकमॉरिसला ३७ धावावर लेगबिफोर घेतले आणि त्याच धांवसख्येवर पाठोपाठ त्यानें सॉलोमनची दाडी उडवली.

आतां सोबर्स-कन्हाय जोडी मात्र भराभरा धांवसख्या वाढवण्याच्या उद्योगाला लागली. दुराणी–रांजणेच्या गोलंदाजीवर मात्र असें वाटत होते की, लचपूर्वी आणखी एखादी विकेट जाणार आणि झालहि तसेंच. ९३ धांवा झाल्या आणि राजणेचा चेंडू हुक करण्याच्या प्रयत्नांत



चंदू बोर्डे

कन्हायचा झेल रांजणेच्याच हातीं आला. कन्हाय ४४ धावांवर आटोपला. पतौडीनें निश्वास सोडला.

यानंतर वॉरेल, सोबर्सच्या दिमतीला आला. वॉरेल नेहमींच जिंकण्याच्या जिद्दीनें खेळतो. त्यानें येतांक्षणींच परिस्थितीचा अंदाज घेऊन खेळती सोबर्सला अधिक मिळावी या हेतूनें आपली हालचाल सुरु केली. सोबर्स चांगला सेट झाला होता आतांपर्यंत. उपाहारापर्यंत धावा वाढतच होत्या. आणि उपाहाराला धांवसंख्या झाली ४ बाद १२७.

उपाहारानंतर धावांवर लक्ष ठेवून वॉरेल उमेदीनें खेळायला लागला. धांवसंख्या १४० झाली असतांना रांजणेनें त्याला लेगबिफोर घेतलें. ऑफला चेंडू ड्राईव्ह करण्याच्या प्रयत्नांत तो होता. त्यानें २६ धांवा केल्या.

हॉल मैदानांत आला. प्रेक्षक षट्काराची मागणी करूं लागले. त्यानें लोकांच्या इच्छेला मान देऊन दुराणीच्या चेंडूवर सिक्सर मारली. रांजणेला पाठोपाठ सीमापार पळवले. हॉलच्या धांवा वीस झाल्या.

ही जोडी त्रासदायक वाटायला लागली. लगेच चेंडू नाडकर्णीकडे आला. नाडकर्णीने हॉलला फसविलें. फिरता चेंडू कट् करण्याच्या प्रयत्नांत त्याचा झेल उडून तो कुंदरम्ने घेतला.

हॉलची विकेट पडतांच सोबर्सच्या लक्षांत आलें कीं, चेंडू फिरकी घेत आहेत. पाठोपाठ येणारे ॲलन, गिब्स, किंग फारसा टिकाव धरूं शकणार नाहींत. धांवा करण्याची जबाबदारी फक्त आपल्यावर आहे. तो सरसावला आणि दुराणीचा चेंडू त्यानें समोरच्या दृष्टिपडद्यामागील झाडांच्या शेंड्यावरून षटकारला. सर्व सामन्यामधील हा सर्वांत मोठा षट्कार होता! ॲलन फक्त एक धाव काढून ४० मिनिटें खेळत होता. आणि या वेळांत सोबर्सनें २५ धांवा करून तो शतकाच्या दारांत घुसला.

पतौडीने चेंडू बोर्डेच्या हातांत दिला. त्याने ॲलनला झेलबाद केलें आणि धांवसंख्या झाली ७ बाद २०१. सोबर्सनें सत्तरी ओलांडली.

सोबर्सला शतक लावून द्यायचेंच नाहीं या निर्धारानें बहुधा नाडकर्णीने पाठोपाठ दोन चेंडूंत आणखी दोघांना रजा दिली. गिब्स त्याला लेगबिफोर मिळाला आणि पुढच्याच चेंडूवर त्यानें किंगची स्टंप फाकवली. नऊ बाद २१९.

व्हॅलेन्टाईन हा शेवटचा गडी आला. २२५ धावांत विंडीज संघ गडगडणार हें सर्वचजण धरून चालले होते. सोबर्सला वाटलें असेल १३ ॲप्रिल हा जणू अपशकुनी वारच असावा. शिवाय आपलेंहि हें शतक झालें तर कसोटीसामन्यांतलें १३ वें शतक होईल. बहुधा होणें कठीणच, परंतु व्हॅलेन्टाईननें त्याला अर्धा तास साथ दिली. त्यानें फक्त सात धांवा काढल्या, परंतु तेवढ्या वेळांत सोबर्स ९० धावांवर सटकला.

आतां एक धांव– दोन तुकडे या न्यायानें त्यानें बोर्डेच्या चेंडूवर षट्कार ठोकला पाठोपाठ जयसिंहाच्या गोलंदाजीवर चौकार मारून त्याने शतक पायाखाली घातलें. या कसोटीमालिकेंत भारताविरुद्ध त्याचें हे दुसरें शतक होय. जणू शतक पुरें करण्याइतकेंच खेळायचें असें त्यानें ठरविलें असावें कारण १०४ धावांवर त्यानें रांजणेच्या गोलंदाजीवर झेल दिला आणि मांजरेकरने तो धांवत-पळत पकडला. सर्वांत कमी अशा ५५३ धावांत विंडीज् संघ भारतानें उखडला होता

## खंदक ढासळले

भारताने आपला डाव सुरू केला, तेव्हां दिवसाचा खेळ फक्त पाऊणतास उरला होता. म्हणजे फार तर १०–१२ षट्कें टाकून होणार होतीं. जयसिंह-मेहरा यांतील फार तर एखादा बाद होऊन दिवसअखेर धांवसंख्या ३०–३५ होईल असें वाटलें होतें, परंतु ज्या दिवशीं भारतीय गोलंदाजांनीं मोठी मर्दुमकी केली असा भास झाला त्याच दिवशीं भारताच्या फलंदाजांनीं अवदसेचीं लक्षणें दाखविलीं. फक्त बारा षट्कांत दिवसअखेर अर्धा भारतीय संघ फक्त ३३ धांवा करून बाद झाला. या पांचहि विकेट्स लेगवर घेतल्या. सर्व झेलबाद झाले. जयसिंह–६, मेहरा–८, दुराणी–६, मांजरेकर–०, बोर्डे–० ! सगळेजण फटके मारण्याच्या धांदलींत झेलबाद झाले. एखाद्या अशुभ स्वप्नासारखा हा पाऊण तास गेला. दिवसअखेर पतौडी आठ धांवा काढून आणि नाडकर्णी शून्य धांवा काढून नाबाद राहिले. किंगचे पृथक्करण होते सहा षट्कें, एक निर्धाव, वीस धांवा आणि पांच गडी बाद !

सूर्य मावळतो म्हणून ठीक नाहींतर आणखी थोडा वेळ मिळतां तर तेवीस वर्षांच्या या लेस्टर राजानें सर्व भारतीय फलंदाजांचें थडगेंच बांधलें असतें. अडचण पडली असती फक्त—नाडकर्णी बापूची !

कॉन्ट्रॅक्टरला डॉक्टरांनीं एक वर्ष क्रिकेट खेळूं नको असा सल्ला दिल्याची बातमी वरील हकिगतीबरोबरच दि. १५ च्या वृत्तपत्रांत

आली. खरे पाहातां सगळ्याच भारतीय आघाडीच्या वीरांना एक वर्ष क्रिकेटमधून हद्दपार करायला हवे होतें. कॉन्ट्रॅक्टर, जयसिंह, कुंदरम्, मेहरा–सगळे एकाच माळेचे मणी ठरले होते.

दि. १५ च्या वृत्तपत्रात सर विश्वेश्वर अय्यांच्या मृत्यूचें दुःखद वर्तमान वाचवल्यावर, दृष्टि वेस्ट इंडीजमधील बातमीकडे वळली दुसऱ्या दिवशींच्या उपाहारापर्यंतचा खेळ भारताने बहादुरीचा केला होता.

पतौडी १४ धावा काढून हॉलच्या गोलंदाजीवर धांवसख्या ४० असतानाच बाद झाल्यावर सुरती-नाडकर्णी जोडीने ७२ धावांची मोलाची भर घातली. उपाहारापूर्वी जेव्हां सुरती ४१ धावा काढून गिब्सच्या गोलंदाजीवर बाद झाला तेव्हां भारताने शतक ओलांडून धांवसख्या ११२ केली होती. सुरतीने षट्कार मारला आणि नाडकर्णीने आपल्यालाहि षट्कार मारतां येतो हें पाठोपाठ दाखवून दिलें. ही जोडी षट्कार मारूं लागली, तेव्हा वॉरेल चुळबुळू लागला. गिब्सने अखेर सुरतीची दांडी घेतली. उम्रीगर-नाडकर्णी ही मागील सामन्यात गाजलेली जोडी भागिदारीसाठी पुनः सुसज्ज झाली. पुनः भारत अडचणीत सापडला होता; आणि सारी उमेद या जोडीवर होती. उपाहारापूर्वी खेळ थाबला, तेव्हा भारताच्या सात बाद १३५ धांवा होत्या.

उपाहारानंतर खरोखरच जें काहीं करायचें तें याच जोडीनें केलें. १७० धावाची सरहद्द त्यांनी गाठली. किंग-हॉल आता रद्द झाले होते आणि सोबर्स-गिब्स गोलंदाजी टाकीत होते. १७१ धावसख्या असतांना गिब्सला नाडकर्णी तोंड देऊ लागला. त्याच्या बॅटेला-चेंडू अडविण्याची सधीच न मिळता गिब्सचा शूटर नाडकर्णीच्या बॅट· खालून विकेटवर आदळला. नाडकर्णी बाद झाला. बापू गोखले पडला. –आतां ! प्रतिकारच संपला. उमरीगरने कुंदरमला वांचविण्याच्या प्रयत्नांत सहा धांवा काढल्या, परंतु तें जमलें नाही. कुदरम्ची १७८ ला मॅकमॉरिसने विकेट घेतली. तो झेलबाद झाला. राजणे खेळण्यास आला. रांजणेची उम्रीगरला साथ देण्याची इच्छा होती, पण भारताच्या दुर्दैवाने उम्रीगरलाच गिब्सने लेग बिफोर घेतला. भारताचा डाव १७८ धावात संपला. विंडीजला ५५ धावांची अत्यंत अल्प आघाडी मिळाली. बाकी ५५ धांवा ही अल्प आघाडी कसली म्हणा ! पहिल्या ५ धावा करतानाच भारताचे ४-५ गडी सपायचे ! तेव्हा या आघाडीत फारसा अर्थ नव्हता.

### भारताची उलट थप्पड

पण दिवस मावळण्यापूर्वी भारताने विंडीझच्या छातींत धडकी भरावी असा खेळाचा रंग पालटून टाकला. पहिल्याच षट्कांत सुरतीनें हटची विकेट घेतली त्याचा झेल पुनः कुदरमनेच घेतला. दुसऱ्या पट्कात त्यानें सॉलोमनला त्रिफळा उडवून त्याला चष्मा घातला. एक बाद एक; दोन बाद एक; कन्हाय पाय लचकून खेळू शकत नव्हता. सोबर्स-मॅकमॉरिस खेळू लागले. चहापानाला संघ तंबूत आले, तेव्हा सोबर्स १८ धावा काढून आणि मॅकमॉरिस चार धांवा काढून नाबाद होते. धावसख्या होती दोन बाद ३३ !

चहा घेऊन सोबर्स बाहेर पटला आणि त्याची बॅट अशा वेगानें फिरू लागली कीं विचारू नका ! पाठोपाठ त्याने दुराणीला तीन वेळां सीमापार करून धावा पन्नास ओलांडून ओसडू लागल्या.

क्षेत्ररक्षण पांगू लागलें. पतौडी अस्वस्थ झाला. सामना निसटू पाहात होता. पुनः चेंडू सुरतीकडे आला. दुराणी–रांजणे लाव पांगले. ७४ धावसंख्या असतांना सुरतीनें दिलेलें काम उरकलें. त्याच्या गोलंदाजीवर कुंदरमनें सोबर्सचा झेल घेतला. ५० धांवा काढून सोबर्स परत फिरला. वॉरेल–मॅकमॉरिस ही जोडी प्रथमच एकत्र आली. नेहमी वॉरेल येण्यापूर्वी मॅकमॉरिस गेलेला असे. दुसऱ्या बाजूनें बोर्डे गोलंदाजी करीत होता.

मॅकमॉरिस अपघाती बाद झाला. बोर्डेच्या नावे त्याची विकेट जमा झाली असली तरी वस्तुत: बोर्डेचा तो चेंडू त्याने सीमापार पाठवला होता. चेंडू सीमापार गेला परंतु हातांतील बॅट सुटून स्टपवर आपटली आणि मॅकमॉरिस बाद झाला. धांवसंख्या होती ११८.

वॉरेल आता ॲलनला वाचवू लागला. मध्येंच तो चौकार हाणी. ॲलनने दोन धांवा करीपर्यंत वॉरेलनें १८ धांवा केल्या. खेळ संपत आला होता. शेवटच्या षट्कांत दुराणीनें वेस्ट इंडिज्ला आणखी दोन धक्के दिले. पाठोपाठच्या चेंडूने त्यानें ॲलन आणि गिब्स यांना लेग बिफोर घेतलें. पांच बाद १३८; सहा बाद १३८ ! दिवस मावळला. हा सामना या दिवशी निश्चित भारताच्या बाजूला कललेला होता.

रविवारीं खेळ बंद असतो. अर्थातच सोमवारच्या वृत्तपत्रांत आपलेकडे वेस्टइंडिझचें वृत्त बदच होतें. या एका दिवशीं भारतांतल्या क्रिकेटप्रेमी जनतेंत एकच प्रश्न विचिला जात होता. ही टेस्ट भारत जिंकणार काय ? वेस्ट इंडिज्चे फक्त चार खेळाडू उरले होते आणि सामन्याचे दोन दिवस शिल्लक होते. विंडीझनें अगदीं ३५० ची आघाडी मिळवली तरी ही धावसंख्या भारताच्या आवाक्यात होती. मात्र शेवटच्या दिवशीं प्रतिपक्षाचे खेळाडू बाद करून सामना जिंकणें जेवढें शक्य असतें तेवढे धांवा करून जिंकणे कठीण असतें. फारच थोड्या धांवा करायच्या असतील तर गोष्ट निराळी, पण शेवटच्या दिवशी २०० धांवा मंगावर असल्या तर सामना हातांत आहे असे धरून चालतां येत नाहीं.

आपल्याकडील मंगळवारच्या वृत्तपत्रांत तिकडील सोमवारचें म्हणजे सामन्याच्या चौथ्या दिवसाचें उपाहारापर्यंतचें वृत्त वाचावयास मिळालें. तें या दृष्टीनें फारसें आशादायक नव्हतें. उपहारापर्यंत फक्त लेस्टर किंग–बाद होऊन धांवसंख्या २२१ वर गेलेली होती. वॉरेल ६४ आणि कन्हाय ३३ धावांवर खेळत होते. २०७ ला घेतलेला नवा चेंडूहि निष्प्रभ झाला होता. उपाहाराला अर्धा तास असतांना पावसामुळें खेळांत व्यत्यय आला.

धांवा कमीतकमी राखण्याच्या दृष्टोनें चेंडू नाडकर्णीकडे आला. उपाहारानतर मात्र ढगाळी हवेत राजणेचे चेंडू खेळणें कन्हायला जड जाऊ लागलें आणि अखेर त्याचा एक चेंडू जमिनीसरपट वेगाने विकेटवर घुसून त्यानें कन्हायला ४१ धावावर तंबूत पाठवलें. ८ बाद २३२.

### वॉरेलची धडपड

आता हॉल ! धाकधूक होती याची. परंतु त्याच्या १० धांवा होतात न होतात तोंच सुरतीनें त्याला लेग बिफोर घेतलें. नऊ बाद २४८. त्यानंतर व्हॅलेन्टाईन आला. पहिल्या डावात त्यानें अशीच अॅन वेळी चांगली साथ दिली होती, परंतु वॉरेल आता नशिबावर

विसंबून राहाण्यास तयार नव्हता. त्याच्या ७० धांवा होत्याच. त्यानें बोर्डेचे दोन चेंडू पाठोपाठ षटकारून १२ धावांनीं आपली पोतडी भरली. ८२ धावांची संख्या पाठुंगळीस घेऊन वॉरेल आता शतकामागें लागला. पुन: पाऊस आला. खेळ वीस मिनिटें थांबला.

यानंतर खेळ सुरू झाला. तेव्हा वॉरेलनें दोन चौकार मारून आपली वैयक्तिक धांवसंख्या ९७ वर नेली. परत पाऊस आला. पळापळ झाली. वेळ वांचविण्यासाठीं चहापान अलीकडे ओढण्यांत आलें.

आतां सर्वांचें लक्ष वॉरेलच्या शतकाकडे होतें. व्हॅलेन्टाईननें सात धांवा काढून एक टोंक अडवलें होतें, परंतु वॉरेलला दुर्बुद्धि झाली. त्यानें नाडकर्णीच्या गोलंदाजीवर फक्त एक धांव घेतली आणि व्हॅलेन्टाईनला नाडकर्णीसमोर सोडले. व्हॅलेन्टाईन नाडकर्णींच्या चेंडूवर पायचित झाला ! वॉरेलनें एवढे षट्कार-चौकार मारले—येवढी एक धांव न घेतां त्यानें नाडकर्णीचा एकादा चेंडू सिमेपार केला असतां तर शतक हातातोंडांतून ओघळलें नसतें. विपरीत बुद्धि थोरांनामुद्धां फशीं पाडते ती अशी. विंडीज्चा दुसरा डाव २८३ वर संपला. वॉरेल ९८ धांवा काढून नाबाद राहिला. भारतावर वेस्ट इंडिझला ३५८ ची आघाडी मिळाली.

अजून १॥ तास खेळ शिल्लक होता. सामना हातांतून निसटतो आहे हें पाहात असतांनामुद्धां जयसिंहानें नेहमींचीच चूक केली. फटका मारण्यासाठीं तो किंगच्या चेंडूला समोर गेला आणि चेंडूचा टप्पा हुकला. जयसिंह पायचित होऊन परतला. १ बाद १५. भरवशाचं एकहि कुळ भारताजवळ नव्हतं. दुराणी लेस्टर किंगच्या पुढच्याच षट्कांत पायचित झाला. दुराणीनें फक्त एक चौकार मारला. दोन बाद २१.

भारताचा फलंदाजीचा अनुक्रमहि पतौडीनें कप्तान झाल्यापासून उलटासुलटा केला होता. बोर्डे बाहेर आला. बोर्डे-मेहरा जोडीनें १५–१६ धांवा फार जपून खेळून वाढवल्या आणि सुदैवानें दिवस-अखेर दोघे नाबाद राहिले. धांवसंख्या होती फक्त ३७.

दि. १८ एप्रिल उजाडला. हा शेवटचा सामना भारत जिंकण्याची कांहीं टक्के तरी अशा होती. सर्वजण उत्सुकतेनें उपाहारापर्यंतची धांवसंख्या कळावी म्हणून उत्सुक होते. वृत्तपत्रांनीं आणि नभोवाणीनें पुन: अशुभ कळवलें. पराभव अटळ ! मेहरा–बोर्डे जोडीनें सावधपणें खेळून धांवसंख्या ७४ वर आणली. कांहीं विशेष घडेल असें विंडीझ प्रेक्षकांच्या मनांत डोकावतें न डोकावतें तोंच सोबर्स भारताच्या छातीवर बसला. मेहरा–पतौडी–बोर्डे यांचे त्यानें पाठोपाठ तीन षट्कांत बळी घेतले. पराभवाची छाया उघड उघड भारतावर घुटमळूं लागली.

## वॉरेलची कानगोष्ट

या खेळाडूंना बाद करण्यांत वॉरेलचा हात होता. त्यानें सोबर्सला चेंडू देतांना कानगोष्ट सांगितली. सोबर्स–ओव्हर दि विकेट–गोलंदाजी करण्याचें स्थगित करून–राऊंड दि विकेट–गोलंदाजी टाकूं लागला. वॉरेलला आठवलें असावें कीं, याच क्लृप्तीनें बेनॉनें विंडीझच्या हातांतला विजय ऑस्ट्रेलियाकडे हिसकावून घेतला होता. हीच मात्रा लागू पडली. मेहरानें ३७ धांवांवर ॲलनच्या हातांत झेल दिला आणि तीन धावांची भर पडते न पडते तोंच बोर्डेची ऑफ स्टंप सोबर्सनें उखडली. बोर्डे २६ ! पतौडीचा त्रिफळा तिसऱ्या षट्कांतच सोबर्सनें उडवल्यावर मात्र भारताचें कंबरडेंच मोडलें! ५ बाद ८६ !

उम्रीगर मांजरेकरला येऊन मिळाला. वॉरेलनें चेंडू किंगकडे दिला. कांहीं वळेना, तेव्हा त्यानें दुसऱ्या बाजूला हॉलला उभें केलें. मांजरेकर–उमरीगर जोडी फुटल्याखेरीज यश जरा बिचकतें आहे हें वॉरेल ओळखून होता. त्यांत आणखी मांजरेकरच्या १३ धावांनंतर सॉलोमननें झेल सोडला. वॉरेलनें किंग-हॉलला काढून व्हॅलेन्टाईन–गिब्सना आणलें. ११८ धांवा ५ बाद असतांना उपाहारची वेळ झाली. उपहारानंतर पाऊस येऊं लागला. त्यामुळें पांच बाद १३० धावा असतांना खेळ सोडून देण्यांत आला.

पांचव्या दिवशीं खेळ सुरू झाला. मांजरेकर-उम्रीगर यांच्याकडून कांहीं विक्रम होईल हें स्वप्न, स्वप्नच ठरलें. मांजरेकरला आल्या आल्या सोबर्सनें पायचित केलें. मांजरेकर ४०. एकूण सहा बाद १३५. आतां आला सुरती.

## सुरतीची लूट

सुरती आल्यावर खेळाला तास–दीड तास रंग भरूं लागला. सुरती –उम्रीगर जोडीनें दीड तासांत ८३ धांवा लुटल्या. उपाहारापर्यंत भारताचें पारडें जड होणार असें वाटतें न वाटतें तोंच सुरतीनें काढता पाय घेतला. आजहि सोबर्स भारताला धास्तावीत होता. ॲलननें सुरतीला स्टंप केलें. सुरती ४२. एकूण सात बाद २१८.

उपाहारानंतर पंधरा मिनिटांत सगळें गाडें ऑफस् ! हॉलच्या हातांत नवा चेंडू येतांच त्यानें उम्रीगर–कुंदरम्चे स्टंप्स उखडून टाकले. नाडकर्णीचा झेल ॲलनच्या हातीं दिला. त्या दुसऱ्या फेरींत हॉलनें सात षट्कें टाकलीं. एक निर्धाव, सात धावा आणि उरलेल्या तिघांनाहि त्यानें आटोपून टाकलें. झटपट मामला !!

झालें, पांचवा सामनासुद्धा १२३ धावांनीं भारतानें गमावला. चार सामन्यांमधील अपशय धुवून टाकण्याची उरलीसुरली संधि हुलकावणी देऊन निघून गेली. कडवट आठवणींची चव फक्त शिल्लक राहिली.



—शरद अभ्यंकर.

हॉलनें उम्रीगरला सर्वांत शेवटीं बाद करून पांचव्या सामन्याचें भरतवाक्य उरकावें ही गोष्ट औचित्यपूर्ण होती. या सर्व कसोटी सामन्यांतील पराभवाचं थडगं बांधणारा शिल्पकार होता वेस्ले हॉल ! भारताच्या वतीनें प्रत्येक सामन्यांत वेस्ट इंडिजला रडकुंडीला आणलें तें उम्रीगरनेंच. वॉरेलच्या तोंडचें पाणी पळवणारा बहाद्दर हाच. भारतांतील क्रिकेट शौकिनांच्या मनांत आशा तरळत ठेवणारा हाच एकमेव वीर. तोच शेवटीं पडावा हेंहि औचित्यपूर्णच झालें.

सामना अटोपल्यावर वॉरेल म्हणाला, " वस्तुतः भारतीय संघ चांगला होता. त्यांचा दोष हाच की, त्यांच्या मनांत हॉलच्या गोलंदाजीबद्दल कायमचें भीतीनें ठाणें मांडलें होतें. अन् त्यामुळेंच पहिले सामने गमावले गेले. त्यानंतर कुठें त्यांचा या भीतीवर कबजा बसूं लागला होता. एकंदरीत भारताचा संघ शक्तिमान आहे. नजिकच्या भविष्यकाळांत माझ्या या म्हणण्याचा प्रत्यय येईल. या संघांतील तरुण खेळाडू या दौऱ्यांतील अनुभवावरून बोध घेऊन अधिक परिपूर्ण होतील असा माझा विश्वास आहे. "

## शोकांतिकेची चर्चा

विजेत्यानें पराभूतासंबंधी चांगलें बोलावें असा प्रघात आहे. त्याच दृष्टिकोनांतून वॉरेलच्या बोलण्याकडे पाहाण्याचें कारण नाहीं. वॉरेलच्या बोलण्यांत खरोखरच तथ्य आहे. हॉल-स्टेअर्स-किंग यांच्यापुढें आपल्या फलंदाजांना खेळतां येणार नाहीं यांत आश्चर्य नाहीं. भारतांत द्रुतगति गोलंदाज नाहींत. मग त्यांना द्रुतगति गोलंदाजीवर खेळायचा सराव कसा होणार ? विचार करतां असें वाटतें कीं, ज्यावेळीं इंग्लिश संघाने ट्रूमन आणि स्टॅथॅम यांना भारतांत न पाठवण्याचा निर्णय घेतला त्याचवेळीं विंडीझ-भारत संघाचें भवितव्य ठरलें. हे दोघे इंग्लिश संघाबरोबर भारतांत येते तर द्रुतगति गोलंदाजीचा थोडाफार सराव आमच्या खेळाडूंना झाला असता. यामुळें इंग्लंडला आपण कलकत्ता आणि मद्रासला नामोहरम करूं शकलों नसतों, तरी तें शिक्षण वेस्ट इंडिजला उपयोगी पडलें असतें.

भारतांत द्रुतगति गोलंदाज कां नाहींत ? याचें उत्तर शोधणें भाग आहे. भारतांतील ज्या समाजांतील थरांत भरपूर उंची आणि ताकदीचीं मुलं उपलब्ध असतात तीं शाळा-कॉलेजांत जाणारीं नसतात. त्यामुळें खेळांची गोडी त्यांना लागत नाहीं. आणि द्रुतगति गोलंदाज होण्यासाठीं लागणारें योग्य तें शारीरिक बलच नसणाऱ्या मुंबई-पुण्याच्या मध्यमवर्गीय-मध्यम बांध्याच्या मुलांना ही द्रुतगति जमणारी नाहीं.

मध्यंतरीच्या काळांत क्रिकेट कंट्रोल बोर्डानें शोधून काढलेला पर्याय म्हणजे परदेशांतील द्रुतगति गोलंदाजांना इथं खेळायला बोलवायचें. या प्रयोगानें अर्धें यशच येण्याची शक्यता जास्त. आपण फक्त द्रुतगति गोलंदाजीवर खेळूं शकूं पण असे गोलंदाज इथें कसे पैदा होणार ?

पराभवानंतर भारताच्या कर्णधारानें नरी कॉन्ट्रॅक्टरनें बराच काळ कांहीं वक्तव्य केलें नव्हतें. तब्बल दीड महिन्यानंतर ३१ मेला मद्रास येथें त्यानें सांगितलें.-" जयसिंहा, मांजरेकर, पतौडी यांना विंडिझविरुद्ध यश लाभलें नाहीं हेंच पराभवाचें मुख्य कारण. "

वॉरेलचें वक्तव्य कुठें आणि कॉन्ट्रॅक्टरचें कुठें ! खेळांतच नव्हे तर विचारांतहि आम्ही हिणकस आहोंत असें म्हणावें लागतें. त्या दौऱ्यांत सर्वांत मोठें अपयश कॉन्ट्रॅक्टरचेंच होतें. जयसिंह-कॉन्ट्रॅक्टर ही सलामीची जोडी कधींच उभी राहिली नाहीं. कॉन्ट्रॅक्टर जखमी झाल्यामुळं पुढल्या सामन्यांत खेळूं शकला नाहीं आणि खेळला असता तरीहि खेळूं शकला नसता हें सत्य आहे.

दौरा आटोपला. या दौऱ्याची फलश्रुति काय ? पहिली कसोटी संपली तेव्हा सर्वांनाच वाटलें " बचेंगे तो और भी लढेंगे " परंतु आम्ही पुरेसें लढलोंहि नाहीं आणि पराभवांतून बचलोंहि नाहीं, मात्र जवळ जवळ प्रत्येक कसोटी सामन्यांत कांहीं क्षण तरी सामना विंडीझवर उलटतो कीं काय अशी घबराट भारत संघानें निर्माण केली. प्रत्येक सामन्यांतलीं हींच पांच-पंचवीस मिनिटें काय तीं भारताच्या ऐश्वर्याचीं. नुकत्याच संपलेल्या पाकिस्तान-इंग्लंड सामन्यांत पाकिस्तान अथपासून इतिपर्यंत मारच खात गेलें. तशी भारताची विंडीझबरोबर स्थिति झाली नव्हती. म्हणून रूप आठवायचेंच झालें तर तें दुराणीच्या फसव्या गोलंदाजीचें, क्वीन्स पार्क, ओव्हलवरील त्याच्या शतकाचें, सबिना पार्कवरील बोर्डेच्या पराक्रमाचें; पोर्ट ऑफ स्पेन येथील उम्रीगर आणि केनिंग्स्टन ओव्हल येथें सरदेसाईनें गाजवलेल्या प्रतापाचें किंवा सुरतीच्या डावखुऱ्या चढाईचें ! हेच प्रताप आणि हेच पराक्रम आठवले तर पुढच्या विंडीझ-भारत फेरींत काळवंडलेलीं क्षितिजें भारत उजळून टाकील.-

●●●

[ या लेखाचा पूर्वार्ध -' बचेंगे तो और भी लढेंगे ' ' जून ' अंकांत दिला होता. ]



सुतार, लोहार, गवंडी व मजूर-

उत्पादक सहकारी सोसायटी लिमिटेड

अहमदनगर

-- चेअरमन --
रामभाऊ देवजी पुंड

# आ
# आ र ती
# ती

## अेक निराळा बोलपट

—रंगा मराठे



'आरती' मध्यें मीनाकुमारी, अशोककुमार

हिंदी चित्रपटांचा सांचा आतां ठरून गेला आहे. त्यांत वेळीं अवेळीं घातलेल्या भडक नाचगाण्यांचा मसालाहि आता जुना व बेचव झाला आहे. साधी सरळ आणि हृदयाला भिडणारी कथा पडद्यावर दिसेनाशी झाली आहे. जीवनाचं गढूळ आणि विकृत स्वरूप पडद्यावर दाखविलं जातं. नायक नायिकेचं कृत्रिम प्रेम, त्यांच्या नकली प्रणयाने बरबरटलेले अतिरंजित प्रसंग, त्यामध्यें आलेले अडथळे, नंतर गुंतागुंत, निरगांठ आणि उकल ! चित्रपटनिर्माता, दिग्दर्शक, नटनटी आणि प्रेक्षक या सर्वांना हा Formula आतां पाठ झाला आहे.

"आरती" हा चित्रपट अशा बहुसंख्य हिंदी चित्रपटांत अपवाद आहे. आरती हें नांवच साधं आणि सरळ असल्यामुळें मन आकर्षून घेतं "आरती" चित्रपटाचे जे Posters जागोजाग लावलेले दिसतात त्यामुळें चित्रपटाबद्दल कुतूहल वाढतं. या कुतूहलाने आणि नांवातील साधेपणामुळेंच या चित्रपटाकडे लोकांचं लक्ष वेधतं.

**कथानक :**

आरती ( मीनाकुमारी ) ही एका श्रीमंत खानदान घराण्यांतील बड्या बापाची एकुलती एक आणि सुंदर मुलगी. तिच्या जीवनावरच या बोलपटाची कथा गुंफली आहे. त्यांच्याच घरांत वाढलेल्या प्रकाशला ( अशोककुमार ) आरतीच्या वडिलांनी मुलासारखा मानलेला असतो. आरती आणि प्रकाश दोघेहि मेडिकल कॉलेजांत शिकत असतात. पुरांत सापडलेल्या माणसांना वैद्यकीय मदत करण्यासाठीं आरती पूरग्रस्त भागांत जाते, प्रकाशहि तिच्याबरोबर जातो. एका मोडकळीस आलेल्या पुलावरून तांतडीची वैद्यकीय मदत देण्यास जात असतांना आरती पुराच्या पाण्याच्या प्रवाहांत सांपडते. प्रकाश कांहीं करूं शकत नाहीं. एक तरुण उडी मारून आरतीला वर काढतो. व तिचे प्राण वांचवितो. त्याचं नांव दीपक (प्रदीपकुमार)

प्रकाश, आरती आणि दीपक या तिघांचा प्रेमाचा त्रिकोन (Love Trangile ) तयार होतो. आरतीचं प्रेम दीपकवर असतं. आरतीवर प्रकाशचं प्रेम असत. दीपक हा एक बेकार आणि गरीब तरुण असतो. तो कवी असतो. वैद्यकीय शिक्षण घेण्यामागें गोरगरिबांची सेवा करण्याचा पवित्र हेतु आरतीच्या मनांत असतो. शिक्षणामागील प्रकाशचा हेतु पैसे मिळवून नांवलौकिक मिळावा असा असतो. तो आरतीला पसंत नसतो. आरती आणि प्रकाश पदवीधर होतात. प्रकाश सर्जनच्या उच्च शिक्षणासाठी परदेशीं जातो. आरती हॉस्पिटलमध्यें रोग्यांची सेवा करते. तेथच योगायोगानें तिची आणि दीपकची पुन्हा गाठ पडते. पुढें परिचय वाढतो आणि त्याचं प्रेमांत रूपांतर होतं.

प्रकाश परदेशांतून सर्जनची परीक्षा पास होऊन परत येतो. आरतीच्या वडिलांची तिनं प्रकाशशीं लग्न करावं अशी इच्छा असते. प्रकाशचंही तिच्यावर प्रेम असतं व तो तिला मागणी घालतो. त्याच्या मागणीला व वडिलांच्या इच्छेला न जुमानता ती दीपकशी लग्न करते. दीपकची घरची स्थिती अत्यंत गरिबीची असते. वडील, मोठा भाऊ त्याची बायको व मुलं अशीं घरांत असतात. त्यांच्यांतच आरती दीपकशी सुखानं संसार करूं लागते. आरती घरांत येते त्याच दिवशी दीपकला दोनशें रुपयांची नोकरी लागते. प्रकाशची भावजय अतिशय खाष्ट असते. तिच्या तोंडाचा पट्टा सारखा चालू असतो. घरांतलं सारं काम ती आरतीच्या माथ्यावर मारते. आरती त्यांतच आनंद मानते. जावेच्या मुलांना आरतीचा लळा लागतो. सासरा पण आरतीवर मुलीपेक्षा जास्त माया करूं लागतो. (या ठिकाणीं आठवण होते ती "माझें घर माझीं माणसें"—या मराठी चित्रपटाची.)

**हरवलेल्या प्रेमाचा बळी**

इकडे प्रकाश आपल्या मैत्रीणीशीं लग्न करतो. पण तो संसारांत रमत नाहीं. तो एक नामांकित सर्जन म्हणून प्रसिद्धीस येतो. पण तो

आरतीला विसरूं शकत नाहीं. सूडबुद्धीनं तो आरतीच्या संसारांत विष कालवण्याचा प्रयत्न करतो. तिच्या लग्नाच्या पहिल्या वाढदिवशीच एका मोठ्या ऑपरेशनसाठीं तिला मदत करायला बोलावतो. आरती लग्नाचा वाढदिवस असूनहि ऑपरेशनसाठीं जातें. दीपकचं ह्या व अशा अशा अनेक गोष्टींमुळें मन कलुषित होतं. तो तिला प्रकाशवरून वाटेल ते बोलतो. आरती घर सोडून आपल्या माहेरीं येते. आरती घर सोडून गेल्यानं सासरा, दीर, जाऊ सारे बेचैन होतात. जावेची मुलं आरतीचा ध्यासच घरतात. पण दीपकच्या मनांत तिच्याविषयी रुजलेलं विष मात्र कमी होत नाहीं. अस्वस्थ मनःस्थितीत तो घराबाहेर पडतो आणि मोटर-अपघातांत सापडतो. त्याच्या डोक्यावर जबर दुखापत होते व त्यावर शस्त्रक्रिया करणं आवश्यक असतं.

प्रकाशसारखा नामांकित सर्जनच ह्या शस्त्रक्रियेला हवा असतो. आरती त्याला ऑपरेशन करण्याची विनंती करते. प्रकाशची सूडबुद्धी जागी होते. दीपकचे प्राण प्रकाशच्या हातांत असतात. प्रकाशला आरती हवी असते. दीपकचा कांटा आयताच त्याच्या मार्गांतून दूर होणार असतो. प्रकाशच्या मनांत द्वंद्व चालू होतं. अखेर तो आरतीची विनवणी मान्य करतो. आपल्या नवऱ्याचे प्राण वाचविले तर आपण वाटेल ते द्यायला तयार आहोंत असं ती प्रकाशला वचन देते. अखेर प्रकाश ऑपरेशन करायला तयार होतो.

ऑपरेशन यशस्वी होतं. दीपकला जीवदान मिळतं. आरतीला आपला पति परत मिळतो. आपल्या पतीचे प्राण परत दिल्याबद्दल प्रकाश काय मागणार आहे याची आरतीला कल्पना येते. प्रकाशचं बोलावणं आल्यावर ती विषाची बाटली घेऊन त्याच्याकडे जाते. त्यानं ती मागणी केल्यावर ती विष घेण्याचं ठरविते. प्रकाशचं मन पालटतं. तो तिला सांगतो की, "तू सुखी असावीस येवढीच माझी इच्छा आहे" आरतीला आनंद होतो. सारी मंडळी तिथं जमतात. आरती मनोभावे प्रकाशला वंदन करते. दीपक आरतीचं पुनर्मीलन होतं. तसंच प्रकाशचं आणि त्याच्या बायकोचं. सर्वजण आनंदित होतात.

## पोट कथानकाचें ठिगळ

बोलपटाचं कथानक थोडक्यांत असं आहे, पण या कथानकाला एक पोटकथानक जोडून त्यांतून विनोद निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. मेडिकल कॉलेजातील एक विद्यार्थिनी व तिच्यावर उल्लू झालेले दोन प्रियकर व त्यांच्या प्रियाराधनांतून निर्माण झालेला विनोद हें पोटकथानक या चित्रपटात टाकलें आहे. त्यामुळें बोलपटाची लांबी सहा हजार फूट वाढली आहे. वास्तविक या पोट कथानकाचा मूळ कथेशी काहीहि संबंध नाही. त्यामुळें हें पोटकथानक मूळ कथेला पोषक न होता वारंवार रसभंग होतो. ज्या आरतीच्या जीवनावर ही कथा गुंफली आहे ती साधी आणि सरळ आहे. त्याच्या अनुषंगाने काही प्रसंग टाकले असते तर मूळ गंभीर कथानकाला जास्त उठाव आला असता, पण तसें न करतां बोलपटाची लांबी निष्कारण वाढली आहे.

## दिग्दर्शकाचें कौशल्य—

मात्र चित्रपटात बरेचसे प्रसंग संयमाने हाताळले आहेत त्यामुळें ते जास्त उठावदार झाले आहेत. दीपक आणि आरतीच्या भेटीचे सुरुवातीच्या प्रसंगाचें दिग्दर्शन हळुवार हातान केल्यामुळं त्याची प्रतिक्रिया चांगली होते. आरतीचे प्राण वांचविल्यानंतर अचानकपणें तिची व दीपकची हॉस्पिटलांत गांठ पडते. त्याचा हात मोडल्यामुळें तो उपचार करण्यासाठीं तिथ येतो. त्यानंतर भेट वारंवार होऊं लागते. गोरगरिबांना वैद्यकीय मदत करण्यासाठीं आरती झोपड्या-झोपड्यांतून फिरते. त्यावेळी दीपक तिला मदत करतो. सारा दिवस खूप काम केल्यानंतर आरती थकते व मधल्याच एका वाटेनें चालायला लागतें. त्यावेळी दीपक तिला विचारतो, "इकडं कुठं निघालीस?" आरती त्याला म्हणते, "मी फार दमलें आहें. आपण निवान्तपणें कुठंतरी बसू या."

ती दोघं एकांतात जाऊन बसतात, त्यावेळी एकमेकाचं मन मोकळ करतात. त्याच वेळीं आरतीचं दीपकवर प्रेम आहे याची जाणीव होते. हा प्रसंग जास्त भडक केला असता तर त्यांतील हळुवारपणाची गमत गेली असती. पण दिग्दर्शकानं त्यात सौम्यपणा आणल्यामुळें तो चांगला वाटतो.

आरतीच्या व्यक्तिरेखेला बाध येईल असा एकहि प्रसंग चित्रपटांत नाही. दीपकनें ज्या क्षणीं आरतीचे प्राण वांचवले त्याच क्षणापासून मनानें ती त्याच्याकडे आकृष्ट झाली हें सूचित करणारा प्रसंग हें श्री. फणी मुजुमदार यांच्या कौशल्याचे उदाहरण सांगता येईल. आरतीला पाण्यातून बाहेर काढल्यानंतर काही काल ती आजारी असते. आरती कॉटवर पडलेली असून प्रकाश तिच्या कॉटशेजारी बसून तिचा हात कुरवाळूं लागतो. प्रकाशची ही लगट टाळण्यासाठी आरती त्याला खोलीतील दिवा बारीक करण्यासाठी उठावयास लावते आणि पुनः उठून खिडकी उघडून टाकण्यास सांगते, प्रकाश अस्वस्थ होतो. त्याला प्रथमच आरतींत बदल होत असल्याची चाहूल लागते. हा सर्वच प्रसंग हेतुतः आस्थापूर्वक हाताळला आहे. मुंबईला परततांना प्रकाश-गाडींत—आरतीला आपल्या डब्यांत बोलावतो, पण ती जात नाहीं. इतर विद्यार्थ्यांबरोबर ती त्यांच्याच डब्यांत बसते. तिथे चाललेल्या गाण्याच्या धुमाकुळांत तिला सहभागी होतां येत नाहीं, कारण आपण दीपकला कायमचे सोडून दूर जात आहोंत ही भावना तिला अस्वस्थ करीत असते. मीनाकुमारीनें या दोन्ही प्रसंगात दिग्दर्शकाच्या सूचनाचें चीज केलें आहे.

सासरी ती साऱ्या खस्ता खाऊन कजाग जाऊचं मन वळविते व तिला आपलीशी करते. आरती सासरीं आल्यापासून तिच्याशी कचाकचा भांडणारी, तिला घालूनपाडून बोलणारी, तिच्या नवऱ्याच्या मनांत विष कालवून देणारी जाऊ, आरती निघून गेल्यावर गोगलगाय बनते. इतकेंच नव्हें, तर ती घरांत परत यावी यासाठीं तळमळते. आरतीची सौम्य आणि शांत व्यक्तिरेखा भावजयीच्या या स्वभावचित्रामुळें जास्त उठावदार वाटते. आपल्या लग्नाच्या पहिल्या वाढदिवशी प्रकाशबरोबर त्याला ऑपरेशनसाठीं मदत करायला जाण्याच्या प्रसंगानं आरतीच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा प्रेक्षकावर फारच उमटतो. आपल्या नवऱ्याचे प्राण वाचविण्याकरिता आपलं सर्वस्व द्यायला तयार झालेली आरती हा तिच्या व्यक्तिरेखेचा परमोच्च बिंदु आहे. त्यामुळें तिच्या व्यक्तिरेखेला पूर्णता येते.

## संगीत

चित्रपटांतील गाणी उत्तम असून समयसूचक आहेत, रोशन यांचें संगीत- दिग्दर्शन फारच चांगलें झालें आहे. "तेरे बिना साजन लागेना मोरा जीया" या गाण्याच्या ओळी प्रेक्षकांच्या मनात खोल रुजतात. पांडुरंगराव नाइकानीं छायालेखन बहारदार केलें आहे

# नागपूरचें ४४ वें नाटयसंमेलन — एक खुलासा

श्री. संपादक "माणूस" यांस,

स. न. आपल्या जून महिन्याच्या अंकात "नागपूरचे ४४ वें नाट्य समेलन–कांहीं विचार" हा आपल्या एका प्रतिनिधीनी लिहिलेला लेख वाचला व खेद वाटला. अपूर्ण माहिती असताना लेखकानें कांही विधाने केलीं आहेत. त्याबद्दल खुलासा व्हावा म्हणून लिहीत आहें.

या लेखाच्या सुरुवातीपासूनच एक हिणकस सूर आहे व तो प्रतिनिधीनी कायम ठेवण्याचा प्रयत्न कसोशीनें केला आहे. प्रत्येक ठिकाणी "नागपूरकर" असा शब्दप्रयोग वापरून त्याना काय साधावयाचे आहे तें त्यानाच ठाऊक, पण समेलन फक्त नागपूरकराचेंच नव्हतें ही गोष्ट त्यानी ध्यानांत घेतली नाहीं. उलटपक्षी, समेलन नागपूरला ठरल्यावर सर्व कारभार नागपूरहून एक हातीं चालावा एवढी दक्षताहि मुख्य कचेरीनें पाळली नाहीं, याचा शोध प्रतिनिधीनी घेतला असतां तर त्याना बऱ्याच गोष्टी कळू शकल्या असत्या.

अध्यक्षांच्या निवडीबद्दल थोडेंसें. अध्यक्षांचें नाव सुचविण्यासबधी नागपूरला ज्यावेळी बैठक झाली, त्यावेळी परिषदेचे एक पदाधिकारी श्री. गो. म. वाटवे हे स्वत: जातीने उपस्थित होते. त्यांच्या मुखावाटे श्री. चापेकर याच्या अध्यक्षत्वाबाबत चकार शब्दहि निघाला नाही. श्री. चापेकर यांचें नांव या वर्षासाठीं द्यावयाचें आहे ही गोष्ट श्री. वाटवे यांना ठाऊक नसावी असें वाटत नाही. म्हणूनच श्री. चापेकर यांचेसाठीं प्रचार करणारे श्री. भालचद्र पेंढारकर यानी, प्रचार–पत्राच्या आधी, श्री. चापेकर याच्या नावाची सूचना नागपूरकरांना दिली असती तर ती काय अव्हेरली गेली असती ? अध्यक्षपदासबंधीची पूर्वघटना नागपूरकराना अगोदर कळविली होती, हे प्रतिनिधीचें म्हणणें अर्थातच खोटें ठरतें. याबाबतीत पुण्याकडे घडलेल्या आणखीहि गंमती मला माहीत आहेत, परंतु त्या या ठिकाणी मी मांडूं इच्छित नाही.

तारखांच्या बाबतीतहि अनेक अडचणी आल्या, म्हणूनच त्या पुढें ढकलल्या गेल्या. नाट्य-समेलनासोबत झालेल्या नाट्य-महोत्सवाचीहि सोय पाहणे आवश्यक होते असें वाटतें.

तिसरा मुद्दा परिसवादाचा ! परिसवादाच्या बाबतीत नेमका कोणता परिसवाद ते या प्रतिनिधीनी स्पष्ट केलेच नाहीं. एक परिसंवाद चागलाच गाजला, परंतु परिसवाद बिघडवला तो बडचा लोकांनी. 'Dramatic in Education' या विषयावरच्या परिसंवादात प्रत्येकाने १० मिनिटें बोलावे हा नियम, नागपूरचे वक्ते सोडून इतरांनी कोणीहि पाळला नाही, नागपुरातून फक्त श्री. पराजपे बोलले व वेळ सपला. श्री. भगवान पंडितासारख्या लोकानी काहीहि न सांगता अर्धा तास खाल्ला. हाहि दोष नागपूरकरांचाच ?

ज्याच्या सौज्यन्यशील वागणुकीचा विसर पडेल असें चुकुनदेखील न वाटणाऱ्या प्रतिनिधीना आणखी कोणता परिचय आवश्यक वाटला ? परिचय व्हायला हवा, करून द्यायला नको.

आणखी एका मजेशीर गोष्टीचा उल्लेख करून आटोपतो, पुण्याचे एक नाटयप्रेमी लिहितात "मी येऊ शकणार नाही. पण माझे नांव कार्यक्रमपत्रिकेत छापण्यास हरकत नाही." प्रतिनिधींनी वरील गोष्टीचा आवश्य विचार करावा.

शाम सरवटे.

●●●

---

'आरती'—पान ४२ वरून

त्यांच्या कॅमेऱ्याचें कौशल्य जागोजाग विखुरले आहे. चित्रपटांत अनेक साधे-सुधे प्रसंग पाडुरगराव नाइकानी हळुवार हातांनी टिपले आहेत. त्यांची मोहिनी प्रेक्षकावर पडल्याशिवाय राहात नाही.

फणी मुजुमदार यानी दिग्दर्शन करताना अनेकदा जो सयम पाळला आहे, त्यामुळें त्याचें अभिनदन करावेसे वाटतें. हाच सयम त्यानी पोटकथानक जोडतांना न पाळल्यामुळें चित्रपट निष्कारण वाढला आहे.

आरतीची भूमिका मीनाकुमारीने उत्कृष्ट केली आहे. तिचे डोळे इतके बोलके आहेत की सारे प्रसग तिच्या डोळ्यातून टिपले जातात. सर्जन प्रकाशचं काम अशोककुमारन चागले केलें आहे, हें सागण्याचीहि गरज नाहीं, पण त्याच्या वयाला हें काम शोभत नाही हें माहिती असून त्याला तें काम देण्याचा मोह निर्मात्याला आवरतां आला नाहीं. प्रदीपकुमार हा दीपकच्या कामाला शोभत नाही. त्याचा चेहरा mobile नसल्यामुळें लाकडी ठोकळ्यासारखा तो साऱ्या चित्रपटात वावरत असतो.

शशिकला, गजानन जहागिरदार, रमेश देव यांची कामें चागलीं झालीं आहेत. त्याच्या भूमिकेमुळें चित्रपटाला उठाव येतो.

हिंदी चित्रपटाचा ठराविक साचा न वापरता थोडासा निराळा प्रयत्न केल्याचा प्रत्यय जागोजाग दिसून येतो. चित्रपटाचें सामर्थ्य प्रभावी व्यक्तिरेखामध्यें असून विशिष्ट ध्येयाने उद्युक्त झालेल्या पात्रांचा सघर्ष त्यात दाखविला आहे. मूळ कथा प्रफुल्ल देसाई याच्या "सस्कार लक्ष्मी" या गुजराथी नाटकावरून घेतली आहे. दिग्दर्शकाने पाळलेला संयम, छाया लेखनाचें कौशल्य, आरतीची ठसठशीत आणि उठावदार व्यक्तिरेखा, समयोचित गाणी, उत्कृष्ट सगीत–दिग्दर्शन सुटसुटीत सरळ कथा–सवाद यामुळें इतर अनेक हिंदी चित्रपटापेक्षां "आरती" हा चित्रपट निराळा वाटतो आणि या निराळेपणातच या चित्रपटाचें यश सामावले आहे.

●●●

# ‘तुझें आहे तुझपाशीं’

## अखिल भारतीय यशाकडे वाटचाल !

आजच्या काळांतील उत्कृष्ट विनोदी नाटक कोणतें? असा प्रश्न कोणी केला तर पु. ल. देशपांडे यांच्या ‘तुझें आहे तुझपाशीं’चेच नांव घ्यावें लागेल. वाङमयीनदृष्टचा जसें हें नाटक उच्च दर्जाचें आहे तसेच प्रायोगिकदृष्टयाहि एक हमखास यशस्वी ठरणारें नाटक आहे. कोणत्याहि संमेलनप्रसंगी विनोदी नाटक करण्याची कल्पना निघताच ‘तुझें आहे तुझपाशी’ची निश्चिति होते. नाटकातील भिकू माळ्यापासून काकाजीपर्यंतची कामें करणारी सारीच पात्रें खूष असतात. जणु आपणच ‘हिरो’ आहोंत असाच साऱ्याचा समज होतो. नाटकाचें हें एक वैशिष्टयच म्हटलें पाहिजे. याचबरोबर नाटकाची भाषाशैलीहि मोठी खुमासदार आहे. पात्रानें योग्य अभिनय केला तर प्रश्नच नाही, पण त्यानें नुसती भाषणें म्हटलीं तरी लोक आनदित होतात. वाक्यावाक्याची ‘दाद’ घेतात.

इतर भाषिकानाहि या नाटकाने आकर्षून घेण्यास सुरुवात केली आहे. हिंदी, गुजराथी अशा भाषांतून त्याची रूपांतरें होऊं लागली आहेत आणि त्यामुळें अन्य भाषिकहि त्यांतील विनोदी वाक्यरचनेमुळें, प्रसगांमुळें, आकर्षक व्यक्तिरेखामुळें प्रसन्न होऊ लागले आहेत.

हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध पटकथालेखक एस्. एम्. अब्बास यांनी या नाटकाचें असेच एक भाषांतर केलें असून राजा नेने यानी ‘दीपक तले अधेरा यानें कस्तुरीमृग’ या त्याच्या हिंदी रूपातराचा २२ एप्रिल ६२ रोजीं नुकताच प्रयोग सादर केला. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे मराठी प्रेक्षकांप्रमाणे हिंदी प्रेक्षकहि नाटकाच्या कथानकाच्या रंगतीत धुद होऊन गेले. पु. ल. देशपाडे यांचें लेखन तर त्याला कारणीभूत आहेच, परनु नाटकावर जो हिंदी पेहराव चढविण्यात आला आहे त्याचेंहि वैशिष्टच आहे. श्री. अब्बास यांनी केवळ शब्दश: भाषांतर करण्याकडे कल ठेवला नसून मूळ कथानकावर अस्सल हिंदी किंवा उर्दू पेहराव चढविला आहे; आणि तो इतका चपखल बसला आहे की, हें एखाद्या नाटकाचें रूपांतर आहे असें हिंदी किंवा उर्दू भाषिकाला सागूनहि खरें वाटणार नाही. नाटकांतील बारीकसारीक गोष्टीहि उत्तर हिंदुस्थानी लोकास परिचित वाटाव्या अशाच घालण्याचा त्यानी कटाक्ष ठेवला आहे आणि त्यामुळें नाटकात एक वेगळाच डौल आला आहे. वास्तविक भाषांतर करताना शब्दाला प्रतिशब्द ठेवण्याकडे भाषांतरकाराचा ओढा असतो, परंतु अब्बास यानी हा मोह मोठ्या सयमाने टाळला आहे.

पु. ल. देशपांडे यांच्या मराठी नाटकातील तिसऱ्या अंकांत आचार्यांच्या तत्त्वज्ञानाचा अवलंब करीत असलेल्या श्यामचा आणि काकाजीचा संवाद चालू आहे. शाम काकाजीना आपण आचार्यांना गीतेचा अध्याय पाठ करण्याचें वचन दिल्याचें सांगत आहे. काकाजी म्हणतात, “अरे हें वय काय आचार्यांना वचन द्यायच आहे? –तुझ्याएवढा होतो तेव्हां दहा पोरीना वचन गेलीं होतीं माझी”– “छे–छे! काय भयकर बोलता काकाजी”– श्याम उद्‌गरतो. काकाजी म्हणतात, “हें भयंकर नाही, पण तुझें हें जें चाललंय नां तें भयकर आहे. कुणीं सागितल तुला हें जीवनाचं सुतकी तत्त्वज्ञान?” इ०

### अस्सल हिंदी वातावरण

श्री. अब्बास यांनी केलेलं याचं भाषातर पाहा–

*काकाजी*–अरे श्याम–तुम्हारी ये उम्र क्या आचार्यको वचन देनेकी है? मेरे बेटे, मैं तुम्हारी उमरमें दस लडकियोंको वचन दे चुका!”

शाम–छी, छी, छी, आपभी कमाल करते है काकाजी.

काकाजी–कमाल, मै नही हूँ! तुम्हारी ये कमाल है। किस गधेने सिखाई तुम्हे ये मोहरमी फिलासफी। गीता जैसी खुबसूरत जवान लडकी मेहमान बनकर यहाँ आई है। गीताकी हुस्नसे ये घर जगमगा रहा है–लेकीन तुम सावनके अधे बने बैठे हो–अरे तुम्हारी जगह मै होता तो चाँद सितारे समेटकर उसकी झोलीमें भर देता–काश्मीरकी जादू भरी वादीमें जाकर उसकी आँखोकी गहराईमें डूब जाता और कहता–झेलम नदीकी ये बलखाती हुई कमर तुम्हारी नजाकतके सामने कुचभी नही है और फिर जब वो शरमाकर नशीली आँखोंसे देखती तो सारे जहाँकी शायरी उसके कदमोंपर निछावर कर देता, क्या बात है प्यारे!

हें अस्सल हिंदी वातावरण आहे. मराठी नाटकातील सुतकी तत्त्वज्ञान या शब्दाला येथें लेखक मोहरमी फिलासफी म्हणतो. दोन शब्दाला तितकेच शब्द! आणि मूळच्या अर्थाची तीच प्रतीति!! काकाजींच्या भाषणातून क्षिप्रा नदी, पातळपाणी आदी गोष्टी आहेत. हिंदी भाषांतरात क्षिप्रे ऐवजी झेलम आहे, काश्मीरकी वादी (दरी) आहे. वातावरणात किती खुबीने बदल केला आहे?

पहिल्या अंकांत डॉ. सतीश आणि उषा याचे सवाद आहेत. डॉ. सतीश टेलिफोनवर गतस्मृतींची आळवणी करीत आहे. पूर्वी कधीतरी उषाला ऐकविलेल्या अनीलाच्या “केळीचे सुकले बाग असूनिया

पाणी " या ओळी मैकवीत आहे. हिंदी करणांत तोच अर्थ प्रकट करणारा एक उर्दु शेर समाविष्ट केला आहे. पाहा–

सतीश–उषा ! पायलमें गुलज़ार की नई गजल पढी ?–नही ! हाय–दिलमें तीर बनकर चुभ गयी है-पढ़ना जरूर–क्या फोनपरही सुनाऊ अच्छा तो सुनो।

" दीखाके मेहंदी हतेली छुपा गया कोई
तमाम उम्रके शिकवे मिटा गया कोई
प्यासे होटोंसे टकराके रहगया सागर
मिलाके आँख निगाहे चुरा गया कोई. "

पहिल्या अंकांत काकाजी जंगलाचें वर्णन करीत असलेल्या भाषणांतूनहि असाच प्रत्यय येतो. जगल म्हणजे माणसाच मन विशाल करण्याची केवढी मोठी शाळा आहे म्हणून ते सांगत आहेत. अब्बास यानी केलेलें सुडौल भाषांतर पहा–

" तो कहनेका मतलब ये था डॉक्टर की जंगलकी जिंदगी–जंगलकी जिंदगी–वाह क्या बात है ? ऊपर गगन विशाल और चारों ओर सुहागन धरती फलफूल हरियालीसे लदी हुई. कॅम्प कॉटपर बैठकर मैं हुक्केके कश्त लगाकर पहरो सोचता रहता–ये दुनियाभी कैसा एक अजीबो गरीब तमाशा है ! ओ हो हो हो–जंगलकी पूनम कभी देखी है डॉक्टरसाहब ? उसकी जादूभरी खामोशीसे दिलकी धडकन खुदबखुद तेज हो जाती है. चादनीमें नहाये हुये पेड किसी अप्सरोंके समान नृत्य की मुद्रामें खडे हुअे महसूस होते "–लगता है बस, थाप पडेगी और ये नाचना शुरु करेंगे ! डॉक्टर भैय्या शेर ! शेर ! तो यों यों सामनसे जाता था–ओह क्या मस्ती–क्या रौब ! जी चहाता है सामने जाकर उस जंगलके बादशहाके सामने सात बार कुर्निसात बजलाऊ–शेरकी शाहना चाल देखकर लगता है, आदमी चले तो बस ऐसिही चाल चले ! "

बारीक सारीक गोष्टींतूनहि असाच प्रत्यय येतो. काकाजी सतीशला हुक्का घेणार कां म्हणून विचारतात आणि तोहि कबूल करतो. येथें सतीश म्हणतो " सबकुछ चलेगा–गायका दूध–असली घी–हुक्केकी गुडगुडाहटभी मुझे कुछ बुरी नही लगती " " हुक्केकी गुडगुडाहट " हें अस्सल उर्दु रूपातर.

याचबरोबर पात्रांच्या बाबतींतहि लेखकाने कटाक्ष ठेवला आहे. वासुआण्णाच्याऐवजी भोलेनाथ उभा केला आहे. तर जगन्नाथ ड्रायव्हर ऐवजी रहिमतखाँ पठाण आणला आहे. दुसऱ्या अकातील ' अतिविशाल ' महिलांच्या प्रवेशांतहि खरेंखुरें कॉस्मॉपॉलिटन वातावरण उभें केलें आहे. पळसुले–नाडकर्णी आणि काळे यांच्याऐवजी मिसेस फकीरचंद, मिसेस अय्यंगार, आणि मिसेस किर्लोस्कर अशा तीन भिन्न धर्मीय महिला आणल्या आहेत.

एकदरीत या नव्या हिंदी रूपातरानें हिंदी लोकानाहि वेड लागावें यात नवल नाही ?

राजा नेनें यांनी मराठी नाटकांतील काकाजी लोकप्रिय केलाच आहे. हिंदी नाटकातहि त्यानी काकाजीचेंच काम केलें. नेने यांचें उर्दू भाषेवरील प्रभुत्व सर्वश्रुत आहेच. मराठी इतकेच उर्दु उच्चार, शब्दांची फेक अस्खलित आणि सफाईदार होती. शब्दाशब्दात वजन होतें. वाक्यावाक्याला कस होता. जणू कांही एखादा नवाबच चालावा, बोलावा, वागावा असेच ते वाटत होते. तसाच त्याचा शोक होता. त्यांच्याप्रमाणें अन्य कलाकारहि मनापासून कामें करीत होते. स्वत: लेखकांनी भोलेनाथ ऊर्फ भिकू माळ्याचें काम केलें होतें. गीताचें मनोवेधक काम राजा नेने याच्याच कन्या सुधा नेने यांनीं वठविलें. याखेरीज नटू लोंढे, अप्पा पडवळ, पांडुरग बेणारे, पंढरीनाथ वैद्य, वसुंधरा पौडवाल, सिननट सुधीर, कुसुम देशपाडे आदी कलाकारांनी कामें केलीं होतीं.


## शुभा खोटे यांचा ' विक्रम '

उषाचे कामासाठीं उषाकिरण याची खास निवड केली होती. परंतु पहिल्या प्रयोगाच्या दिवशींच त्यांची तब्येत अचानक बिघडली आणि आपण काम करूं शकत नाहीं असे त्यानी मोठ्या नाईलाजानें त्या दिवशीं सकाळी नेने यांना कळविले. राजा नेनें हवालदिल झाले. अवघ्या ५।६ तासांत भूमिका पाठ करून उभी कोण करूं शकेल ? इतक्यांत त्याना कोणी ' शुभा खोटें ' यांचें नाव सुचविले. त्यांना तरी काम जमेल किंवा नाहीं ही शकाच होती, परतु दुसरा काहीच मार्ग न दिसल्याने ते शुभा खोटें याना भेटले, त्याना सारी परिस्थिति समजावून दिली. शुभा खोटें यानीही त्याना संमति दिली आणि पाठांतरासाठीं वही मागितली. रात्री खरोखरच आपली नक्कल चोख पाठ करून त्या नाटकासाठी उभ्या राहिल्या. प्रयोग खूपच रंगला. अर्थात त्याचें श्रेय इतर सर्वांना जरी असले तरी शुभा खोटें यांचाहि वाटा लहानसहान नव्हता. ज्यानी मराठी नाटकसुद्धा कधी पाहिलें नव्हतें त्यानी अवघ्या काही तासांत भूमिका समजावून घेऊन, भूमिका सादर करणें ही गोष्टीं सामान्य नव्हे.

साऱ्या भारतभर या हिंदी रूपातराचे प्रयोग करून नाटकाला अखिल भारतांत लोकमान्य करण्याचा राजा नेनें याचा निश्चय आहे.

या हिंदी रूपांतराप्रमाणेच ' रेत की दीवार ' या नावाचे त्याचें असेंच एक हिंदी रूपांतर श्री. वासीरवान यानी केले आहे. एका मुस्लिम संस्थेतर्फे त्याचे प्रयोग सादर केले गेले. याखेरीज ' मीन पियासी' नावाचे दुसरें एक गुजराथी रूपांतर झालें असून आय. एन्. टी.सारख्या मातब्बर सस्थेनें त्याचे प्रयोग केलेले आहेत.

सुधीर दामले



आतां तरी छत्री हरवणार नाहीं !

शरद् अभ्यंकर

# कै. दत्तोपंत हल्याळकर



कै. देवल यांचें "शापसंभ्रम" हें एक अत्यंत गाजलेलें संगीत नाटक ! बाणभट्टाच्या कादंबरीवर सदर कथानक आधारलें असून उत्कृष्ट भाषाशैलीप्रमाणे मधुर आणि अर्थवाही पदांचें आगळें वैशिष्टयहि त्यामध्यें आहे. या नाटकाचे प्रयोग किर्लोस्कर मंडळी दृष्ट लागण्याइतके सुंदर करीत असे. विशेषत: त्यांतील पुंडरिकाची भूमिका तर अत्यंत लोकप्रिय झाली होती. भाऊराव कोल्हटकरांसारखे अद्वितीय नट आपल्या उत्कृष्ट अभिनयाने आणि गाण्याने तर लोकांना जिंकून घेत.

१८९८ सालीं या नाटकाचा प्रयोग करण्याचा हक्क केवळ किर्लोस्कर कंपनीलाच असे. परंतु मिरजेला एकदा करवीर निवासिनी मंडळीने कसलीही परवानगी न घेतां प्रयोग जाहीर केला. किर्लोस्करचे चालक भाऊराव भयंकर संतापले. त्यांच्या हक्कावर जणू फार मोठें अतिक्रमणच झालें होतें. आणि म्हणूनच करवीर मंडळीच्या लोकांना चांगला धडा शिकविण्यासाठीं भाऊराव कोल्हटकर बंदी हुकूम घेऊन जातीने थिएटरमध्यें दाखल झाले. रागाने लालबुंद झालेल्या भाऊरावांनी स्टेजवर पाहिलें तों नक्षीदार फीत जोडलेली कफनी चढवून, हातांत कमंडलू आणि मण्यांची माळ धारण करून "नंदनवन देवीनें माझा आदर बहु करूनी" हें पद गात पुंडरीक प्रवेश करीता होता. लोकांनी कडाडून टाळी दिली. तें तेजस्वी रूप, ती ढंगदार चढया सुराची आणि आकर्षक गायकी पाहून भाऊरावही हरखून गेले. आपण या नाटकावर बंदी हुकूम घेऊन आलों आहोंत ही गोष्ट ते साफ विसरले आणि तिसरा अंक संपेपर्यंत त्यांनीं प्रेक्षागृह सोडलें नाहीं. तिसऱ्या अंकांत पुंडरिकानें प्राण सोडतांच पडदा पडला आणि मग भाऊराव भानावर आले. आपण नाटकाला बंदी करावयास आलों आहोंत हें तेव्हा त्यांच्या ध्यानांत आलें.

आणि मग मात्र ते लगबगीने रंगपटांत गेले. त्या असामान्य नटाला त्यांनी कडकडून मिठीच मारली. त्याची पाठ थोपटून भाऊराव त्याला म्हणाले, "शाबास आहे तुमची ! तुमची पुंडरिकाची भूमिका माझ्याहून सरस होते ! " आणि मग तो बंदी हुकूम हळूच काढून त्यांनी त्या नटाला दाखविला. हास्याच्या खदखदाटाने सारा रंगपट दणाणून गेला. अर्थातच त्या बंदी हुकुमाची अंमलबजावणी दूरच राहिली पुंडरिकाचें काम करणाऱ्या त्या नटानें तो निष्प्रभच करून टाकला होता त्या नटाचें नांव होतें—दत्तोपंत हल्याळकर ! करवीर निवासिनी मंडळाचे चालक ! ! मराठी रंगभूमीवरील सर्वोत्कृष्ट नटांपैकी एक ! ! !

देखणें आणि आकर्षक रूप, सुरेल आणि पहाडी आवाज आणि यथातथ्य अभिनय या द्वारें दत्तोपंतांनी मराठी रंगभूमीवरील श्रेष्ठ नटांत आपलें नांव कायम केलें होतें. आणि म्हणूनच त्यांच्या संगीतावर रूपावर, अभिनयावर भाऊराव बेहद्द खूष झाले. संतापले होते तरी सारा राग विसरून त्यांचे मित्र बनले, आणि ही मैत्री अगदी अखेरपर्यंत टिकली. भाऊराव आपल्या अखेरच्या आजारपणांत आपली तब्येत बरी नसतांहि दत्तोपंतांचीं नाटकें पाहाण्यास जात असत. दत्तोपंतांच्या भूमिकांचें याहूनहि उत्कृष्ट असें मोजमाप दुसरें कोणतें असणार·आपल्या पश्चात दत्तोपंतच एकटे रंगभूमीचें नांव राखतील अशी भाऊरावांना उमेद होती, विश्वास होता, आणि म्हणूनच त्यांनी एकदा दत्तोपंतांना किर्लोस्कर मंडळींत येतां का म्हणून विचारलें होतें, परंतु कोणत्याहि कंपनींत नोकरी म्हणून करायची नाहीं अशी दत्तोपंतांची प्रतिज्ञा होती, परंतु भाऊरावांच्या शब्दाचा मान ठेवायचा म्हणून "एक आण्याची भागी दिलीततर मोठ्या आनंदाने येईन" असें त्यांनी स्पष्ट सांगितले. भाऊरावही त्या गोष्टीला कबूल होते. परंतु किर्लोस्करमधील इतर मंडळींनी विरोध केला. नाहीपेक्षा किर्लोस्करचे एक चालक म्हणूनच दत्तोपंतांचें नांव गाजलें असतें.

## गाजलेल्या भूमिका

कारवारमधील हल्याळ या गांवीं २८ जानेवारी १८७५ रोजीं त्यांचा जन्म झाला. मूळचें आडनांव देशपांडे. परंतु हल्याळ तालुक्यांतील एकतृतीयांश जमीन देशपांडे घराण्याकडे होती, म्हणूनच देशपांडेऐवजीं हल्याळकर या नांवानेच ते प्रसिद्धीस आले. त्यांचा दणदणीत पण मधुर आवाज हेंच त्यांचें आगळें वैशिष्टय होतें. त्याचमुळें अर्जुन, कोदंड, दुष्यंत, पुंडरिक, चारुदत्त, या पुरुष भूमिका आणि रामराज्यवियोगमधील मथरा या त्यांच्या भूमिका विशेषत्वानें गाजल्या ! त्या भूमिकांचें लोकांना इतकें वेड होतें कीं, एखाद्या प्रयोगांत ते नसले तर लोक प्रयोग होऊं देत नसत; मग दत्तोपंतांना वाटेल तें करून यावेंच लागे. तेव्हा कुठें प्रयोग चालू होई.

एकदा मुंबईच्या मुक्कामांत बॉम्बे थिएटरमध्यें "शापसंभ्रमचा" प्रयोग होता. दत्तोपंत परगांवाहून येणार होते, परंतु कांही कारणानें ते वेळेवर येऊं शकले नाहींत, म्हणून त्यांच्याऐवजी पेठे नांवाचे एक दुय्यम नट पुंडरिकाच्या भूमिकेसाठीं उभें राहिले, परंतु प्रेक्षक एक शब्ददेखील ऐकून घेईनात. प्रयोग बंद करा, "पैसे परत द्या" अशा आरोळ्या ऐकू येऊं लागल्या. तेव्हा दत्तोपंत बारा वाजतां कदाचित् येतील असें सांगण्यात आलें. त्यावर "आम्ही तोंपर्यंत थांबतो" असा पुकारा लोकांनी केला. साहजिकच बारा वाजेपर्यंत वाट पाहाणे प्राप्तच झालें. आणि खरोखरच बाराच्या गाडीनें दत्तोपंत येऊन हजर झाले. लोकांनी हर्षानें टाळ्या आणि आरडाओरडा सुरू केला. साहजिकच लोकांच्या आग्रहाखातर दत्तोपंत स्टेजवर आलेच !

असेच प्रसंग दत्तोपंतांवर अनेक वेळां आले होते. अंगांत १०४ डिग्री ताप असूनहि अर्जुनाच्या भूमिकेत उभें राहावें लागलें होतें. दत्तोपंतांवर प्रेक्षकांचें प्रेम हें असें होतें.

●●●

# राजधानीचें हवामान

आमच्या प्रतिनिधीकडून

हवामानाबद्दलची ओरड करतात तर सर्वजण पण त्याबद्दल कोणीच काही करीत नाही. अशी विनोदी तक्रार मार्क ट्वेन ह्या अमेरिकन लेखकाने केली आहे. दिल्लीच्या उन्हाळ्याबद्दल तर हा प्रत्यय वारंवार येतो. " काय उकाडा हो, काय उष्मा आहे हो...यदा जरा जास्तच दिसतोय " असे जो तो बोलताना दिसतो. तपमान ११२–११४ फॅरेनहाइट अशापर्यंत बरेच दिवस असतें. उन्हाळ्यांत दिल्लीतून बरेच लोक पळ काढतात. पण ते उन्हाळ्याच्या तापाला घाबरून नव्हे बर का ? कारण दिल्लीचा उन्हाळा कोरडा असल्याने तो सर्वांना मानवतो, परंतु श्रीमंत किंवा सुखवस्तु हौशी लोक मात्र उन्हाळ्याच्या निमित्तानें सुट्ट्या घेऊन निरनिराळ्या हिल्स्टेशन्स्वर जातात.

येथून दोन–अडीचशे मैलावरच हिमालय सुरू होत असल्याने दिल्लीपासून जवळच अक्षरशः शेकडो हिल्स्टेशन्स् उपलब्ध आहेत. नैनिताल, सिमला, मसुरी, मनाली, डलहौसी, धर्मशाला, ह्रषिकेश, श्रीनगर ही झाली प्रसिध्द नावे. पण अप्रसिध्द अशीहि अनेक आहेत. हिल्स्टेशन्स्वर गेल्यावरसुध्दा ज्याना दिल्लीइतकाच गजबजाट, गोगाट, नाटकें, सिनेमा, सभा, समेल्लने, गर्दी, वदळ हीं हवीं असतात ते श्रीनगर, सिमला, मसुरी, नैनिताल अशा गांवीं जातात, परतु ज्यांना आधुनिक जगाच्या घिसाडघाईंतून यांत्रिक युगापूर्वीचें शांत, सरळ, निर्विकल्प जीवन हवे असते ते धर्मशाला वगैरे ठिकाणी जातात.

वरील हौशी लोकाव्यतिरिक्त उन्हाळ्यांत मोठ्या प्रमाणात जे दिल्लीतून बाहेर पडतात ते म्हणजे आपण ज्याना सरसकट ' मद्रासी ' किंवा ' साउथ इडियन ' म्हणून ओळखतो ते लोक. त्यांच्या मुलाना मे–१५ च्या सुमारास सुट्ट्या सुरू झाल्या की, ह्या लोकाची स्टेशनाकडे रीघ लागते. ग्रॅंड ट्रक एक्स्प्रेस, जनता वगैरे गाड्या खच्चून भरून जाऊ लागतात. अशा एकाद्या गाडीचे वेळेस स्टेशनावर गेलें तर आपण मद्रासमध्यें तर नाहीना अशी वारंवार शंका येते.

## नको हें मद्रासला जाणें

नेहमीच्या गाड्या अपुऱ्या पडून स्पेशल गाड्या सोडव्या लागतात. त्यातही जागा मिळण्याची मारामार पडते म्हणून बरेचजण रिझर्वेशन करण्यासाठी म्हणून आदले रात्रीच लुगी नेसून काखेंत पथारी घेऊन स्टेशनावर येऊन प्लॅटफॉर्मवर झोपतात. पहाटे तिकिटाच्या खिडकीवर लवकरांत लवकर रांग लावून उभें राहण्याची प्रत्येकाची धडपड सुरू होते. मग ताटकळून एका रागेंतून, दुसऱ्या रांगेंत, एका खिडकीसमोरून दुसऱ्या खिडकीपुढें अशी धिंड निघून अनेक तासानंतर तिकिटें मुठीत घट्ट दाबून धसमुसळेपणाने हिसकाहिसकी करून 'अय्यय्यो' करीत तो जेव्हा बाहेर पडतो तेव्हा त्याला कृतकृत्य झाल्यासारखें वाटतें. मनात म्हणतो ' नको हे मद्रासला जाणें ' तरी हें वरपागीच बरं का ?

तिकिटें काढताना द्रविडाना कराव्या लागणाऱ्या ह्या द्राविडी प्राणायामाविषयी येथील आंग्ल वर्तमानपत्रांच्या संपादकीय पत्रव्यवहारांत बरीच (लेखी) आरडाओरड झाली. त्यातल्या त्यांत भाग्याची गोष्ट ही की, अशा गवगव्याचा अधिकाऱ्यावर लगेच परिणाम होतो व थोडी का होईना सुधारणा होते. त्याप्रमाणे रिझर्वेशन व तिकिटें काढतांना ज्या रांगा दोन-तीन वेळां बदलाव्या लागत ते आता एकाच रुंद खिडकीशी उभें राहून दोन्ही साध्य करण्याची व्यवस्था झालीय्. एकूण राजधानी आहे म्हणून म्हणा किंवा अन्य काहीं कारणामुळे पण त्रस्त जनतेची गाऱ्हाणीं वेशीवर टागायला येथील इग्रजी दैनिकाची फार मदत होते. पण वर्तमानपत्रात पत्र प्रसिद्ध होण्यास ते सफाईदार, खुसखुशीत भाषेंत लिहिले तर स्थान मिळतें. हेंगाड्या भाषेंत लिहिलें तर भाषादुरुस्ती करण्याच्या भानगडीत ते पडत नाहीत, सरळ केराच्या टोपलीत फेकतात.

* * *

येथें उन्हाळ्यांत अनेक लोक रस्तोरस्ती गल्लो-गल्ली पाणपोया उघडून वाटसरूंना थडगार पाणी देण्याची सोय करतात. कोणी ह्यासबंधीं नवस करून तो फेडतात अन्य काही ह्यास नित्यनैमित्तिक धर्मकार्य समजतात.

आंब्यासह दिल्लीस सर्व जिन्नस शेरावर मिळतात. स्थानिक लोक आंब्याचा रस कधींच काढत नाहीं. बहुधा कापून व क्वचित चोखून खातात. प्रथम सफेदा नांवाचा जाडजूड आंबा बाजारात येतो. नतर सरोली, मग दशेरी व मग चोसा. येथें दशेरी आंब्याना हापूसचा मान आहे, परतु पाऊस पडून गेल्यावर चोस जातीच्या मोठ्या पिवळ्या आंब्यांची गोडी कांहीं औरच असते.

उन्हाळ्यात फळांच्या दुकानात रगीबेरंगी फळांच्या टोपल्या पाहून मन तृप्त होतें. नानाप्रकारचे व रगांचे आंबे तावडीं लाल (कापलेलीं) कलिंगडें, पाच–दहा प्रकारचे गुलाबजामसारखें रसरशीत व विविधरगी आलुबुखार, आडु, ओले जरदाळू, मोसबी, लालभडक चेरी, लिची, लुकाट अशी फळांची लयलूट असते.

उन्हाळ्याचीं येथें काही विशिष्ट पेयेंहि आहेत. जिरें-मिरे घातलेलें तिखट, पण पाचक पाणी विकणारे त्यासबधीचीं पद्यें गात गात विक्री करतांना दिसतात. बाटल्यातील अन्य मधुर पेयांबरोबर सार वा मीठ घातलेल्या लस्सीचे (ताक) पेलेच्या पेले दिवसभर पीत पीत लोक येथील प्रखर उष्म्याचा प्रतिकार करतात.

* * *

तुकतेच येथे तीन संप आणि एक निदर्शन झालें. निदर्शन प्रजा-समाजवादी पक्षाने केलें. कशासाठी तर म्हणे गांधींचा खून झाला तो बिर्लाचा राहता बंगला राष्ट्रीय स्मारक व्हावा. म्हणून जेथें खून झाला ते आवार बंगल्याचे मागले बाजूस अजून मोकळेंच असून तेथें लहानसा ओटा केलेला असून फुलेंहि वाहिलीं जातात. गांधींचें दुसरें भले-मोठें स्मारक राजघाटावर जेथें दहनविधि झाला तेथें आहेच. तरी राजकारण म्हटलें कीं, आपल्या पक्षाचें अस्तित्व लोकांच्या डोळ्यांत भरवायला काहीं निमित्त नको का ?

### फालतु द्रव्याची शिवाशिव

तीन संपांपैकी एक होता हॉटेलातील नोकरवर्गाचा. तो होता पगारवाढीसाठी. मुख्य रोख होता तो पाश्चात्त्य पद्धतीच्या ऐटबाज हॉटेलावर. येथें एअरकंडिशन्ड गारीगार वातावरणांत, बंद दारा-पडद्यांच्या आड, दिव्यांच्या कृत्रिम प्रकाशात गुलगुल गोष्टी करणारीं युगुलें, हसणारे-खिदळणारे तरुणतरुणीचे कंपू, गुलहौशी प्रौढ व्यक्ति व अस्पष्ट उसासे टाकीत तासन्तास पेयाचा इवला इवलासा घोट घेत रमणा–गमणारे एकटे दुकटे यांची उठ-बस सतत चालू असते. भिंतीजवळच्या रंगमंचावर पाश्चात्त्य पद्धतीच्या बॅंडवर धूमधडाकी नृत्यसंगीत चालू असते. एकादी तरुणी किंवा भसाड्या आवाजाचा पुरुष कबरेची नाजुक हालचाल करीत पद्यांच्या चालीवर काही गद्य म्हणत असलेले दिसतात. येथें येणाऱ्या व्यक्तींच्या बँकेच्या गंगाजळीत बहुधा अखंड द्रव्यगंगेची एक तरी धारा स्त्रवत असल्याने ते येथें स्वर्गसुखाचा अनुभव घेत असतात.

**कामगारांत वेटर्सचाच भरणा जास्त असतो. त्यांना वर बिलावर बक्षिशी ( Tips ) ही भरपूर मिळते. एखाद्या फर्स्टक्लास गॅझेटेड अधिकाऱ्याला लाजवील एवढी टिप्स्‌ची त्यास प्राप्ती होते: तरीसुद्धा संपांत हे सर्व महाशय सामील होतेच.**

कामगारांनी संप केल्यावर पोलीस बंदोबस्तांत हॉटेल मालकांनी द्वारसुंदरी ( receptionist ), टेलिफोन ऑपरेटर, कॅशिअर इत्यादींना स्वैपाकाच्या व वाढायच्या कामाला लावून हॉटेलें कशींबशीं चालू ठेवली, तेव्हा कॅशिअरला वाढण्याचें काम करतांना असा अनुभव आला की, दिवसाकाठी त्याला ग्राहकांकडून निव्वळ २०–२५ रुपये टिप्सची प्राप्ती होऊं लागली, तेव्हां कॅशिअरचें काम सोडून वाढण्याचेंच काम का न करा याचा तो मनांत खल करूं लागला.

दहा-बारा दिवसांत संप थोड्या तडजोडीने मिटला, पण त्यात हें दिसून आलें की, हॉटेल चालक मालकहि गब्बर, त्यातील नोकरवर्गहि ( विशेषतः वेटर्स ) भरपूर पैसा मिळवतो व त्याची तैनात घेणारे गिऱ्हाइकहि मातब्बर असते. बॅंडप्रमुखाला पांच-सहाशे रुपये मिळतात व प्रमुख आचाऱ्यालाहि पांचशे ते आठशे रुपये वेतन असतें. तेव्हां ह्या तिघांच्या खिशातील फालतु द्रव्याची ही शिवाशिवीच म्हणावी लागेल.

त्यांचा संप सुरू झाल्यावर घरें बांधणारे कारागीर मजुर वगैरेंनी संप पुकारून प्रत्येकाची दर दिवशींची मजूरी आठ आणे, रुपाया वाढवावी असा हेका धरला. त्यांच्या मागण्या बहुधा जशाच्या तशा कंत्राटदारास मान्य कराव्या लागून आठ दिवसांनी त्यांचा संप मिटला.

येथील म्युनिसिपालिटीच्या दवाखान्यांतून झाडालोटीची कनिष्ठ कामें करणाऱ्या नोकरवर्गानें एक दिवस संप केला तो विशेषतः वागणूक चांगली मिळावी अशा हेतूने.

* * *

### कृष्णम्माचारी कां ?

केंद्रीय मंत्रिमंडळांत अंतर्भाव व्हावा म्हणून कॉंग्रेस निर्वाचित पार्लमेंट सभासदाच्या जिवाचा कोण आटापिटा चालू होता ! पण आपण तर अंतर्भूत केले जाणारच अशा खात्रीने टी. टी. कृष्णम्मा-चारी स्वस्थ होते. त्यांच्या नांवाचा टिळा मंत्रिमंडळास लागलाच पाहिजे एवढी काय भुरळ त्यांनी नेहरूंना घातली यासंबंधी तपास करतां दोन कारणें कळली. एकातर नेहरूंचा कृष्णम्माचारींच्या कर्तृत्वावर भलताच विश्वास आहे. शिवाय, नेहरूं, " सोशॅलिझम... सोशॅलिझम " हे कॉंग्रेसचें ध्येय असल्याचें आवर्जून सांगत असतां " त्या मतप्रणालीचा खमका मंत्री तर कोणीच नेमला नाहीं; मग तें ध्येय साधावें कसे ? " हा प्रश्न काहीं कॉंग्रेस चळवळे उपस्थित करतात. त्याचें तोंडावर आता कृष्णम्माचारींचें नांव फेकतां यईल एवढेंच. **तसें पाहतां अन्य भांडवलशाही मंत्री व कृष्णम्माचारी यांच्या श्रीमंतींत कृष्णम्माचारीच भारी ठरायचे एकादे वेळेस.**

नेहरूंची कार्यक्षमता दिवसेंदिवस कमी होत असल्याचें स्पष्ट दिसत असल्याने मंत्रिमंडळांतील दुय्यम नेतृत्वाच्या चुरशीला येथें बरीच धार चढली आहे, परंतु नेहरूंच्या पश्चात् दुय्यम नेतृत्वाला जनता काय दाद देणार अशीही भीति कॉंग्रेसश्रेष्ठींत पसरली असल्याचें त्यांच्या सभाषणांत स्पष्ट दिसतें.

● ● ●

# नाना फडणविसांच्या कथा

: २ :

एकदां जेवण चालू असतांना नाना फडणविसाकडे त्याच्या पंक्तीला अस-लेल्या इंग्रज पाहुण्याचें लक्ष वाढप करणाऱ्या बायकांच्या कपाळावरील कुंकवाकडे गेलें.

त्याने विचारलें— " हा लाल ठिपका कां लावतात ? " नानानें सांगितलें,

" ते सौभाग्यचिन्ह आहे. नवरा असेपर्यंत लावायचें असतें— " पंक्तीत काही लग्न न झालेल्या मुलीहि हौसेनं वाढत होत्या. त्यांच्या कपाळावर कुंकू पाहून साहेब म्हणाला—

" या मुलींचें लग्न झालेले नाहीं, मग यांच्या कपाळावर कुंकू कसें ? "

" त्याचाहि नवरा मेलेला नाहीं. "

यांवर पाहुणा म्हणाला,

" पण याचें लग्न झालेलें नसतां नवरा मरण्याचा प्रश्नच येत नाहीं ? "

यावर नाना हसून म्हणाला—

" यांचें लग्न होण्यापूर्वी जे मेलेले असतील त्यातला कुणी याचा नवरा नवरा नसेल. जे जिवंत असतील त्यांतला एक यांचा नवरा असून तो आजहि जिवत आहे. "

● ● ●

# राजा शिवछत्रपति



भाग एक ते दहा

ब. मो. पुरंदरे

एक : जन्म आणि पूर्वस्थिती

दोन : स्वराज्याची प्रतिष्ठापना

तीन : अफजलखान-मोहीम

चार : सिद्दीजौहर-मोहीम

पांच : शाइस्तेखान आणि सुरत

सहा : मिर्झा राजे जयसिंह-मोहीम

सात : आग्रा : कैद आणि सुटका

आठ : सुराज्याची प्रतिष्ठापना

नऊ : राज्याभिषेक

दहा : दक्षिण दिग्विजय

मूल्य :: सोळा रुपये

राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणें २.

# गंगाजळी

(प्रतिमासीं 'माणूस' च्या भेटीस पुष्कळ भावंडें येतात. या मराठी मासिकांतून वेचलेले वैशिष्ट्यपूर्ण वेचे या सदरांत आमच्या वाचकांना वाचावयास मिळतील.)

: १ :

(साहित्य सहकाराच्या जून ६२ अंकांत श्री. गं. दे. खानोलकर यांनी श्री. फडणीस यांच्या १८८७ च्या जूनमध्ये सुरू झालेल्या 'काव्यरत्नावली' या मासिकाच्या जन्माची कथा खालीलप्रमाणे नोंदली आहे.)

काव्यरत्नावलीचा जन्म

"सलाम अलेकुम् नानासाहेब"

"सलाम मियासाब. आइए. फर्माइए"

"फरमाइशी कसची ? सल्ला घ्यायला आलों आहे मी आपला."

"सल्ला ? कसला सल्ला ?"

"मला एक उर्दू कवितांचें मासिक प्रसिद्ध करावयाचें आहे. काय येईल खर्च ?"

"कवितांचें मासिक ? महिनोन् महिने अंक भरून काढतां येईल एवढ्या कविता आपण आणणार कुठून ?"

"या अल्ला ! साब, उर्दू कविताचे पीक थोड का निघतं आहे हल्ली ? दिल्ली, आग्रा, लखनौ ह्या बाजूला कवीच कवि आहेत. बाडेंची बाडें मिळतील. कविता छापेन तेवढ्या थोड्या !"

नानासाहेब चकित झाले, कौतुक केलें त्यांनी त्या मुसलमान गृहस्थाच्या धाडसाचें. सात वर्षांपूर्वी १८८० साली, खानदेशांतील जळगांव शहरीं एक लहानसा छापखाना घालून ते बसले होते. "प्रबोधचंद्रिका" नावाचें एक साप्ताहिकहि त्यांनी चालविले होतें.

त्या मुसलमान गृहस्थाला त्यांनी खर्चाचा आंकडा सांगितला अन् काय द्यावयाचा तो सल्ला दिला. तो गृहस्थ गेल्यावर नानासाहेबांच्याहि डोक्यात एक विचार सुरू झाला "आपणहि असे एखादें मासिक मराठींत काढलें तर ! महाराष्ट्रात कवितांचें पीक काही कमी नाही! मासिकात जागा मिळाली नाही म्हणून कितीकांच्या कविता बासनात बंदिस्त होऊन पडल्या असतील. पाहूं तर पत्रें धाडून कविजनांना."

कवीना पत्रें धाडण्याचा धडाका सुरू झाला. नानासाहेबांना उत्तरें येऊं लागली. अपेक्षेपलिकडे प्रोत्साहन मिळालें. नानासाहेबानी मासिक सुरू केलें. त्याचें नाव ठेवलें "काव्यरत्नावली." कवींकडून येणाऱ्या कवितांची नीट निवड व्हावी ह्यासाठी विष्णु मोरेश्वर महाजनी, हरि माधव पंडित, वासुदेवशास्त्री खरे, वामन दाजी ओक, मोरो गणेश लोंढे ह्यांसारख्या तत्कालीन वाङमय क्षेत्रातील मातब्बर मंडळींचें एक परीक्षक मंडळ नेमून टाकले आणि १८८७ च्या जून महिन्यांत "काव्यरत्नावली" चा पहिला अंक प्रसिद्ध केला. मासिकाच्या कव्हरच्या माथ्यावर "अलीकडील कविमंडळीनी चालविलेलें कवितेचें मासिक पुस्तक" अशी ठळक ठशांत ओळ छापली होती अन् "काव्यरत्नावली" ह्या अक्षराखाली

"त एव पदविन्यासास्ता एवार्थ विभूतयः !
तथापि नव्यं भवति काव्य ग्रथनकौशलात् ॥"

असा श्लोक छापला होता. पुढे त्याखाली

"ती ती पदें नित्य फिरुनि येती ।
त्या त्याच अर्थाप्रति दावितात ॥
कौशल्य मोठें रचनेत आहे ।
सत्काव्य नेणें नव वाटताहे ॥"

असा मराठीत अनुवादहि कायमचा छापला जाऊं लागला.

: २ :

(संशोधकांना त्यांच्या शोधांचें फल अग्रहक्कानें मिळावें म्हणून पेटेंटचा कायदा करण्यांत आलेला आहे. या कायद्यांतील महत्त्वाच्या तरतुदींची माहिती 'संपदा' मासिकाच्या 'मे' ६२ अंकांत श्री. पु. ग. काशीकर यांनीं वाचकांना करून दिली आहे त्यांतील कांही महत्त्वपूर्ण संकलन.)

पेटंट म्हणजे काय ?

रामभाऊ म्हणाले, "बुवानी पूरिया रागांतील आपली पेटंट चीज म्हटली आणि बैठकीला रंग चढला."

"आळूची भाजी करावी तर पुण्याच्या आचाऱ्यांनीच, अगदी पेटंट" असें लोक बोलतांना आपण नेहमी ऐकतों. असें म्हणणाऱ्यांचा हेतु एवढाच की, बुवा पूरिया रागातली चीज फारच उत्तम गातात. त्याचप्रमाणें पुण्यांतले आचारी आळूची भाजी फारच उत्तम करतात. याचा अर्थ दुसऱ्या कोणीहि पूरिया रागांतली चीज गायची नाही असा नव्हे किंवा आपल्या घरी आपल्या आईनें आळूची भाजी करावयाची नाही असाहि नाही. ती चीज कोणीहि गावी किंवा आळूची भाजी कोणींहि करावी.

पेटटच्या कायद्याप्रमाणे मात्र असें नाही. पेटंट ज्याच्या नांवें दिले आहे त्यालाच अगर त्यानें अधिकार दिला असेल त्यासच ज्या वस्तूबद्दल पेटंट दिलें आहे ती वस्तु तयार करावयाचा अधिकार प्राप्त होतो. इतर कोणासहि तशी वस्तु ठराविक मुदतीपर्यंत बनवित येणार नाही. आणि अनधिकृत रीतीनें अशी वस्तु कोणीं तयार केली तर तो नुकसान भरपाई द्यावयास पात्र होतो.

संशोधन करून आस्तित्वांत नव्यानें आणलेल्या वस्तूची निर्मिति, विक्री व उपयोग मर्यादित कालापुरता करावयाचा अग्रहक्क अगर एकमेव हक्क ज्या अन्वये भारत सरकारकडून संशोधकांस दिला जातो त्यास पेटंट असे म्हणतात. पेटंटी एक किंवा अनेक व्यक्ति अगर संस्थाहि असू शकतील. या अग्रहक्कामुळें पेटंटी स्वतः पेटंटेड वस्तूची निर्मित करूं शकेल किंवा कांही कारणास्तव त्यास हें करणें शक्य नसेल तर तो पेटंटेड वस्तु बनविण्याचा अधिकार दुसऱ्या कोणासहि देऊ शकतो. पहिला मार्ग पेटंट विकून व दुसरा मार्ग वस्तु बनवून विक्री करण्याचा अधिकार देऊन. दुसऱ्या मार्गानें पेटंट त्याच्याच नांवचें राहतें, परतु काही कालापुरती निर्मिति करावयाचा अधिकार तो ठराविक रॉयल्टी घेऊन दुसऱ्यास देऊं शकतो.

देशांतील अर्जांत महाराष्ट्र अग्रेसर.

सन १९६० मध्यें भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडे पेटंटसाठीं ४५०३ अर्ज करण्यात आले. त्याचे मागील वर्षी ही संख्या ३९६५ होती. यावरून पेटंट–अर्जांच्या संख्येंत वाढ झाल्याचें दिसून

येतें. अर्जदारांत ३१ स्त्री अर्जदार होते. या ४५०३ अर्जांपैकी भारतीयांचे अर्ज फक्त ७२१ होते व बाकीचे परदेशीयांकडून आले होते. त्यांची मुख्य वर्गवारी अशी ; इंग्लंड १०३२, स्वित्झलंड ५२४ जर्मनी ४३५, नेदरलंड्स् २३६, फ्रान्स १७०, इटली १२९, अमेरिका ८७५, जपान ८९, राहिलेल्या देशांकडूनहि थोडे फार अर्ज आले होते. भारतातील अर्जांची वर्गवारी राज्यवार खालील प्रमाणें महाराष्ट्र २०४, बंगाल १५९, दिल्ली ८६, मद्रास ४५, म्हैसूर २३, उत्तर प्रदेश २१, आंध्रप्रदेश १९, पंजाब १८, बिहार १७, गुजराथ १४, केरळ १२ व राहिलेले इतर राज्यांतून आले होते. भारतांत १९६० अखेर चालू असलेल्या एकूण पेटंट्सची संख्या १८००० आहे व त्यापैकी फक्त १५५० भारतीयांच्या नावें दिलीं गेलेलीं आहेत. हें प्रमाण साधारणपणे शेकडा ९ पडतें.

जेवढी पेटटची संख्या जास्त तेवढी देशांतील संशोधक बुध्दि जास्त असे म्हणावयास हरकत नाही. भारतांतील राज्यांकडून आलेल्या अर्जांपैकी महाराष्ट्रातील अर्जांची संख्या सर्वांत जास्त आहे. ही अभिमानाची गोष्ट आहे, तथापि वरील दृष्टीनें या आकड्यांकडे पाहतां **भारतांत दिल्या जात असलेल्या पेटंटस्पैकीं फक्त शेकडा ९ एवढींच भारतीयांच्या वांट्याला येत असून राहिलेलीं ९१ टक्के परदेशी यांकडे जातात ही परिस्थिति आपणांला विचार करावयास लावणारी आहे.** याचा अर्थ जगांतील कित्येक मोठे देश संशोधनाच्या बाबतीत आपल्या फार पुढें आहेत आणि त्याची बरोबरी आपणांस करावयास किती तरी अधिक परिश्रम करावयास हवेत हा आहे देशांतील सशोधनबुध्दि वाढावयास हवी आणि काहीं संशोधकाना त्यांच्या पेटंट घेण्याच्या बाबतीत आर्थिक किंवा इतर काही अडचणी असल्यास त्याच्या निवारणाची आवश्यक ती व्यवस्था करणें आवश्यक आहे.

## : ३ :

### तीन शतकांपूर्वीचें पुणें

**("साहित्य-सहकार" मासिकांत "पुणें-शहराचें वर्णन" या नांवाची एक लेखमाला प्रकरणश: मे अंकापासून सुरू आहे लेखकाच्या नांवाचा उल्लेख त्यांत नाहीं. तिसऱ्या प्रकरणांतील कांहीं भाग...)**

**इ.** स. १६३६ ह्या सालीं शहाजीनें कसबे पुणें याच्या दक्षिणेस गांवच्या अगदीं बाहेर शिवेवर एक मोठा वाडा बांधला त्याचें नांव लाल महाल असे ठेवलें. त्यास हल्लीं अंबरखाना असें म्हणतात. ह्या लाल महालाची बांधणी चांगली होती असें वाटतें. वाड्यांत मोठमोठाली तळघरें होती; त्यापैकीं अद्याप तेथें कांहीं आहेत. त्यावेळच्या लोकाची घरें बांधण्याची चाल अशी असे कीं घरात कोठारें, पेवें इत्यादि चोर जागा करीत. उत्तम बंदोबस्ताच्या घराविषयींची लोकाची अशी समजूत होती की, एक दरवाजा लावला म्हणजे घर पेटीप्रमाणे, त्यांत पिसूचा प्रवेश व वाऱ्याचा लवलेश नसावा. ही वेडी समजूत आता हळू हळू कमी होत चालली आहे. कारण लोकास आपल्या मालमत्तेच्या रक्षणाची पूर्वीप्रमाणें आतां भीति नाही. आणि प्रकाश व हवा याच्या योगानें प्रकृति कशी होती हेंही त्यास समजूं लागलें आहे.

ह्या लाल महालांत शिवाजी महाराज व त्यांची मातोश्री जिजाबाई ही येऊन राहिली. त्यावेळीं शिवाजीचें वय पांच वर्षांचें होतें. याच वेळेस जिजाबाईनें गणपतीचे देवालय बांधिलें. त्यास हल्लीं कसब्यांतील गणपति असें म्हणतात.

जेथें गणपतीचें देवालय बांधलें. तेथें मुसलमान, काजी, मोमीन, व कोष्टी लोकाचीं घरें होतीं, तीं सर्व काढून त्यास रहाण्यास जागा हल्लीं जेथें शनवारचा वाडा (जुना वाडा) आहे तेथें दिली.

कसबे पुणें यांतील वस्ती नीट एकतर्फे वसली नव्हती. जेथें ज्याची मर्जी वाटेल तेथें त्यानें आपले घर बांधावे. रस्ते कोणीकडून राहील हा विचार ते करीत नव्हते. त्यामुळें येथील रस्ते अगदी गैरसोईचे व अरुंद झाले होते व पावसाळयांत तर फारच गैरसोय होत असे. मर्जीस येईल तेथें लोकांनीं विहिरी खणल्या. त्या बहुतेक करून रस्त्याच्याच्या मधोमध होत्या, त्यापैकी बहुतेक पेशवे यांनी छापून टाकल्या व कांहीं जलदेवच्या भीतिमुळें तशाच राहूं दिल्या; त्या आता इंग्रज सरकारनें बहुतेक छापून टाकल्या आहेत; व त्या देवताही गपचीप बसल्या आहेत, किंवा पेशवे यांजकडे स्वर्गास फिर्यादीकरितां गेल्या आहेत की काय कोण जाणें ! त्या विहिरीपैकी ज्या रस्त्याच्या बाजूस असून लोकास इजा न होतां उलटें पाण्याचें सुख होतें, त्या मात्र ठेवल्या आहेत. अशा रस्त्यावरच्या विहिरी कसब्यातच आहेत.

कसबे पुण्यांतील घरें भेंड्यांच्या विटांचीं होतीं. घरांच्या पुढच्या अंगास अगदीं सखल अशा पडव्या उतरलेल्या होत्या. घरें एकमेकाच्या अगदीं लागून बांधलेली होतीं. हा सर्व प्रकार कसब्यांत अद्याप कोठें कोठें आढळतो.

कसब्यांतील राहणारांपैकीं बहुतेकांचा धंदा शेतकी करण्याचा होता. ब्राह्मण मात्र उपाध्येपण, भिक्षुकी, आणि सावकारी करून आपला उदरनिर्वाह करीत असत. दुसरें लोकांनी शेतात मरेतो काम करून सरकार व सावकार यांची भरती करावी, आणि जें उरेल तें आपल्या कुटुंबपोषणार्थ ठेवावें. तें संपले म्हणजे पुन्हा सावकारापासून "गुरे ढोरें, बायकापोरें, घरेंदारें शेती पोती गाडगीं, मडकीं" सर्व गहाण लावून देऊन दिडीदुपटीचे व्याजानें पैसा अथवा दाणे घ्यावे. त्या वेळच्या लोकांचा सावकार म्हणजे प्रत्यक्ष मूर्तिमंत यमराज तो तरी कदाचित् काकुळती केल्या असता क्षणभर धीर धरील. पण हे सावकार असे पाषाणहृदयी होते कीं दया हा शब्द त्याच्या वंशीं, वर्गीं देखील नव्हता. ते आपला पैसा वसूल करण्याकरितां त्यास पाहिजे ती शिक्षा करण्यास मुखत्यार असत. ते डोईवर अथवा छातीवर धोंडा देऊन अथवा ओणवें उभें करून रुपये मागत. आतांच्या स्थितीत असे सावकार नाहीत असें मनांत आणूं नये. ते दबून आहेत, त्यावेळचे सावकार कुठापासून बायकामुली गहाण लावून घेत असत. ही दास्यत्व करण्याची चाल हें खाली खत लिहिलें आहे त्या मितीपर्यंत चालत होती.

**खत.**

गहान खत शके १८४६ तारणनाम संवत्सरे, माहे चैत्र शुद्ध १२ ते दिवशीं राजेश्री नारायणदास किराड, वस्ती कसबे पुणें, पेठ सोमवार यासीं रिणको नाम मुक्ताई कोम अदोजी पाटील गोपाले, हल्ली वस्ती कसबे पुणें पेठ मजकुरी, आम्हीं आपलें आत्मकार्यास घेतलें. कर्ज मुद्दाल हल्लीशिक्का रुपयास सके ६ दोन पैसेप्रमाणें देऊं. हा वायदा सहा महिन्यात रुपये व्याज मुद्दल रुपयांचा फडशा करून देऊं. यासी गहान आमची लेक सकू तुम्हाजवळ गहाण लावून दिली असे. मुदतीस रुपये व्याज मुद्दल याचा फडशा करून देऊं. न देऊं तर मुदतीस दागिना तुमचे स्वाधीन करून देऊं. ज्या वेळेस तुमचे रुपयाचा फडशा करून देऊं आणि आपली मुलगी सोडवून घेऊं. हा गहान रोखा आम्ही लिहून दिल्हा सही.

साक्ष — निशानी वागडी.

१ कसोबो ताके पेठ गणेश.

१ मनसुप गीरबाबा गोसावी.

जरी हें खत अलिकडलें आहे, तरी तें लिहिण्याची पद्धति फार जुनाट आहे. ह्या खतावरून मनुष्यास गहाण ठेवण्याची चाल ह्या देशांत होती असें दिसतें.

●●●

# राजहंस प्रकाशन

४१९ नारायण पेठ, पुणें २

## आमचेकडे मिळणारीं निवडक पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| मुजऱ्याचे मानकरी | ब. मो. पुरंदरे | १.२५ |
| सहा साहसें | दा. सी. देसाई | २.०० |
| ग्रामदानाची प्रयोगभूमि | श्री. ग. माजगांवकर | २.५० |
| आम्ही विष्णुदास | " | ०.५० |
| स्वराज्याचे युगमंत्र | " | ०.२५ |
| विद्यालंकार | प्रभाकर इनामदार | १.२० |
| झांशीची राणी | प्रभाकर शिदोरे | १.०० |
| हेमा सात बुटके | भालचंद्र भिडे | १.२५ |
| रक्षाबंधन | गो. नी. दांडेकर | १.५० |
| सावित्री | ब. मो. पुरंदरे | ०.५० |
| परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २.०० |
| गुजरातेंतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७.०० |
| मडकोबा | भा. रा. भागवत | १.०० |
| बडबडमामा | लीलावती भागवत | ०.७५ |
| दयाळ | यदुनाथ थत्ते | २.०० |
| स्वैरविचार | ग. त्र्यं. माडखोलकर | ३.५० |
| वाङमयविलास | " | ५.०० |
| भारत आणि चीन | रा. कृ. पाटील | ८.०० |
| पायवाट ( काव्य ) | बाबा मोहोड | ३.२५ |
| त्या तिथें पलिकडे | रॉय किणीकर | २.५० |
| असिधारा | दे. गो उदापुरे | ३.०० |

| | | |
|---|---|---|
| आम्ही भगिरथाचे पुत्र | गो नी. दांडेकर | १०.०० |
| आनंदवनभुवन | " | ६.०० |
| पूर्णामायचीं लेकरं | " | ४.०० |
| कुऱ्हाडीचा दांडा ( नाटक ) | " | ०.५० |
| शितु ( " ) | " | २.०० |
| पवनाकांठचा धोंडी ( " ) | " | २.५० |
| उद्धव ( " ) | मंगेश पत्की | २.०० |
| मराठ्यांचें सिंहासन ( " ) | गो. कृ. मुगशीकर | २.०० |
| गांजलेले जीव भाग १ ते ४ | भा. रा. भागवत | १२.०० |
| शिंगी | " | २.५० |
| पाताळलोकची अद्भूत यात्रा | " | ३.०० |
| चिटोऱ्याचा प्रताप | " | २.०० |
| हिंमतवान जासूद | " | ६.०० |
| कोल्होबाची करामत | वऱ्हाडपांडे | १.०० |
| जमिनीवरची माणसें | शांताराम | ३.५० |
| ऐकलेल्या गोष्टी भाग १, २, ३, | भवानीशंकर पडित | १.५० |
| सत्तावनचा सेनानी | वसंत वरखेडकर | ४.०० |
| राजपुत्र | " | २.५० |
| डोंगर माथ्यावरील दिवा | ना. रा. शेंडे | ३.०० |
| संतसमागम | भ. श्री. पंडीत | ३.५० |
| वसंत फार दूर नाहीं | अंबादास अग्निहोत्री | ३.०० |
| जळांतील मासा | जयवंत दळवी | ४.५० |
| पतंगप्रीत | म. वि. कुलवर्णी | ४.०० |

आपलें ज्ञान अद्ययावत करण्यासाठी
आपली अभिरुचि संपन्न करण्यासाठी
आपलें जीवन गतिमान् करण्यासाठी

प्रत्येक शाळेंत
प्रत्येक ग्रंथालयांत
आणि
प्रत्येक कुटुंबांत

★

# माणूस

वाचला जाणें अगत्याचें आहे.

नागपुरांत यासाठीं भेटा किंवा लिहा

## साहित्य प्रसार केंद्र

सिताबर्डी, नागपूर

विदर्भ नागपुरांत शाळा, महाविद्यालयें आणि ग्रंथालयें यांना
वेंचक साहित्य पुरविणारी एक विश्वासपात्र संस्था


संपादक-मुद्रक-प्रकाशक : श्री. ग. माजगांवकर, प्रकाशन स्थळ : राजहंस प्रकाशन, १०१५ सदाशिव पेठ, पुणे २.
मुद्रक : साधना प्रेस, ४३०-३१ शनवार पेठ, पुणे २.